दैनिक
राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले । RNI No. MAHMAR/2019/82605 । वर्ष ८ वे । पाने ८ । मुल्य रू. ५.०० । अंक २४ । सोमवार २ नोव्हेंबर २०२६
। पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 । www.rashtrasahyadri.com

अहिल्यानगर • जळगाव • धुळे • नंदुरबार • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • धाराशिव • लातूर • नांदेड • परभणी • हिंगोली • अमरावती • अकोला • यवतमाळ • बुलढाणा • वाशिम • नागपूर • वर्धा • भंडारा • गोंदिया • चंद्रपूर • गडचिरोली • मुंबई • ठाणे • पालघर • रायगड • रत्नागिरी • सिंधुदुर्ग • पुणे • सातारा • सांगली • कोल्हापूर • सोलापूर • नाशिक

लॉरेन्स बिष्णोई टोळीकडून १२ सराफांना जीवे मारण्याची धमकी

नागपूर: चित्रपट अभिनेता सलमान खाननंतर टायगर श्रॉफ वर गोळीबार करणाऱ्या कुख्यात लॉरेन्स बिष्णोई टोळीच्या नावाने शहरातील १२ सराफा व्यावसायिकांना लाखोंची खंडणी मागत जीवे मारण्याची धमकी देण्यात आली. सराफा व्यावसायिकांना गेल्या काही तासांच्या अंतरात एका पाठोपाठ एक टपालाद्वारे मिळालेल्या या धमकीच्या पत्रानंतर रविवारी हा प्रकार उघडकीस आला. एन दिवाळीच्या तोंडावर मिळालेल्या या धमकीच्या पत्रामुळे व्यापारी वर्गात भीतीचे वातावरण आहे. इतवारी येथील सराफा ओळ आणि बजाजनगरातील काही सराफा व्यावसायिकांनाही काही तासांच्या अंतरात एका मागे एक धमकीच्या आशयाचे पत्र मिळाले. लॉरेन्स बिष्णोई टोळीचा सदस्य असल्याचा दावा करत धमकी देणाऱ्याने सराफा व्यावसायिकांना दहा लाखांच्या खंडणीची मागणी केली आहे. यात धमकी देणाऱ्याने व्यापाऱ्यांना तीन दिवसांची मुदत दिली आहे. या काळात पैशांची व्यवस्था केली नाही तर आप्रेष्टांसह त्याची किंमत मोजावी लागेल, तुम्ही कलियुगातले कौरव आहात. जसा टायगर श्रॉफवर गोळीबार केला तसात तुमच्यावरही करेल. मी आतापर्यंत चार खून केले आहेत.

जिल्हा बँकेच्या सत्तासंघर्षाचा आज फैसला!

१० जागांसाठी आज मतदान; २७ उमेदवारांचे भवितव्य मतपेटीत बंद होणार

- विखे-थोरात युती, लंके-लोखंडे पॅनल आणि राम शिंदे गटात प्रतिष्ठेची लढत
- ३ हजार ८३७ मतदार बजावणार मतदानाचा हक्क

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

अहिल्यानगर : जिल्ह्याच्या सहकार क्षेत्रातील अत्यंत प्रतिष्ठेची मानली जाणारी अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीसाठी आज, सोमवारी मतदान होत आहे. संचालक मंडळाच्या एकूण २१ जागांपैकी ११ जागा यापूर्वीच बिनविरोध झाल्या असून, उर्वरित १० जागांसाठी २७ उमेदवार निवडणुकीच्या



रिंगणात आहेत. जिल्ह्यातील आजी-माजी आमदार, खासदार, माजी मंत्री, त्यांचे वारसदार आणि सहकार क्षेत्रातील दिग्गजांची प्रतिष्ठा या निवडणुकीत पणाला लागली आहे. त्यामुळे जिल्हा बँकेच्या सत्तेची चावी कोणाच्या हाती जाणार, याकडे केवळ जिल्ह्याचेच नव्हे तर राज्याच्या राजकीय वर्तुळाचेही लक्ष लागले आहे.

या निवडणुकीत भाजपचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि काँग्रेसचे माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांची युती, शरद पवार गटाचे खासदार नीलेश लंके आणि शिवसेना शिंदे गटाचे माजी खासदार सदाशिव लोखंडे यांच्या नेतृत्वाखालील पॅनल, तसेच विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांच्या नेतृत्वाखालील गट अशी प्रमुख राजकीय समीकरणे पाहायला मिळत आहेत. विखे-थोरात युती आठ जागांवर, लंके-लोखंडे पॅनल सात जागांवर, तर राम शिंदे गट कर्जतच्या एका जागेवर निवडणूक लढवत आहे. अकोले मतदारसंघात या प्रमुख पॅनल्सनी उमेदवार दिलेला नसल्याने तेथे स्वतंत्र लढत होत आहे.

यापूर्वी बिनविरोध झालेल्या जागांमध्ये विखे-थोरात युतीने १० जागा मिळविल्याने बँकेवरील आपले वर्चस्व अधिक मजबूत केले आहे. राम शिंदे गटाला एक जागा बिनविरोध मिळाली आहे. त्यामुळे उर्वरित १० जागांच्या निकालातून सत्तेचे राजकीय गणित कसे आकाराला येते, हे स्पष्ट होणार आहे.

राहुरीमध्ये आमदार प्राजक्त तनपुरे आणि नगराध्यक्ष सत्यजित कदम यांच्यात सामना होत आहे. शेतीपूरक मतदारसंघात आमदार आशुतोष काळे यांच्याविरुद्ध सुधीर म्हस्के निवडणूक लढवत आहेत. या लढतींच्या निकालातून जिल्ह्यातील स्थानिक राजकीय समीकरणांचेही संकेत मिळण्याची शक्यता आहे.

विमुक्त जाती-भटक्या जमाती मतदारसंघातून जिल्हा बँकेचे माजी संचालक गणपतराव सांगळे, राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते प्रताप ढाकणे यांचे चिरंजीव ऋषिकेश ढाकणे आणि सुभाष गीते यांच्यात लढत होत आहे. त्यामुळे या मतदारसंघांच्याही निकालाकडे सहकार क्षेत्राचे (पान ४ वर)

पुणे, अहिल्यानगर, साताऱ्यात धुवांधार पाऊस

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

पुणे: महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांमध्ये पावसाने हजेरी लावली आहे. पुणे, अहिल्यानगर आणि सातारा या जिल्ह्यांमध्ये पावसाने दमदाट बॅटिंग केली आहे. मुसळधार पावसामुळे रस्ते जलमय झाले आहेत.अनेक ठिकाणी पाणी साचलं आहे. तसेच काही ठिकाणी वाहतूक देखील मंदावली. अचानक आलेल्या या पावसामुळे नागरिकांची तारांबळ उडाली. दरम्यान, पावसामुळे उकाड्याने हैराण झालेल्या नागरिकांना दिलासा मिळाला आहे. तर या पावसामुळे काही ठिकाणी शेतकरी चिंतेत पडले आहेत. अचानक आलेल्या पावसामुळे हाता तोंडाशी आलेला घास हिरावला जाण्याची भीती शेतकऱ्यांना आहे. तर दुसरीकडे ऊस आणि ज्वारी पिकांसाठी हा पाऊस दिलासादायक असणार असल्याची चर्चा आहे.


उद्घाटनाआधीच मान मेट्रो स्टेशनला गळती

पुण्यात अचानक आलेल्या पावसाने मेट्रो कामांबाबतही प्रश्न उपस्थित केले. शिवाजीनगर-हिंजवडी मेट्रोचे सध्या काम सुरु असून लवकरच प्रवाशासाठी सुरु होणार आहे. पण उद्घाटनाआधीच शिवाजीनगर-हिंजवडी मेट्रोच्या मान स्टेशनला गळती लागलेली बघायला मिळाली. येत्या ३ नोव्हेंबरला या मेट्रो लाईनचे उद्घाटन होणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या मेट्रोचे उद्घाटन होणार आहे. पण त्याच्या दोन दिवसाआधीच मेट्रो स्थानकात मोठ्या प्रमाणात गळती होत असल्याचे व्हिडीओ समोर आले आहेत. मान मेट्रो स्थानकाच्या नव्या इमारतीत गळती लागल्याने बांधकामाबाबत प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

पुण्याच्या हिंजवडी परिसरात जोरदार पाऊस पडला . अचानक आलेल्या पावसाने हिंजवडी परिसरातील नागरिकांची चांगलीच त्रेधातिरपीट झाली. मुसळधार आलेल्या पावसामुळे हिंजवडीत आयटी पार्क परिसरात रस्त्यांवर पाणी साचले. यामुळे रस्त्याने ये-जा करणाऱ्या नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागला. बंगालच्या उपसागरात चक्रीवादळ निर्माण झाले आहे. यामुळे महाराष्ट्राच्या वातावरणावर त्याचा परिणाम होताना दिसत आहे. राज्यातील काही जिल्ह्यांमध्ये आज पाऊस पडल्यानंतर पुढच्या दोन ते तीन दिवसांमध्ये देखील पावसाची शक्यता आहे. हवामान विभागाने वर्तवलेल्या अंदाजानुसार, २ नोव्हेंबरला रत्नागिरी, सिंधुदुर्ग, कोल्हापूर जिल्हा आणि कोल्हापूर घाट परिसर, सातारा या जिल्ह्यांमध्ये वादळी पावसाची (पान ४ वर)

लग्न जमत नसल्याच्या मानसिक त्रासातून तरुणाची आत्महत्या; एकावर गुन्हा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



श्रीगोंदा : लग्नाबाबत चुकीची माहिती देऊन लग्न मोडण्याचा प्रयत्न केल्यासह 'तुझे लग्न होणार नाही' असे म्हणत मानसिक त्रास दिल्याने २७ वर्षीय तरुणाने आत्महत्या केल्याची घटना श्रीगोंदा येथे घडली. याप्रकरणी आत्महत्येस प्रवृत्त केल्याच्या आरोपावरून एकाविरुद्ध श्रीगोंदा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मयूर सुनील मखरे (वय २७, रा. रामोशी गल्ली, श्रीगोंदा) असे आत्महत्या केलेल्या तरुणाचे नाव आहे. याबाबत त्याचा चुलत भाऊ उमेश शहाजी मखरे (रा. दत्तवाडी, श्रीगोंदा) यांनी पोलिसांत फिर्याद दिली आहे.

फिर्यादीनुसार, मयूरचे लग्न जुळविण्याचे प्रयत्न सुरू होते. त्याचे यापूर्वीचे एक लग्न मोडले होते. त्यानंतर जुळत असलेले दुसरे लग्न मोडण्यासाठी वैभव दादासाहेब इंगळे याने मयूरला दूरध्वनी करून त्याच्याबाबत चुकीची माहिती दिल्याचा आरोप आहे. तसेच शेडगाव येथील प्रतीक सुरेश भुजबळ याने 'तुझे लग्न होणार नाही,' असे म्हणत मयूरला वारंवार मानसिक त्रास दिला.ऑगस्ट २०२५ पासून १८ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी साडेसात वाजेपर्यंतच्या कालावधीत झालेल्या या त्रासाला कंटाळून मयूरने राहत्या घरी आत्महत्या केल्याचे फिर्यादीत नमूद केले आहे.याप्रकरणी उमेश मखरे यांच्या फिर्यादीवरून प्रतीक सुरेश भुजबळ याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम १०८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक पोलीस निरीक्षक कौशलारामनिरंजन वाघ पुढील तपास करीत आहेत.

टँकर चालकांच्या आंदोलनामुळे १२० गावांचा पाणीपुरवठा ठप्प !

चालकाला मारहाणीच्या निषेधार्थ २४ तास टँकर बंद

अविनाश मंत्री । राष्ट्र सह्याद्री

पाथर्डी : एकीकडे पाणीटंचाईची तीव्रता दिवसेंदिवस वाढत असताना दुसरीकडे पाणीवाटपावरून टँकर चालकाला मारहाण झाल्याच्या घटनेचे पडसाद उमटले आहेत. या घटनेच्या निषेधार्थ शेवगाव व पाथर्डी तालुक्यांतील टँकर चालकांनी शनिवारी टँकर भरणे बंद करून अघोषित आंदोलन पुकारले. तब्बल २४ तास टँकर जागेवर उभे राहिल्याने दोन्ही तालुक्यांतील सुमारे १२० गावांचा पाणीपुरवठा विस्कळीत झाला. अखेर ठेकेदार कंपनीच्या प्रतिनिधींनी चालकांशी चर्चा केल्यानंतर रविवारी सायंकाळी टँकर भरण्यास सुरुवात झाली.

पाथर्डी तालुक्यात जिल्ह्यातील सर्वाधिक पाणीटंचाई असून, एकट्या या तालुक्यात ९२ टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जातो. यातील बहुतांश टँकर शेवगाव तालुक्यातील राक्षी येथील उद्भवावर भरले जातात. शनिवारी दुपारी चारच्या सुमारास पाणीवाटपाच्या मागणीवरून एका टँकर चालकाला ग्रामस्थाने शिवीगाळ करून चापट मारल्याची घटना घडली. यापूर्वीही अशा घटना घडल्याने संतप्त चालकांनी टँकर भरणे बंद केले. मारहाण करणाऱ्यांवर कारवाई आणि पाणीवाटप व्यवस्थेत सुसूत्रता आणल्याशिवाय टँकर सुरू करणार नसल्याची भूमिका त्यांनी घेतली.

खड्डे, दादागिरी आणि असुरक्षिततेचा सामना

राक्षी येथील टँकर भरण्याच्या ठिकाणी खड्डे आणि मातीचे ढिगारे असून, साधे सपाटीकरणही झालेले नाही. टँकरचा क्रमांक येण्यासाठी तीन ते सात तास प्रतीक्षा करावी लागते. चालकांसाठी स्वच्छतागृह, विश्रांती कक्ष किंवा जेवणाची व्यवस्था नाही. गावोगावी पाणीवाटप करताना राजकीय गटबाजी, दादागिरी आणि धमक्यांचा सामना



करावा लागत असल्याच्या व्यथा चालकांनी मांडल्या. काही गावांत घरासमोर टँकर थांबवून घरातील सर्व भांडी भरल्याशिवाय पुढे जाऊ दिले जात नाही. तर काही ठिकाणी तांब्याभर पाण्यासाठीही टँकर अडवला जातो. शासनाच्या सूचनेनुसार एका कुटुंबाला ३०० लिटर पाणी देण्याचे नियोजन असताना काही कुटुंबांकडून एक हजार लिटरपर्यंत पाणी बळजबरीने घेतले जाते. वैयक्तिक विहिरी आणि बोअरवेलमध्ये पाणी टाकण्याचाही आग्रह धरला जात असल्याचे चालकांनी सांगितले.

खड्ड्यांमुळे वाहनांचेही नुकसान

टँकर भरण्याच्या ठिकाणापासून गावांपर्यंतच्या रस्त्यांवर मोठमोठे खड्डे असल्याने टायर फुटणे, वाहनांचे पाटे तुटणे, टाक्यांचे नुकसान होणे असे प्रकार घडतात. खड्ड्यांमुळे टँकरच्या वेल्डिंगला तडे जाऊन पाण्याची गळती होते. दिवसभराच्या धावपळीत जेवण आणि विश्रांतीही मिळत नाही. रात्री उशिरा घरी गेल्यानंतर कुटुंबीयांशी संवाद साधण्याचीही संधी मिळत नसल्याची खंत संतोष आहेर, श्रीमंत नेमाने, गणेश गोरे, भारत गोंधळी आणि मारुती माळवदे या चालकांनी व्यक्त केली. (पान ४ वर)

साई संस्थान उपमुख्य कार्यकारी अधिकारी भीमराज दराडे यांची बदली

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

शिर्डी : साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डीचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी भीमराज दराडे यांची अखेर बृहन्मुंबई महानगरपालिकेत बदली करण्यात आली असून त्यांच्या जागी उपजिल्हाधिकारी संवर्गाचे वरिष्ठ अधिकारी श्रीरंग तांबे यांची नियुक्ती करण्यात आली आहे, या संदर्भातील आदेश महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाकडून निर्गमित करण्यात आला आहे. गेल्या काही दिवसांपासून संस्थानमधील या बदलीची चर्चा होती आणि अखेर शासनाने शिक्कामोर्तब केले आहे.



श्रीरंग तांबे यांची वर्णी

प्राप्त माहितीनुसार श्री भीमराज दराडे यांनी शिर्डी संस्थानमध्ये उप मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून सुमारे दोन वर्षे नऊ महिन्यांपेक्षा अधिक कार्यभार सांभाळला . त्यांच्या जागी नियुक्त झालेले नवनियुक्त उप मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीरंग तांबे हे देखील महसूल प्रशासनातील अनुभवी अधिकारी असून त्यांनी यापूर्वी विविध जिल्ह्यांमध्ये प्रांताधिकारी आणि उपजिल्हाधिकारी म्हणून काम पाहिले आहे. शिर्डी संस्थानसारख्या कोट्यवधी रुपयांची उलाढाल आणि देश-विदेशातील भक्तांचे श्रद्धास्थान असलेल्या संस्थेचा कारभार चालवण्याचा मोठा अनुभव त्यांना या निमित्ताने मिळणार आहे.

पाण्यासाठी गाव विकायला काढलेल्या गावकऱ्यांच्या डोळ्यांत पाणी..!

शरद पवारांकडून तुळशी गावाला ५० लाखांची मदत

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

माढा : पाणीटंचाईने त्रस्त झालेल्या गावकऱ्यांनी 'पाण्यासाठी आमचे गाव विकायला काढले आहे' असा संतप्त फलक लावून प्रशासनाचे लक्ष वेधलेल्या सोलापूर जिल्ह्यातील माढा तालुक्यातील तुळशी गावाला ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी मोठा दिलासा दिला. गावाच्या पाणीप्रश्नावर केवळ आश्वासन न देता त्यांनी ५० लाख रुपयांची आर्थिक मदत जाहीर केली. या मदतीचा धनादेश त्यांनी जागेवरच खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांच्याकडे सुपूर्द केला. पवार यांच्या या निर्णयामुळे हवालदिल झालेल्या गावकऱ्यांच्या डोळ्यांत आनंदाश्रू तरळले.

शरद पवार यांनी रविवारी माढा तालुक्यातील वरवडे येथून आपल्या तीन दिवसीय राज्यव्यापी दुष्काळी पाहणी दौऱ्याला सुरुवात केली. यावेळी त्यांनी तुळशी गावाला भेट देऊन पाणीटंचाईमुळे जळून खाक झालेल्या



डाळिंबासह अन्य फळबागांची बांधावर जाऊन पाहणी केली. आमदार अभिजीत पाटील आणि ग्रामस्थांनी गावातील पिण्याच्या पाण्याचे दुर्भिक्ष, जनावरांच्या चाऱ्याची टंचाई आणि शेतीच्या झालेल्या नुकसानीची व्यथा त्यांच्यासमोर मांडली.

गावातील परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन पवार यांनी तातडीने ५० लाख रुपयांचा धनादेश खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांच्याकडे सुपूर्द केला. ही रक्कम जिल्हाधिकाऱ्यांच्या माध्यमातून तुळशी गावातील कायमस्वरूपी पाणी योजनेसाठी तसेच तातडीच्या टँकर व्यवस्थेसाठी खर्च करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

तुळशी गावकऱ्यांनी पाण्यासाठी गाव विकण्याची वेळ आल्याचे फलकाद्वारे मांडलेले विदारक वास्तव आता राज्याच्या दुष्काळी परिस्थितीचे प्रतीक बनले आहे. पवार यांच्या दौऱ्यामुळे पाणीटंचाई आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे सरकारचे लक्ष वेधले जाण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

दुष्काळाचे वास्तव मुख्यमंत्र्यांसमोर मांडणार

सोलापूर जिल्ह्यातील पाहणीनंतर शरद पवार सोमवारपासून मराठवाड्यातील दुष्काळग्रस्त भागांचा दौरा करणार आहेत. राज्यातील अनेक भागांत पिण्याच्या पाण्याचा आणि जनावरांच्या चाऱ्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असल्याचे त्यांनी सांगितले. तीन दिवसांचा पाहणी दौरा पूर्ण झाल्यानंतर मुंबईत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन दुष्काळाचे वास्तव त्यांच्या निदर्शनास आणून देणार असून, ठोस सरकारी मदतीची मागणी करणार असल्याचे पवार यांनी स्पष्ट केले.

१६ नोव्हेंबरला पंतप्रधानांकडे विशेष पॅकेजची मागणी

पंतप्रधान नरेंद्र मोदी १६ नोव्हेंबर रोजी बारामती दौऱ्यावर येणार आहेत. या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर राज्यातील दुष्काळी परिस्थितीचा प्रश्न केंद्र सरकारसमोर मांडण्यात येणार आहे. खासदार सुप्रिया सुळे आणि खासदार धैर्यशील मोहिते पाटील हे पंतप्रधानांच्या निदर्शनास शेतकऱ्यांच्या संकटाची वस्तुस्थिती आणून देतील. तसेच केंद्र सरकारकडून विशेष दुष्काळ पॅकेजची मागणी केली जाईल, असे शरद पवार यांनी सांगितले.



महायुतीत मित्र कोण आणि प्रतिस्पर्धी कोण..?

शिंदेंची महत्त्वाकांक्षा आणि भाजपची वर्चस्वनीती; विधान परिषद निवडणुकीने उघड केली सत्तेतील अंतर्गत धुसफूस!

सत्तेच्या राजकारणात मैत्री ही कायमस्वरूपी नसते आणि राजकीय सोय हीच अनेकदा युतीची खरी वीण असते. महाराष्ट्रातील महायुतीच्या राजकारणाकडे पाहिले, तर याची प्रचिती पुन्हा एकदा येत आहे. विधान परिषदेच्या निवडणुकीत पाचपैकी तीन जागा गमावण्याची वेळ महायुतीवर आली आणि या पराभवाचे खापर एकमेकांवर फोडण्याची स्पर्धाच सुरू झाली. भाजप आणि अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसकडून एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेवर बोट दाखवले जात असल्याने महायुतीतील अंतर्गत मतभेद चव्हाट्यावर आले आहेत. पराभवापेक्षा पराभवाचे राजकीय विश्लेषण करण्याच्या नावाखाली सुरू झालेली आरोपांची धुळवड अधिक बोलकी आहे. कारण हा केवळ निवडणुकीतील अपयशाचा विषय नाही, तर महायुतीतील सत्तासमतोल, नेतृत्वाची महत्त्वाकांक्षा आणि भविष्यातील राजकीय वर्चस्वाच्या लढाईचा आरंभबिंदू आहे.

एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांच्याविरोधात बंड करून भाजपच्या साथीने राज्यात सत्ता स्थापन केली. शिवसेना पक्षाचे नाव आणि धनुष्यबाण हे चिन्ह मिळवून त्यांनी आपली स्वतंत्र राजकीय ओळख निर्माण करण्याचा प्रयत्न केला. मात्र, भाजपच्या सत्तेत सहभागी होणे आणि भाजपच्या राजकीय वर्चस्वाला शरण जाणे या दोन वेगळ्या गोष्टी आहेत, याची जाणीव शिंदे यांना आहे. त्यामुळेच मंत्रिमंडळातील वाटा, विधान परिषद आणि स्थानिक स्वराज्य संस्थांमधील जागावाटप असो अथवा पक्षविस्ताराचा विषय असो, प्रत्येक ठिकाणी त्यांना आपल्या पक्षाचे स्वतंत्र अस्तित्व आणि राजकीय वजन अधोरेखित करायचे आहे. त्यांची ही भूमिका भाजपला कितपत रुचते, हा खरा प्रश्न आहे.

भाजपची राजकीय कार्यपद्धती समजून घेतली, तर मित्रपक्षांना बरोबरीचे स्थान देण्यापेक्षा त्यांना आपल्या राजकीय प्रभावाखाली ठेवण्याकडे पक्षाचा कल अधिक दिसतो. महाराष्ट्रातही त्याला अपवाद नाही. २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत भाजपने मोठे यश मिळवले आणि देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली सरकार स्थापन झाले. शिंदे यांना उपमुख्यमंत्रीपद स्वीकारावे लागले. त्यामुळे सत्तेत सहभाग मिळाला असला, तरी नेतृत्वाचा केंद्रबिंदू भाजपकडे गेला. ही राजकीय वस्तुस्थिती शिंदे यांच्या पक्षातील अनेक नेत्यांना खटकत असणार, हे उघड आहे. कारण एकदा मुख्यमंत्रीपदाचा अनुभव घेतल्यानंतर पुन्हा त्याच पदाची अपेक्षा निर्माण होणे स्वाभाविक आहे. शिंदे समर्थकांकडून पुन्हा मुख्यमंत्रीपदाची चर्चा होणे, ही केवळ भावनिक इच्छा नाही; तर पक्षविस्ताराच्या राजकीय रणनीतीचाच भाग आहे.

विशेष संपादकीय
करण नवले (संपादक)

विधान परिषद निवडणुकीच्या निकालाने या संघर्षाला निमित्त मिळाले. पाच जागांपैकी महायुतीला केवळ दोन जागांवर समाधान मानावे लागले, तर महाविकास आघाडीने तीन जागा जिंकल्या. भाजपने तीनपैकी एक, शिंदे यांच्या शिवसेनेने लढवलेली एक जागा जिंकली; तर अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला एकही जागा मिळाली नाही. विशेष म्हणजे नागपूरसारख्या भाजपच्या बालेकिल्ल्यात पराभव पत्करावा लागला. पुणे पदवीधर मतदारसंघात भाजपच्या उमेदवाराला पराभवाचा सामना करावा लागला. छत्रपती संभाजीनगर पदवीधर मतदारसंघात अजित पवारांच्या राष्ट्रवादीचा उमेदवार पराभूत झाला. या निकालानंतर भाजपकडून शिंदे शिवसेनेच्या काही नेत्यांवर मित्रपक्षांच्या उमेदवारांविरोधात काम केल्याचे आरोप झाले. पुण्यातील राजकीय घडामोडी आणि छत्रपती संभाजीनगरमधील अब्दुल सत्तार यांच्याविषयीचे आरोप यामुळे वाद अधिकच वाढला. मात्र, या आरोपांमुळे भाजपच्या स्वतःच्या पराभवाची जबाबदारी संपत नाही.

निवडणुकीत पराभव झाला की आत्मपरीक्षण करण्याऐवजी मित्रपक्षाला दोष देणे, ही राजकीय सोय असते. भाजपने नागपूरमध्ये गमावलेली जागा ही शिंदे शिवसेनेच्या मतांमुळे गेली, असे म्हणणे राजकीय वास्तवाला धरून नाही. नागपूर हा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा गृहजिल्हा, संघाचे मुख्यालय असलेला परिसर आणि भाजपची दीर्घकाळची राजकीय ताकद असलेला मतदारसंघ. तिथे पराभव झाला, याचा अर्थ भाजपच्या संघटनात्मक ताकदीचेही आत्मपरीक्षण आवश्यक आहे. पुण्यातील पराभव आणि छत्रपती संभाजीनगरमधील राष्ट्रवादीच्या अपयशाची कारणेही स्वतंत्रपणे तपासावी लागतील. प्रत्येक अपयशाचे खापर शिंदेंवर फोडून भाजपला स्वतःची जबाबदारी झटकता येणार नाही.

महायुतीतील संघर्षाचा दुसरा महत्त्वाचा पैलू म्हणजे स्थानिक स्वराज्य संस्थांमधील राजकीय वर्चस्व. विधानसभा आणि लोकसभेच्या निवडणुकीत एकत्र लढायचे, सत्तेत एकत्र राहायचे; पण नगरपालिका, महापालिका, जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकीत मात्र एकमेकांच्या विरोधात उभे राहायचे, अशी विसंगत राजकीय परिस्थिती अनेक ठिकाणी दिसते. प्रत्येक पक्षाला आपली संघटनात्मक ताकद वाढवायची आहे. भाजपला राज्यात अधिकाधिक मतदारसंघांवर वर्चस्व निर्माण करायचे आहे, तर शिंदे शिवसेनेला आपला स्वतंत्र मतदारवर्ग आणि शिवसैनिकांची ताकद टिकवायची आहे. त्यामुळे जागावाटप हा केवळ निवडणुकीपुरता विषय राहिलेला नाही. तो दोन्ही पक्षांच्या भविष्यातील अस्तित्वाचा आणि नेतृत्वाच्या प्रतिष्ठेचा प्रश्न बनला आहे.

स्थानिक पातळीवर मनसेसोबतच्या समीकरणांवरूनही भाजप आणि शिंदे शिवसेनेत मतभेद असल्याचे दिसते. कल्याण-डोंबिवलीसारख्या भागात स्थानिक राजकीय समीकरणे राज्यातील महायुतीच्या धोरणाशी जुळतीलच असे नाही. भाजपला स्थानिक पातळीवर स्वतंत्र निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य हवे आहे, तर शिंदे शिवसेनेला आपल्या राजकीय सोयीनुसार मित्र जोडण्याची मुभा अपेक्षित आहे. मग युतीचा धर्म केवळ शिंदे शिवसेनेनेच पाळायचा आणि भाजपने मात्र आपल्या राजकीय सोयीनुसार भूमिका बदलायची, असा प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक आहे.

भाजपला एकनाथ शिंदे यांची गरज संपली आहे का, या प्रश्नाचे उत्तर शोधताना दोन्ही बाजूंचे राजकीय गणित समजून घ्यावे लागेल. भाजपची स्वतःची संघटनात्मक ताकद मोठी असली, तरी शिंदे शिवसेनेचा स्वतंत्र मतदारवर्ग, आमदार, खासदार, स्थानिक नेते आणि कार्यकर्त्यांचे जाळे दुर्लक्षित करता येणार नाही. विशेषतः मुंबई, ठाणे, कोकण आणि काही शहरी भागांमध्ये शिंदे शिवसेनेचे राजकीय महत्त्व आहे. त्यामुळे शिंदे यांना पूर्णपणे बाजूला करणे भाजपसाठी राजकीयदृष्ट्या सोपे नाही. दुसरीकडे शिंदे यांनाही भाजपच्या पाठिंब्याशिवाय राज्याच्या सत्ताकारणात आपले स्थान टिकवणे आव्हानात्मक ठरू शकते. दोघांचीही गरज एकमेकांना आहे; मात्र कोण कोणावर किती अवलंबून आहे, हे ठरवण्याची स्पर्धा सुरू झाली आहे.

यात भाजपची दीर्घकालीन रणनीती अधिक महत्त्वाची आहे. मित्रपक्षांच्या बळावर सत्ता मिळवायची आणि त्याचवेळी स्वतःचे संघटन विस्तारून मित्रपक्षांवरील अवलंबित्व कमी करायचे, ही भाजपची राजकीय वाटचाल राहिली आहे. त्यामुळे शिंदे शिवसेनेच्या वाढत्या महत्त्वाकांक्षेकडे भाजप संशयाने पाहत असेल, तर त्यात आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. मात्र, मित्रपक्षाला केवळ सत्तेतील संख्याबळापुरते मर्यादित ठेवण्याचा प्रयत्न झाला, तर त्यातून संघर्ष अधिक तीव्र होणार आहे. शिंदे यांच्यासमोरही प्रश्न आहे की, भाजपच्या राजकीय विस्ताराला साथ देताना स्वतःच्या पक्षाचे स्वतंत्र अस्तित्व आणि नेतृत्वाची प्रतिष्ठा कशी टिकवायची?

विधान परिषद निवडणुकीतील पराभव हा महायुतीसाठी केवळ पाच जागांमधील तीन जागा गमावण्याचा विषय नाही. तो युतीतील परस्पर विश्वासाला बसलेला धक्का आहे. आज आरोप-प्रत्यारोप सुरू आहेत, उद्या स्थानिक निवडणुकांमध्ये जागावाटपावरून संघर्ष होईल आणि परवा नेतृत्वाच्या मुद्द्यावरून मतभेद उफाळून येतील. ही शक्यता नाकारता येत नाही. एकनाथ शिंदे यांची मुख्यमंत्रीपदाची महत्त्वाकांक्षा आणि भाजपचे राज्यातील निर्विवाद वर्चस्व निर्माण करण्याचे उद्दिष्ट यांच्यात समन्वय कसा साधला जाणार, हेच महायुतीच्या भवितव्याचे खरे आव्हान आहे.

शेवटी, राजकारणात युती केवळ सत्तेसाठी केली जाते; पण ती टिकवण्यासाठी विश्वास, परस्पर सन्मान आणि समन्वय आवश्यक असतो. केवळ संख्याबळाच्या जोरावर मित्रपक्षाला दुय्यम ठरवता येईल, असे भाजपला वाटत असेल, तर ते राजकीय गणित चुकीचे ठरू शकते. त्याचवेळी मुख्यमंत्रीपदाची महत्त्वाकांक्षा बाळगून प्रत्येक राजकीय संघर्षाला प्रतिष्ठेचा प्रश्न बनवणे शिंदे शिवसेनेलाही परवडणारे नाही. दोन्ही पक्षांनी एकमेकांना संपवण्याऐवजी स्वतःच्या मर्यादा आणि ताकद ओळखणे आवश्यक आहे.

महायुतीतील खरी लढाई विरोधकांशी आहे की सत्तेतील मित्रांशी, हा प्रश्न आता महाराष्ट्राच्या राजकारणात अधिक महत्त्वाचा ठरतो आहे. मित्रपक्षाला संपवून स्वतः मोठे होण्याच्या राजकारणात कदाचित तात्पुरता फायदा मिळेल; पण त्यातून निर्माण होणारी राजकीय पोकळी विरोधकांना संधी देऊ शकते. त्यामुळे भाजपला शिंदे यांची गरज संपली आहे, असे समजणे घाईचे ठरेल. मात्र शिंदे यांना भाजपच्या राजकीय वर्चस्वाखाली कायम राहायचे नाही, हेही तितकेच स्पष्ट आहे. महायुती टिकणार की सत्तेतील ही अंतर्गत कुरघोडी भविष्यात नव्या राजकीय समीकरणांना जन्म देणार, याचे उत्तर आगामी निवडणुकांमधूनच मिळेल.

३३ वर्षांच्या क्रीडासेवेचा गौरव; धनंजय देवकर यांना भावपूर्ण निरोप

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

श्रीरामपूर (गौरव डेंगळे) : विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान न देता खेळाच्या माध्यमातून शिस्त, संघभावना, नेतृत्वगुण आणि जिद्दीचे संस्कार घडविणारे सोमय्या विद्याविहार संचलित श्री शारदा इंग्लिश मीडियम स्कूल, कोपरगाव येथील क्रीडा विभागप्रमुख धनंजय देवकर यांच्या ३३ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनिमित्त सेवापूर्ती सोहळा उत्साहपूर्ण आणि भावनिक वातावरणात पार पडला.



देवकर यांनी तब्बल ३३ वर्षे शाळेच्या क्रीडा विभागात कार्यरत राहून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी मोलाचे योगदान दिले. क्रीडा शिक्षक आणि विभागप्रमुख म्हणून त्यांनी हँडबॉल, थ्रोबॉल, व्हॉलीबॉल, बास्केटबॉल आदी खेळांचे प्रशिक्षण देत अनेक गुणवंत खेळाडू घडविले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी विविध क्रीडा स्पर्धांमध्ये सहभाग घेत शाळेचा नावलौकिक वाढविला.

खेळ हे केवळ मनोरंजनाचे साधन नसून व्यक्तिमत्त्व विकासाचे प्रभावी माध्यम आहे, हा विचार त्यांनी विद्यार्थ्यांमध्ये रुजविला. मैदानावर खेळताना शिस्त, वेळेचे महत्त्व, सांघिक भावना, नेतृत्व आणि पराभवातून पुन्हा उभे राहण्याची जिद्द विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. विद्यार्थ्यांच्या यशात आनंद मानणारे आणि अडचणीच्या काळात त्यांना आधार देणारे मार्गदर्शक म्हणून त्यांनी वेगळी ओळख निर्माण केली.

या सोहळ्यास शाळेचे प्राचार्य के. एल. वाकचौरे, उपप्राचार्य, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, देवकर यांचे आजी-माजी सहकारी, स्नेही, हितचिंतक आणि क्रीडाप्रेमी उपस्थित होते. यावेळी मान्यवरांनी देवकर यांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या ३३ वर्षांच्या सेवाप्रवासातील आठवणींना उजाळा दिला. त्यांच्या कामातील शिस्त, विद्यार्थ्यांशी असलेले जिव्हाळ्याचे नाते आणि क्रीडा क्षेत्राप्रती असलेली निष्ठा यांचा विशेष उल्लेख करण्यात आला.

एकाच शाळेत तीन दशकांहून अधिक काळ काम करताना निर्माण झालेली नाती, विद्यार्थ्यांचे प्रेम आणि सहकाऱ्यांची साथ यामुळे सोहळ्याला भावनिक किनार लाभली. सेवापूर्ती म्हणजे केवळ नोकरीचा शेवट नसून प्रदीर्घ कार्याचा गौरव असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

मनोगत व्यक्त करताना धनंजय देवकर यांनी संस्थेचे व्यवस्थापन, प्राचार्य, सहकारी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी आणि कुटुंबीयांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. शाळेने आपल्याला कामाची संधी देण्याबरोबरच प्रेम, आपुलकी आणि आयुष्यभर जपाव्यात अशा असंख्य आठवणी दिल्या. शारदा परिवाराशी असलेले नाते यापुढेही कायम राहील, अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

भैरवनाथ गडावर भाविकांचा जनसागर ; 'वाट' विधीत ४५ महिलांचा सहभाग

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

राजूर : अकोले तालुक्यातील शिरपुंजे येथील भैरवनाथ गडावर दिवाळीच्या पूर्वसंध्येला आश्विन महिन्यात भरणाऱ्या यात्रेला यंदा १५ ते २० हजार भाविकांनी हजेरी लावली. राजूरपासून सुमारे २५ किलोमीटर अंतरावर असलेल्या या गडावर राज्याच्या कानाकोपऱ्यातून भाविक दर्शनासाठी दाखल झाले होते.

या यात्रेचे वैशिष्ट्य म्हणजे 'वाट' हा पारंपरिक विधी. अपत्यप्राप्तीची इच्छा असलेल्या महिला पायथ्यापासून केसांनी रस्ता झाडत गडावर जातात. यंदा या विधीत ४५ महिलांनी सहभाग घेतला. भैरवनाथ हे आदिवासी समाजाचे आराध्य दैवत असल्याने नवीन भातपिकाचा नैवेद्य सर्वप्रथम गडावर अर्पण करण्याची परंपराही यावेळी जपण्यात आली.

गडावर भाविकांची मोठी गर्दी झाल्याने दर्शनासाठी झुंबड उडाली होती. वन विभागाने ठिकठिकाणी संरक्षक कठडे उभारल्याने भाविकांना दिलासा मिळाला. वनपरिक्षेत्र अधिकारी प्रतिभा सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली वन कर्मचाऱ्यांनी बंदोबस्त ठेवला. राजूर पोलिसांच्या वतीने सहायक पोलीस निरीक्षक किशोर पवार व पोलीस उपनिरीक्षक परसराम तागड यांनी व्यवस्था सांभाळली. आमदार डॉ. किरण लहामटे व माजी सभापती मारुती मेंगाळ यांनी यात्रेला भेट दिली. यात्रा समिती व भैरवनाथ तरुण मित्र मंडळानेही नियोजनात सहभाग घेतला.

देशीदारु दुकानातून दारुची चोरी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

नेवासा : तालुक्यातील चिलेखनवाडी शिवारातील देशी दारू दुकानाचे उजव्या बाजुची खिडकीचे गज वाकलेले दुकानातील ७० हजार ६८६ रुपये किंमतीचे देशी दारुची चोरी झाल्याची घटना दि.३० ऑक्टोबरच्या रात्री घडली.



याबाबद देशी दारू दुकानाचे मालक सुजित अशोक मंडलिक (वय ४० वर्षे) रा.कुकाणा ता. नेवासा यांनी नेवासा पोलीस स्टेशनला दिलेल्या फिर्यादित महंटले आहे की, मी कुटुंबासह कुकाणा येथे राहातो, माझे वहीनीचे नावे चिलेखनवाडी शिवारात पुष्पक देशी दारु दुकान असुन ते सध्या मी चालवित आहे. दि.३० ऑक्टोबर २०२६ रोजी रात्री १० वाजेचे सुमारास सदर देशी दारु दुकान हे बंद करुन माझ्या राहत्या घरी कुकाणा येथे जेवण करुन झोपी गेलो होतो. त्यानंतर दि.३१ रोजी सकाळी ८:३० वाजेचे सुमारास मी देशी दारु दुकान नेहमी प्रमाणे उघडले असता दुकानाच्या उजव्या बाजुची खिडकीचे गज वाकलेले व खिडकी उघडी दिसली. त्यावेळी मी दुकानात जावुन पाहणी केली असता आत मधिल गोडाउनचा दरवाजा उघडलेला दिसला. तेव्ही मी आत जावुन पाहीले असता, दुकानचे गोडाउन मधील देशी दारुचे काही बॉक्स कमी दिसले. त्यानंतर मी ते आसपास पाहीले,पण ते मिळुन आले नाही. त्यावेळी माझी खात्री झाली की कोणीतरी अनोळखी चोरट्याने माझ्या देशी दारु दुकानाची खिडकीचे गज वाकुन आत प्रवेश करुन अनोळखी चोरट्याने गोडावुन मधील ७० हजार ६८६ रुपये किंमतीचे देशी दारुचे २१ बॉक्स चोरुन नेले आहे. या फिर्यादिवरून अनोळखी चोरट्या विरुध्द नेवासा पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ३०५(अ),३३१(४) नुसार गुन्हा दाखल।करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांच्या मार्गदर्शनाखाली हेड कॉन्स्टेबल भानाजी काळोखे पुढील तपास करीत आहे.

बंडखोरी, कुरघोड्यांमुळे जिल्हा बँक निवडणुकीत प्रचंड चुरस

' उद्या मतदान, परवा फैसला..... कोणाची सरशी का चमत्कार....!

शफीक बागवान । राष्ट्र सह्याद्री

श्रीरामपूर- अहिल्या नगर जिल्हा सहकारी बँकेच्या निवडणुकीत अंतिम टप्प्यात कमालीची सुरस निर्माण झाली आहे बंडखोरी आणि कुरघोड्यांमुळे निवडणूक मोठ्या प्रमाणात गाजत आहे. सहकार परिवर्तन पॅनल विरुद्ध सहकार विकास आघाडी मध्ये ही निवडणूक होत आहे. राज्य मंत्रिमंडळात मांडीला मांडी लावून बसणाऱ्या पक्षांचीच नेते या निवडणुकीत एकमेकांच्या विरोधात ठाण मांडून बसले आहेत.

जिल्हा बँकेच्या २१ जागेंपैकी अकरा जागा यापूर्वीच बिनविरोध झाल्या आहेत उर्वरित १० जागांसाठी ही निवडणूक होत आहे. ३ हजार ८०० एकूण मतदार असलेल्या या बँकेवर सुमारे २ हजार ८०० रुपयांचे कर्ज आहे. उद्या सोमवार दि.२ नोव्हेंबर रोजी या दहा जागांसाठी मतदान होणार आहे तर ३ नोव्हेंबर रोजी अमर ज्योत लॉन्स नगर कल्याण बायपास नेप्ती अहिल्यानगर येथे या निवडणुकीच्या मतमोजणीस सकाळी ९ वाजता प्रारंभ होणार आहे. प्रशासनाची निवडणुकीसह मतमोजणीची देखील तयारी पूर्ण झाली आहे.


भाजप, शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी अजित पवार गट मध्येच ही निवडणूक आमने-सामने होत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांचे विश्वासू विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे यांनी या निवडणुकीत रंग भरला आहे. शरद पवार गटाच्या राष्ट्रवादीकडून खासदार निलेश लंके मैदानात आहेत. काँग्रेसचे बाळासाहेब थोरात यांनी पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांच्याबरोबर युती केल्यामुळे शरद पवार हे नाराज आहेत सोशल मीडियावर त्यांनी ही नाराजी व्यक्त केली आहे. राहुरी तालुक्यात भाजपचे आमदार प्राजक्त तनपुरे विरुद्ध सत्यजित कदम अशी अटीतटीची लढत होत आहे. अकोल्यात राखीव मतदार संघातून माजी आमदार वैभव पिचड विरुद्ध प्रशांत लोखंडे तर सोसायटी मतदारसंघातून आमदार डॉ. किरण लहाने विरुद्ध संजीवनी शिंदे मैदानात आहेत. पारनेर मध्ये खासदार निलेश लंके यांच्या विरोधात राहुल शिंदे यांनी दंड थोपटले आहे. कर्जत मतदारसंघात तुषार पिसाळ विरुद्ध ज्योती शिंदे निवडणूक लढवीत आहेत. शेतीपूरक व शेतीमाल प्रक्रिया मध्ये आमदार आशुतोष काळे विरुद्ध सुधीर मस्के एकमेकांच्या विरोधात उभे ठाकले आहेत.

हर्षदा काकडे, पुष्पा गायकवाड मंजुषा गुंड, अनुराधा नागवडे, सुवर्ण पाचपुते, संध्या महांडुळे संगीता वाघ या महिला राखीव मतदार संघातून आपापले नशीब आजमवित आहेत. इतर मागासवर्गीय मतदार संघातून शिवदास गुंजाळ कारभारी जावळे जालिंदर वाकचौरे कडूचंद शेटे आजिनाथ हजारे निवडणूक लढवीत आहेत तर विमुक्त जाती भटक्या जमाती राखीव मतदारसंघातून सुभाष गीते ऋषिकेश ढाकणे आणि गणपतराव कांबळे निवडणूक लढवीत आहेत. या बँकेच्या निवडणुकात कोणाची सरशी होते का चमत्कार होतो हे अजमावण्यासाठी मतमोजणी होऊ द्यावी लागणार आहे.

कारखाने जर भाव जाहीर करत नसेल तर आंदोलन: शेतकरी संघटनेची बैठक

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

नेवासा : नेवासा तालुक्यातील राजकीय सामाजिक धार्मिक क्षेत्रात अग्रगण्य समाजल्या जाणाऱ्या म्हाळसपिंपळगाव येथे क्रांतिकारी शेतकरी संघटनेची बैठक पार पडली त्यामध्ये २०२६-२७ ऊस गळीतास जात असताना अजून कुठल्याही प्रकारचा भाव जाहीर झाला नाही. येत्या आठ दिवसांत उस उचलणारे कारखाने भाव जर का जाहीर करत नसतील तर भव्य आंदोलन करण्यात येईल असे आवाहन महाराष्ट्र राज्य कार्याध्यक्ष क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे नेते अंबादास कोरडे यांनी बैठकीत केले. यावेळी सुनिलराव कर्डिले यांना




क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या उपजिल्हाप्रमुख म्हणून निवडीचे पत्र देण्यात आले युवा जिल्हा प्रमुख अंज्याबापू काळे, म्हाळसपिंपळगाव शाखा प्रमुख म्हणून प्रसाद आहेर यांची निवड करण्यात आली. यावेळी नानासाहेब आहेर सुरेश चव्हाण आदिनाथ कर्डिले बद्रीनाथ रावसाहेब कर्डिले अंकुश कर्डिले सखाराम शिंदे अशोक आहेर गणेश आहेर संतराम कर्डिले लक्ष्मण कर्डिले कारभारी आहेर बाबूराव आहेर इत्यादी उपस्थित होते महाराष्ट्र भयानक दुष्काळ परीस्थिती आहे पाणी, चारा रोजगार पाऊसा अभावि पिके जळून खाक झाली. उसासारख्या पिकांची वाढ झालेली नाही तशातच रब्बी पिकांचे प्रश्न आ वासून उभा आहे शेतकरी पार हवालदिल झाला आहे सरकारने तुटपुंजी मदत जाहीर केली, निदान हेक्टरी एक लाखाची मदत जाहीर करायला पाहिजे तरच शेतकरी दुष्काळातून सावरु शकतो येणाऱ्या काळात दुष्काळी संकाटांचा सामना करावा लागणार असल्याचा निर्धार करण्यात आला. यावेळी जिल्हाप्रमुख दौलतराव गणगे,नेवासा तालुकाध्यक्ष पुर्व रज्जाक पटेल,तालुकाध्यक्ष पश्चिम राहूल जायगुडे,तालुकाध्यक्ष मन्सूर भाई पटेल उपस्थित होते. जिल्हाउपप्रमुख सुनीलराव कर्डीले यांनी प्रास्ताविक केले तर म्हाळसपिंपळगाव शाखा प्रमुख प्रसाद आहेर यांनी उपस्थितांचे आभार मानले.

शून्यातून विश्व निर्माण करणारे उद्योजक संघपती रमेश लोढा!

व्यवसायातील सचोटी, सामाजिक बांधिलकी आणि कौटुंबिक संस्कारांचा प्रेरणादायी प्रवास....

प्रतिकूल परिस्थितीवर मात करीत कर्तृत्वाच्या बळावर यशाचे शिखर गाठणारी माणसे समाजासाठी नेहमीच प्रेरणादायी ठरतात. संघर्ष, जिद्द, दूरदृष्टी, व्यावसायिक सचोटी आणि सामाजिक बांधिलकी या गुणांच्या जोरावर स्वतःचे वेगळे स्थान निर्माण करणारे श्रीरामपूर शहरातील प्रतिष्ठित व्यापारी व उद्योजक तसेच श्री. स्थानकवासी जैन संघाचे संघपती रमेश इंद्रभान लोढा यांचा २ नोव्हेंबर रोजी ७८ वा वाढदिवस साजरा होत आहे. त्यांच्या जीवनप्रवासाकडे पाहताना एका सामान्य कुटुंबातून आलेल्या व्यक्तीने स्वकर्तृत्वावर उभे केलेले यशस्वी विश्व आणि त्यामागील सामाजिक जाणिवांचा प्रत्यय येतो. मूळचे कमालपूर येथील इंद्रभान चंद्रभान लोढा यांचे द्वितीय चिरंजीव असलेल्या रमेशजींनी अत्यंत सामान्य परिस्थितीतून आपल्या व्यावसायिक प्रवासाला सुरुवात केली. किराणा दुकानदारी करणाऱ्या कुटुंबातून श्रीरामपूरसारख्या शहरात येऊन रिअल इस्टेट आणि औद्योगिक क्षेत्रात स्वतःची ओळख निर्माण करणे ही त्यांची गरुडझेप निश्चितच उल्लेखनीय आहे.




१९७० च्या दशकात त्यांनी व्यवसायाला सुरुवात केली. डावकर मळा, खिलारी वस्ती, दशमेश नगर, मार्केट यार्डमागील परिसर तसेच शहरातील प्रमुख रस्त्यांच्या आजूबाजूच्या अनेक मालमत्ता व भूखंड विकसित करण्यात त्यांचे महत्त्वपूर्ण योगदान राहिले. काळाची गरज ओळखून गुंतवणूक आणि विकासाची दिशा निश्चित करण्याची त्यांची दूरदृष्टी त्यांच्या यशाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य ठरली.

१९९१ मध्ये त्यांनी नगर एमआयडीसीमधील सुमारे दीड कोटी रुपयांच्या तोट्यात असलेली अहमदनगर इंडस्ट्रियल गॅसेस प्रायव्हेट लिमिटेड ही कंपनी ताब्यात घेतली. आव्हानात्मक परिस्थितीतही व्यावसायिक सचोटी, नियोजन आणि अथक परिश्रमांच्या जोरावर त्यांनी या कंपनीला नफ्यात आणले. कुटुंबातील प्रत्येक सदस्याने त्यांना त्यासाठी मोलाची साथ दिली. आज श्रीरामपूर व अहिल्यानगर एमआयडीसीसह जिल्ह्यात आणि जिल्ह्याबाहेर औद्योगिक ऑक्सिजन गॅसचा पुरवठा करण्यात या उद्योगाचा महत्त्वाचा सहभाग आहे. त्यांच्या सामाजिक उत्तरदायित्वाची खरी प्रचिती कोरोना महामारीच्या संकटात आली. ऑक्सिजनअभावी रुग्णांचे प्राण धोक्यात आले असताना रमेशजींनी पुढाकार घेत रुग्णालयांना ऑक्सिजन पुरवठ्याची जबाबदारी स्वीकारली. एवढेच नव्हे, तर पाच मेट्रिक टन क्षमतेचा स्वतंत्र ऑक्सिजन प्लांट उभारून अहिल्यानगर जिल्ह्यात ऑक्सिजनचा तुटवडा भासू नये, यासाठी त्यांनी मोलाचे योगदान दिले. व्यवसाय हा केवळ नफा कमावण्याचे साधन नसून समाजाच्या गरजेच्या वेळी उपयोगी पडण्याचे माध्यमही असले पाहिजे, हा त्यांचा दृष्टिकोन यातून अधोरेखित झाला. उद्योग-व्यवसायाबरोबरच धार्मिक, सामाजिक आणि कौटुंबिक मूल्यांची जपणूक हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे आणखी एक वैशिष्ट्य आहे. स्थानकवासी जैन श्रावक संघाचे संघपती म्हणून सन १९९७ पासून आजतागायत कार्यरत आहेत. ते धार्मिक व सामाजिक उपक्रमांत नेहमी सक्रिय सहभाग घेतात. स्वतः पुढाकार घेण्याबरोबरच इतरांनाही सेवाकार्यासाठी प्रेरित करतात. ौटुंबिक संस्कारांच्या बाबतीतही लोढा कुटुंबाचा आदर्श श्रीरामपूर आणि अहिल्यानगर जिल्ह्यात घेतला जातो. मोठे बंधू स्वर्गीय कांतीलालजी आणि लहान बंधू विलासजी यांच्यासह आजही एकत्रित कुटुंबपद्धती जपणारे रमेशजी आपल्या तिन्ही बहिणींवरही जीवापाड प्रेम करतात. जिजाबाई मनसुखलाल कुंकूलोळ (कोल्हार), स्वर्गीय विमलबाई मोहनलाल लुंकड (पुणे) आणि शकुंतला रमेश ओस्तवाल (मालेगाव) यांच्याशी असलेले त्यांचे जिव्हाळ्याचे नाते त्यांच्या कौटुंबिक संस्कारांची साक्ष देते. हीच संस्काराची शिदोरी घेऊन त्यांची मुले कमलेश भारती आणि लोकेश उद्योग व्यवसायासह सामाजिक उत्तरदायित्वही उत्तमपणे निभावत आहेत. यशस्वी उद्योजक होण्यासाठी केवळ भांडवल नव्हे, तर जिद्द, प्रामाणिकपणा, दूरदृष्टी आणि माणुसकीची जोड आवश्यक असते, हे संघपती रमेश इंद्रभान लोढा यांनी आपल्या कर्तृत्वातून सिद्ध केले आहे. नव्या पिढीने उद्योग उभारताना सामाजिक भान आणि उत्तरदायित्वही जपले पाहिजे, हा त्यांचा जीवनसंदेश विशेष महत्त्वाचा आहे. वयाची ७८ वर्षे पूर्ण करताना त्यांच्या आयुष्याचा हा प्रेरणादायी प्रवास अनेकांसाठी दिशादर्शक ठरत आहे. त्यांच्या पुढील आयुष्यास उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य आणि आनंद लाभो, हीच मनःपूर्वक शुभेच्छा!

दिवाळीनिमित्त श्री संत गाडगे महाराज आश्रम शाळेत मुलांना फराळ, कपडे व साहित्याचे वाटप

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

राहुरी : शहरातील श्री संत गाडगे महाराज आश्रम शाळा येथे दिवाळी पहाट, भाऊबीज व दीपावली निमित्त विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विद्यार्थ्यांना नवीन कपडे, दिवाळीचा फराळ, शृंगार साहित्य तसेच दोन मुलींना सायकलींचे वाटप करण्यात आल्याने विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता. दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर सर्वप्रथम शाळेचा परिसर, वर्गखोल्या व वसतिगृहाची स्वच्छता करण्यात आली. विद्यार्थिनींनी स्वतः तयार केलेल्या आकर्षक आकाश कंदिलांनी संपूर्ण इमारतीची सजावट करण्यात आली होती. शनिवार, दि. ३१ ऑक्टोबर २०२६ रोजी पहाटे पाच वाजल्या पासून दिवाळी पहाट कार्यक्रमाला सुरुवात झाली. विद्यार्थ्यांना सुगंधी उटणे व शाम्पू लावून स्नान घालण्यात आले. त्यानंतर सुगंधी तेल लावून दिवाळी पहाट उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी वसतिगृहातील विद्यार्थ्यांनी कर्मचारी मामा, अधीक्षक, अधीक्षिका व शिक्षक यांच्या समवेत



फटाक्यांची आतषबाजी केली. विद्यार्थ्यांनी सुरक्षिततेची काळजी घेत लहान-मोठे फटाके फोडत दिवाळीचा आनंद लुटला. सकाळी आठ वाजता वसतिगृहातील मुलींनी मुलांचे औक्षण करून भाऊबीजेचा सण साजरा केला. त्यानंतर मुलींनीही शिक्षक व मुख्याध्यापक यांच्या समवेत शाळेच्या आवारात फटाके फोडून आनंद व्यक्त केला. सकाळी दहा वाजता सांस्कृतिक सभागृहात फराळ व साहित्य वाटप कार्यक्रम पार पडला.

यावेळी विद्यार्थ्यांना शेव, चिवडा, शंकरपाळे, मोतीचूर लाडू, बर्फी असा दिवाळीचा फराळ तसेच नवीन रंगीत कपड्यांचे वाटप करण्यात आले. मुलींना तेल, साबण, टूथपेस्ट, मेहंदी कोन, नेलपेंट, टिकली, हेअरपिन व शाम्पू यांसारख्या शृंगार व दैनंदिन वापरातील साहित्याचे वाटप करण्यात आले. शिरसाठ भेळवाले यांनी दोन मुलींना नवीन सायकली भेट दिल्या. या भेटीमुळे विद्यार्थिनींच्या आनंदात आणखी भर पडली. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक, चतुर्थश्रेणी कर्मचारी व उपस्थित पालकांनी विद्यार्थ्यांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या. तसेच सुरक्षित पद्धतीने दिवाळी साजरी करण्या बाबत मार्गदर्शन केले. दिवाळीच्या सुट्टीनंतर शाळेच्या पहिल्याच दिवशी सर्व विद्यार्थ्यांनी नियमितपणे उपस्थित राहावे, अशा सूचनाही देण्यात आल्या. या संपूर्ण उपक्रमात शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक, सर्व कर्मचारी व मोठ्या संख्येने पालक सहभागी झाले होते. विद्यार्थ्यांना दिवाळीचा आनंद, आपुलकी आणि स्नेहाची अनुभूती देणारा हा उपक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26)

द•ख•ल

वैजापूर-पुणे बससेवा श्रीरामपूरमार्गे सुरू

श्रीरामपूर : वैजापूर बस आगाराच्या वतीने वैजापूर-पुणे ही बससेवा श्रीरामपूरमार्गे सुरू करण्यात आली आहे. त्यामुळे या मार्गावरील ग्रामीण भागातील प्रवाशांना थेट पुण्याला जाण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे. प्रवासी संघटनेचे अध्यक्ष रणजित श्रीगोड यांनी ही माहिती दिली. ही बससेवा सुरू करण्यासाठी प्रवासी संघटनेने एसटी महामंडळाचे वाहतूक विभागाचे महाव्यवस्थापक नितीन मैड यांच्याकडे पाठपुरावा केला होता. त्यानंतर संभाजीनगर येथे झालेल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बैठकीत नाशिक व संभाजीनगर प्रादेशिक व्यवस्थापकांनी या सेवेला मंजुरी दिली. ही बस सकाळी ८.१५ वाजता वैजापूरहून निघून हरेगाव, श्रीरामपूर, बेलापूर, देवळाली प्रवरा व राहुरीमार्गे पुण्याला जाईल. परतीच्या प्रवासात दुपारी ३ वाजता पुण्याहून सुटेल. बससेवा सुरू केल्याबद्दल आगार व्यवस्थापक नीलिमा इसे व वाहतूक अधीक्षक गोपाळ पगारे यांचे प्रवासी संघटनेने अभिनंदन केले. ही सेवा कायमस्वरूपी सुरू ठेवून त्यासाठी नवीन बस उपलब्ध करून द्यावी, अशी मागणीही संघटनेने केली आहे.

बेलापूरातील दोन रस्त्यासाठी ३० लाखाचा निधी मंजूर

बेलापूर : पालकमंत्री राधाकृष्ण विखे तसेच माजी खा.डॉ. सुजय विखे यांच्या माध्यमातून बेलापूरातील मेनरोड तसेच अरुणकुमार वैद्य पथ या दोन रस्त्याच्या कामासाठी जिल्हा नियोजन समितीच्या नागरी सुविधा निधीतून ३० लाखाचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या रस्त्यांची कामे व्हावी अशी अनेक दिवसापासून नागरिकांची मागणी होती.बेलापूर गावातील मेनरोड तसेच अरुणकुमार वैद्य पथ या रस्त्याच्या कामासाठी निधी मिळण्यासंदर्भात जिल्हा परिषद सदस्य शरद नवले, बाजार समितीचे माजी उपसभापती अभिषेक खंडागळे, भाजपा शहर अध्यक्ष प्रफुल्ल डावरे यांनी पालकमंत्री ना. विखे यांचेकडे सातत्याने पाठपुरावा केला होता. या प्रयत्नास यश आले असून जिल्हा नियोजन समितीच्या नागरी सुविधा निधीमधून मेनरोडच्या कामासाठी १५ लाख तसेच अरुण कुमार वैद्यपथ रस्त्यासाठी १५ लाख असा एकूण ३० लाख रुपयाचा निधी मंजूर करण्यात आला आहे.सदरचा निधी मंजूर केल्याबद्दल शरद नवले, अभिषेक खंडागळे, प्रफुल्ल डावरे यांनी नामदार राधाकृष्ण विखे व माजी खा. डॉ. सुजय विखे यांना धन्यवाद दिले आहेत.

अन्यायकारक बदलीविरोधात मुख्याध्यापकाचा आत्मदहनाचा इशारा

राहुरी : राहुरी येथील श्री संत गाडगे महाराज आश्रमशाळेचे मुख्याध्यापक मिलिंद गुजरे यांनी कथित अन्यायकारक बदलीच्या निषेधार्थ ६ नोव्हेंबर रोजी नाशिक येथील आदिवासी विकास विभागाच्या आयुक्त कार्यालयात आत्मदहन करण्याचा इशारा दिला आहे. यासंदर्भात त्यांनी लोणी पोलीस ठाण्यात निवेदन दिले आहे. गुजरे यांनी बदलीचा पुनर्विचार करण्यासाठी संस्थेकडे वारंवार पत्रव्यवहार केला आहे. अपर आयुक्त, आदिवासी विकास विभाग, नाशिक यांनीही संस्थेला याबाबत निर्देश दिल्याचे त्यांनी निवेदनात म्हटले आहे. २६ सप्टेंबर रोजी विनंती अर्ज पाठवूनही संस्थेकडून निर्णय झाला नाही. त्यानंतर २१ ऑक्टोबरला आयुक्तांकडे अपील केले, तसेच २८ ऑक्टोबरला संस्थेला पुन्हा निवेदन दिले. बदलीमुळे जून २०२६ पासून वेतन मिळाले नसल्याने कुटुंबावर आर्थिक संकट ओढवले आहे. दोन्ही मुले पुण्यात उच्च शिक्षण घेत असून शुल्क भरता न आल्याने त्यांचे शिक्षणही थांबले असल्याचा दावा गुजरे यांनी केला आहे. तसेच बँकांच्या कर्जवसुलीच्या कायदेशीर नोटिसाही मिळाल्याचे त्यांनी नमूद केले. संस्थेने बदलीचा तातडीने पुनर्विचार करून सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी त्यांनी केली आहे. या निवेदनाच्या प्रती मुख्यमंत्री, पालकमंत्री, पोलीस अधीक्षक आणि आदिवासी विकास विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना पाठविण्यात आल्या आहेत.

त्रिमूर्तीचे तीन खेळाडू राष्ट्रीय क्रिकेट स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघात

राज्यस्तरीय स्पर्धेत पुणे विभागाला तृतीय क्रमांक

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



नेवासा : शालेय क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करत त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठान संचलित त्रिमूर्ती पब्लिक स्कूलच्या तीन खेळाडूंनी १९ वर्षांखालील शालेय राष्ट्रीय क्रिकेट स्पर्धे साठी महाराष्ट्र संघात स्थान मिळविले आहे. निहाल इस्माईल मुल्ला, प्रेम किरण इघे आणि वेदांत दिनेश सुंटले अशी निवड झालेल्या खेळाडूंची नावे आहेत. विशेष म्हणजे, त्रिमूर्ती क्रिकेट अकादमीचे प्रशिक्षक समीर पठाण यांची महाराष्ट्र संघाच्या क्रीडा व्यवस्थापकपदी निवड झाली आहे.

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य आणि जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, रत्नागिरी यांच्या संयुक्त विद्यमाने रत्नागिरी येथील छत्रपती शिवाजी महाराज स्टेडियमवर १९ वर्षांखालील मुलांच्या शालेय राज्यस्तरीय लेदर बॉल क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

या स्पर्धेत पुणे विभागीय संघाने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत तृतीय क्रमांक पटकावला. या संघातील त्रिमूर्तीच्या तीन खेळाडूंनी आपल्या कामगिरीच्या जोरावर राष्ट्रीय स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघात स्थान निश्चित केले. मध्य प्रदेश येथे ११ ते १५ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत राष्ट्रीय स्पर्धा होणार आहे. या स्पर्धेत निहाल, प्रेम आणि वेदांत महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करणार आहेत. त्यांच्यासोबत प्रशिक्षक समीर पठाण यांच्यावर संघ व्यवस्थापनाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

या यशाबद्दल संस्थेच्या अध्यक्षा ड. सुमतीताई घाडगेपाटील, उपाध्यक्षा ड. स्नेहल चव्हाण-घाडगे पाटील, सहसचिव डॉ. श्रुती आमले-घाडगेपाटील, विश्वस्त चेतन चव्हाणपाटील, कार्यकारी अधिकारी डॉ. गौरव आमलेपाटील, प्राचार्य सोपानराव काळे, प्राचार्या दीपाली बाविस्कर आणि विभागप्रमुख संतोष राऊत यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले. खेळाडूंना प्रशिक्षक समीर पठाण व संघ व्यवस्थापक आसिफ शेख यांचे मार्गदर्शन लाभले.

या यशामुळे त्रिमूर्ती पब्लिक स्कूलच्या क्रीडा क्षेत्रातील लौकिकात भर पडली असून राष्ट्रीय स्पर्धेतील त्यांच्या कामगिरीकडे क्रीडाप्रेमींचे लक्ष लागले आहे.

सिंहस्थ कुंभमेळा २०२७ च्या विकास आराखड्यात टोका-प्रवरासंगमचा समावेश करा : शुभम उगले



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

नेवासा : आगामी सिंहस्थ कुंभमेळा २०२७ च्या पार्श्वभूमीवर नेवासा तालुक्यातील टोका-प्रवरासंगम येथील पवित्र गोदावरी-प्रवरा नदी संगमावर भव्य घाट बांधकाम तसेच पंचमहादेव मंदिर परिसराच्या सर्वांगीण विकासासाठी विशेष निधी मंजूर करण्यात यावा अशी मागणी युवा सेनेचे उपजिल्हाप्रमुख शुभम उगले यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी शालिनीताई विखे व आमदार विठ्ठलराव लंघे यांना यांना निवेदन देऊन केली आहे. निवेदनात म्हटले आहे की नेवासा तालुक्यातील टोका-प्रवरासंगम येथे पवित्र गोदावरी आणि प्रवरा नद्यांचा संगम असून, या परिसरात सिद्धेश्वर, घटेश्वर, रामेश्वर, मुक्तेश्वर आणि गौतमेश्वर ही पाच ऐतिहासिक महादेव मंदिरे आहेत. धार्मिक, सांस्कृतिक आणि ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्व असलेल्या या तीर्थक्षेत्रात वर्षभर हजारो भाविक दर्शनासाठी तसेच पवित्र संगमावर स्नानासाठी येत असतात. आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर या परिसरात भाविकांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढण्याची शक्यता आहे. मात्र, सध्या संगम परिसरात पुरेशा घाटांची सुविधा, स्वच्छता, सुरक्षितता, प्रकाश व्यवस्था, संरक्षक कठडे, पिण्याचे पाणी आणि वाहनतळ यांसारख्या मूलभूत सुविधांचा अभाव जाणवत आहे. त्यामुळे भाविकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. विकासकामांसाठी शासनदरबारी पाठपुराव्याची मागणी सिंहस्थ कुंभमेळा २०२७ च्या विकास आराखड्यात टोका-प्रवरासंगम येथील गोदावरी-प्रवरा नदी संगमावर भव्य घाट बांधणे, जुन्या घाटांची दुरुस्ती करणे, पंचमहादेव मंदिर परिसराचे सुशोभीकरण करणे, संरक्षक कठडे उभारणे, स्वच्छतागृहे बांधणे, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, आकर्षक प्रकाशयोजना आणि वाहनतळ विकसित करणे आदी कामांचा समावेश करावा अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. या तीर्थक्षेत्राच्या विकासासाठी सौ. शालिनीताई राधाकृष्ण विखे पाटील व आमदार विठ्ठलराव लंघे पाटील यांनी शासनस्तरावर प्रभावी पाठपुरावा करून आवश्यक निधी मंजूर करण्यासाठी विशेष प्रयत्न करावेत अशी मागणी शुभम उगले यांनी केली आहे. निवेदन देतेवेळी शालीनीताई विखे, आमदार विठ्ठलराव लंघे यांच्या समवेत रत्नाताई लंघे, राजेंद्र धर्माधिकारी,पंचगंगा उद्योग समूहाचे संचालक बाळासाहेब शिंदे आदी उपस्थित होते. सिंहस्थ कुंभमेळ्याच्या निमित्ताने टोका-प्रवरासंगमचा नियोजन बद्ध विकास झाल्यास या ऐतिहासिक तीर्थक्षेत्राला नवी ओळख मिळण्यासोबतच भाविकांसाठी अधिक सुरक्षित आणि सुविधायुक्त धार्मिक पर्यटनस्थळ विकसित होण्यास मदत होणार आहे.

पाटबंधारे विभागाच्या पत्रामुळे पुणतांब्यातील शेतकरी चिंतेत

बंधाऱ्यातील पाणी केवळ पिण्यासाठी राखीव

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

पुणतांबा : गोदावरी उजव्या कालव्याच्या चितळी सिंचन शाखेमार्फत पिण्याच्या पाण्यासाठी राखीव ठेवलेल्या पाण्याचा अनधिकृत उपसा केल्यास कठोर कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आल्याने पुणतांबा परिसरातील शेतकरी चिंतेत पडले आहेत. आधीच अपुऱ्या पावसामुळे खरीप हंगाम वाया गेला असून आता रब्बी हंगामासाठी सिंचनाचे पाणी मिळणार की नाही, असा प्रश्न शेतकऱ्यांसमोर निर्माण झाला आहे.

पुणतांबा येथे गोदावरी नदीवर १९९० च्या दरम्यान तत्कालीन पाटबंधारे मंत्री अण्णासाहेब म्हस्के पाटील यांच्या प्रयत्नातून सुमारे पाव टीएमसीपेक्षा अधिक क्षमतेचा कोल्हापूर पद्धतीचा वसंत बंधारा बांधण्यात आला. पुणतांबा-रास्तापूर-डोणगाव कृती समितीच्या माध्यमातून या बंधाऱ्यात पाणी अडविण्याचे प्रयत्न केले जातात. या पाण्याचा उपयोग पिण्यासाठी तसेच शेती सिंचनासाठी होत असून सुमारे दोन हजार एकर क्षेत्राला त्याचा लाभ मिळतो.

चालू वर्षी अपुऱ्या पावसामुळे राज्य सरकारने दुष्काळ जाहीर केला आहे. त्यामुळे धरणे व बंधाऱ्यांमधील पाणी ३१ ऑगस्ट २०२७ पर्यंत केवळ पिण्यासाठी वापरण्याचे नियोजन करण्यात आले आहे. तसेच सिंचनासाठी अनधिकृतपणे पाणी उपसा केल्यास कठोर कारवाईचे निर्देश दिले आहेत.

या निर्णयामुळे बंधाऱ्याच्या लाभक्षेत्रातील ऊस पिकांसह रब्बी हंगामाचे भवितव्य अडचणीत आले आहे. गोदावरी उजव्या कालव्याची दोन आवर्तने कधी आणि किती दिवस मिळणार, याबाबतही शेतकऱ्यांमध्ये संभ्रम आहे. चितळी सिंचन शाखेच्या पत्रामुळे पुणतांबा परिसरातील शेतकऱ्यांचे शेतीच्या पाण्याचे नियोजन विस्कळीत होण्याची भीती व्यक्त होत आहे.

सदगुरू नारायणगिरी महाराज आश्रमाचा शनिवारी वर्धापन सोहळा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

नेवासा : नेवासा बुद्रुक शिवारातील सुरेगाव रस्त्यावर असलेल्या सदगुरू नारायणगिरी महाराज आश्रमाचा व मंदिराचा १२ वा वर्धापनदिन सोहळा शुक्रवार, दि. ६ नोव्हेंबर रोजी विविध धार्मिक कार्यक्रमांनी साजरा करण्यात येणार असल्याची माहिती आश्रमाचे प्रमुख महंत उद्धव महाराज मंडलिक नेवासेकर यांनी दिली. महंत उद्धव महाराज मंडलिक नेवासेकर म्हणाले की दरवर्षी हा वर्धापनदिन सोहळा वारकरी सांप्रदायातील मान्यवर महाराज मंडळी व भाविकांच्या उपस्थितीत अत्यंत भक्तिमय वातावरणात साजरा केला जातो. या प्रवचनाचा लाभ महंत उद्धवजी महाराज मंडलिक (नेवासकर) हे देणार आहेत. त्यानंतर संतसेवक नामदेवराव रघुसाहेब शिंदे (सुरेगाव गंगा, ता. नेवासा) व परिवाराच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.तसेच संतसेवेकरी विष्णुपंत ठोसर,ग्राम अधिकारी गणेश डोंगरे, वसंतराव वर्तासे, सुभाषराव गावंडे, संतोषराव थोरात, ग्राम अधिकारी ज्ञानदेव शिंदे गोरख पंचमेढे, अक्षय फोपसे, परमायदान आनंदवन परिवार, रोकडेकर भजनी मंडळ व खंबाळा यांच्या वतीने विविध प्रकारची सेवा देण्यात येणार आहे. पंचक्रोशीतील सर्व भाविक भक्तांनी मंदिराच्या होणाऱ्या वर्धापनदिन सोहळ्यात मोठ्या संख्येने सहभागी होऊन भजन, प्रवचन व महाप्रसाद सेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्री सदगुरू नारायणगिरी महाराज आश्रमाच्या वतीने करण्यात आले आहे.

दुष्काळात शेतमजूर, छोटे व्यावसायिकांच्या कर्जवसुलीलाही स्थगिती द्या ; मागणी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

टाकळीभान : राज्यातील दुष्काळी परिस्थितीचा विचार करून शेतकऱ्यांप्रमाणेच शेतमजूर, भूमिहीन कामगार, छोटे व्यावसायिक, स्वयंरोजगार करणारे नागरिक आणि शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर अवलंबून असलेल्या सर्वसामान्यांची कर्जवसुली तात्पुरती थांबवावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे मुंबई सरचिटणीस अनिल चितळे आणि टाकळीभान येथील सामाजिक कार्यकर्ते बापूसाहेब शिंदे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. दुष्काळाचा परिणाम केवळ शेतकऱ्यांपुरता मर्यादित नसून संपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्थेवर होत आहे. शेतीतील उत्पन्न घटल्याने शेतमजूर, रोजंदारी कामगार, वाहतूक व्यावसायिक, दुकानदार आणि छोटे व्यावसायिक यांच्या रोजगारावरही परिणाम झाला आहे. त्यामुळे या घटकांना आर्थिक संकटाचा सामना करावा लागत आहे. अनेक नागरिकांनी घर, वाहन, व्यवसाय तसेच दैनंदिन गरजांसाठी खासगी वित्तीय संस्था, पतसंस्था आणि वित्तपुरवठा कंपन्यांकडून कर्ज घेतले आहे. उत्पन्नाचे साधन बाधित झाल्याने त्यांना नियमित कर्जफेड करणे कठीण झाले आहे. त्यामुळे सन २०२७-२८ पर्यंत अथवा दुष्काळ परिस्थिती संपेपर्यंत वैयक्तिक, वाहन, गृह व व्यावसायिक कर्जाच्या वसुलीला तात्पुरती स्थगिती द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. याशिवाय दंडात्मक शुल्क आकारणी थांबवावी, जबरदस्तीची वसुली आणि मालमत्ता जप्तीला प्रतिबंध करावा तसेच कर्जफेडीतील विलंबामुळे नागरिकांच्या पतमानांकनावर प्रतिकूल परिणाम होऊ नये, यासाठी शासनाने आदेश काढावा, अशी मागणी निवेदनात केली आहे.

कृषी विद्यापीठाकडून दहा जिल्ह्यांतील शासकीय महाविद्यालयांच्या शैक्षणिक कामकाजाचा प्रथमच आढावा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

राहुरी : बदलते हवामान आणि दुष्काळाच्या आव्हानांचा सामना करण्यासाठी कृषी शिक्षणात काळानुरूप बदल आवश्यक आहेत.

त्यासाठी 'वर्क फोर्स ऑन वॉटर'सारखे उपक्रम राबविण्यासह नैसर्गिक व सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी प्रत्येक महाविद्यालयात जैविक निविष्ठा उत्पादन केंद्र सुरू करण्यात येणार आहे. तसेच विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिकाधारित शिक्षण देऊन त्यांच्या कौशल्यविकासासाठी विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात येणार असल्याची माहिती महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांनी दिली.

महात्मा फुले कृषी विद्यापीठात कुलगुरू डॉ. खर्चे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रथमच दोन दिवसीय शैक्षणिक आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.



या बैठकीच्या अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते.

यावेळी शिक्षण संचालक डॉ. साताप्पा खरबडे, संशोधन संचालक डॉ. प्रशांत बोडके, विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे, कुलसचिव राजेंद्रकुमार पाटील, नियंत्रक डॉ. सचिनकुमार नांदगुडे उपस्थित होते. विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी आणि पर्यावरण संवर्धनाची जाणीव निर्माण करण्यासाठी 'एक विद्यार्थी-एक झाड' आणि 'एक विद्यार्थी-एक शेतकरी' हे उपक्रम सुरू करण्यात येणार आहेत. तसेच सायबर सुरक्षा, समुपदेशन, आरोग्य आणि व्यक्तिमत्त्व विकासासाठी विशेष कार्यक्रम राबविले जातील. विद्यापीठाचे कृषी तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रत्येक महाविद्यालयात 'फुले कृषी माहिती आणि शेतकरी सन्मान कक्ष' स्थापन करण्यात येणार आहे.

महिला शेतकऱ्यांशी संवाद वाढविण्यासाठी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील प्रत्येक जिल्ह्यात 'सावित्रीबाई फुले महिला शेतकरी-शास्त्रज्ञ मंच' स्थापन केला जाणार आहे. 'फुले समृद्ध गाव' उपक्रमांतर्गत विद्यार्थी व प्राध्यापक गावांमध्ये जाऊन कृषी तंत्रज्ञानाचा प्रसार करणार आहेत. तसेच प्रत्येक महाविद्यालयात स्थानिक हवामान व गरजांनुसार एकात्मिक शेतीचे प्रात्यक्षिक घटक विकसित करण्यात येतील. संशोधनाचा दर्जा उंचावण्यासाठी उच्च दर्जाच्या नियतकालिकांमध्ये संशोधन लेख प्रकाशित करणे, बाह्य अर्थसहाय्यित प्रकल्प राबविणे आणि महाविद्यालयांच्या जमिनीवर फळपिकांची लागवड करून उत्पन्नवाढीचे प्रयत्न केले जाणार आहेत.

यावेळी डॉ. खरबडे व डॉ. ससाणे यांनीही मार्गदर्शन केले. विविध महाविद्यालयांच्या अधिष्ठात्यांनी आपल्या उपक्रमांचा आढावा सादर केला. शिक्षण, संशोधन आणि विस्तार या तिन्ही क्षेत्रांत समन्वय निर्माण करून कृषी शिक्षणाचा दर्जा उंचावण्याच्या दृष्टीने ही बैठक महत्त्वपूर्ण ठरली. प्रास्ताविक डॉ. खरबडे यांनी केले, तर सूत्रसंचालन व आभार डॉ. रवि आंधळे यांनी मानले.

जाहिर नोटीस

प्रो.फी जमा रु.
प्रो.पा.नं.
ने.ता. ९/१२/२०२६

जमीर खान
अॅडव्होकेट, श्रीरामपूर,
ता. ३१/१०/२०२६

श्रीरामपुर येथील मे. ज्युडिशियल मॅजि. साहेब वर्ग १ यांचे कोर्टात
कि.चौ.अ. क्रमांक ५७५/२०२६

नि.

श्री. फरदीन नासीर सय्यद, वय-२३ वर्षे, धंदा-मजुरी, रा. काजीबाबा दर्गा जवळ वॉर्ड नं. २, ता. श्रीरामपुर जि. अहिल्यानगर-**अर्जदार**

विरुध्द

१. मा. मुख्याधिकारी साहेब,

२. मा. जन्म मृत्यु निबंधक, श्रीरामपुर नगरपरिषद श्रीरामपुर, ता. श्रीरामपुर जि.अ.नगर-**सामनेवाले**

अर्ज- जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ च्या कलम १३-३ अ अन्वये जन्माची नोंद होण्यासाठी

ज्याअर्थी अर्जदार याचा जन्म दिनांक ३/५/२००३ रोजी काझी बाबा दर्गाह जवळ वॉर्ड नं.२ श्रीरामपुर जि.अ.नगर येथे राहते घरी झालेले आहे. तथापी सदर जन्माचे तारखेची नोंद सरकार दप्तरी झालेली नाही व अर्जदारास शासकीय कामासाठी जन्म दाखल्याची आवश्यकता असल्याने अर्जदाराने सामनेवाला कडे याबाबत मागणी केली असता सामनेवाला यांनी जा.क. २०६१/२०२६ दिनांक २० फेब्रुवारी २०२६ अन्वये जन्माची नोंद आढळून येत नसलेबाबत लेखी कळविले आहे, म्हणुन सदर अर्ज आहे.

त्याअर्थी अर्जदाराचे सदर अर्जाचे अनुषंगाने कोणाची हरकत असल्यास त्यांनी सदर जाहीर नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसांचे आत स्वतः अगर माहितगार वकील साहेबांमार्फत योग्य त्या पुराव्यानिशी या मे. कोर्टात हजर होवुन आपली हरकत नोंदवावी, अन्यथा अर्जदाराच लागलीच पुरावा घेण्यात येवुन त्यांचे मागणीप्रमाणे दाखला देणेबाबत आदेश पारीत केला जाईल.

आजरोजी माझे सहीनिशी व मे. कोर्टाचे शिक्क्यानिशी दिले असे.

शिक्का

कामगिरी क्लार्क
फौजदारी न्यायालय, श्रीरामपुर

सहायक अधिक्षक,
फौजदारी न्यायालय, श्रीरामपुर

विकास कामात खोडा घालाल तर ; जनताच तुम्हाला उत्तर देईल : आ खताळ

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

संगमनेर : तालुका म्हणजे काही जणांची जहागीरदारीच झाली होती. जमिनीचा सातबारा उतारा सर्व सामान्य शेतकऱ्यांच्या नावावरती असला, तरी प्रत्यक्ष मालकी दुसऱ्यांची असल्यासारखी परिस्थिती या तालुक्यात निर्माण झाली होती . मात्र, तालुक्यातील जनतेने परिवर्तन घडवून आणत मला काम करण्याची संधी दिली आहे परंतु ते काहीना सहन होत नाही त्यामुळे विकास कामांत विनाकारण खोडा घालण्याचे काम करत आहे त्यांना ही जनताच आगामी काळात उत्तर देईल असे रोखठोक मत आमदार अमोल खताळ यांनी व्यक्त करत विरोधकां वर निशाणा साधला.

संगमनेर तालुक्यातील पिंपळे येथे शिवसेना शाखेचे उद्घाटन आमदार अमोल खताळ यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी आयोजित कार्यक्रमात



ते बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर शिवसेनेचे ज्येष्ठ नेते नामदेव चकोर जिल्हा संघटक विठ्ठलराव घोरपडे तालुका प्रमुख राजेंद्र सोनवणे वैद्यकीय सेल जिल्हाप्रमुख डॉ संतोष डांगे भाजपचे हरिश्चंद्र चकोर गणेश सानप सौरभ देशमुख सुशील शेवाळे अमोल आंधळे अमोल चकोर आकाश चकोर सुधीर घुगे कासिम मुजावर सार्थक शेवाळे शिवसेना शाखाप्रमुख संकेत राठी उपशाखा प्रमुख हरिभाऊ ढोणे कार्याध्यक्ष बाळासाहेब चकोर रविराज चकोर अंकुश चकोर सचिव लहानु कळस्कर रघुनाथ कोटकर मच्छिंद्र कोटकर संघटक विठ्ठल कोटकर अर्जुन कोटकर विराज चकोर खजिनदार खंडू वाघ यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते

आमदार खताळ पाटील म्हणाले की सर्वसामान्य जनतेच्या आशीर्वादा मुळे आपण आमदार झालो आहोत. निवडणुका असोत अथवा नसोत, जनतेच्या सुख-दुःखात सहभागी होत त्यांचे प्रश्न सोडविणे हेच आपले कर्तव्य आहे.

सामान्य कुटुंबातून पुढे आलेला कार्यकर्ता म्हणून जनतेच्या प्रश्नांची जाण ठेवून काम करीत आहे. माझ्याकडे कोणती पदवी आहे, या पेक्षा मी जनतेसाठी काय करतो, हे अधिक महत्त्वाचे आहे. माझी नियत स्वच्छ आहे. मला माझ्या कुटुंबातील कोणालाही ठेकेदार बनवायचे नाही किंवा माझ्या मुलांना राजकारणात आणायचे नाही.

या तालुक्यातील सर्वसामान्य जनतेने दिलेले प्रेम आणि विश्वास हीच माझी खरी संपत्ती आहे असल्याचे आमदार खताळ पाटील यांनी सांगितले

दुष्काळात सत्काराऐवजी गरजूंना मदतीचा हात

दुष्काळी परिस्थितीमध्ये शेतकरी आणि गरजूंना मदत करून त्यांची दिवाळी साजरी करण्याचे आवाहन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आवाहन केले त्यांच्या आवाहना नुसार आमदार अमोल खताळ यांनी सत्काराऐवजी गरजूंना कुटुंबांना मदत करण्याचे आवाहन केले आहे. त्यानुसार पिंपळे शिवसेना शाखेच्या वतीने गरीब कुटुंबांना दिवाळी शिधा वाटप करण्यात आला. तसेच मागील वर्षी अपघातामध्ये आई-वडील गमावलेल्या युवराज व पूनम माळी यांना नवीन कपडे, तर ताराबाई माळी यांना साडी देऊन शिवसैनिकांनी सामाजिक बांधिलकी जपली आहे.

> निमोण आणि तळेगाव हा भाग कायम दुष्काळी म्हणून हिणवून काहींनी तुमच्या दोन-तीन पिढ्यांचे मोठे नुकसान केले. मात्र, या तालुक्यातील मायबाप जनतेने मला काम करण्याची संधी दिली आहे. या संधीचे सोने करून संगमनेरचा चेहरामोहरा बदलण्याचा माझा संकल्प आहे. भोजापूरच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लावून हा दुष्काळी भाग सुजलाम् सुफलाम् केल्याशिवाय मी स्वस्थ बसणार नाही.
> **-अमोल खताळ, आमदार**

घरकुल योजनांसाठी जागेअभावी अडचणी येत असतील, तर अशा प्रकरणांमध्ये पर्यायी मार्ग उपलब्ध करून देण्यासाठी आगामी हिवाळी अधिवेशनात प्रश्न उपस्थित करून पाठपुरावा करणार आहे. असल्याचे आमदार अमोल खताळ पाटील यांनी सांगितले.

संगमनेर तालुक्यातील या मायबाप जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी सरकारकडे पाठपुरावा करू, वेळ प्रसंगी मी जरी सत्ताधारी पक्षाचा आमदार असलो, तरी जनतेच्या प्रश्नांसाठी आंदोलन करण्यास मागेपुढे पाहणार नाही माझ्यासाठी आमदारकी ही पदाची प्रतिष्ठा मिरविण्याचे साधन नसून जनतेची सेवा करण्याची जबाबदारी असल्याचे आमदार अमोल खताळ पाटील यांनी सांगितले.

पान १ वरुन

टँकर चालकांच्या आंदोलनामुळे १२० गावांचा पाणीपुरवठा ठप्प !

ठेकेदाराच्या मध्यस्थीनंतर टँकर सुरू- रविवारी दुपारीही राक्षी येथे सर्व टँकर रस्त्याच्या कडेला उभे होते. प्रशासनातील अधिकारी फिरकले नसल्याची तक्रार चालकांनी केली. दरम्यान, दुपारी साडेतीनच्या सुमारास ठेकेदार कंपनीचे प्रतिनिधी दत्तात्रय नागरगोजे यांनी चालकांशी चर्चा केली. मारहाणीच्या घटनेबाबत शेवगाव पोलीस ठाण्यात पत्र दिल्याची माहिती देत त्यांनी चालकांना टँकर सुरू करण्याचे आवाहन केले. त्यानंतर सायंकाळी साडेचार ते पावणेपाचच्या सुमारास टँकर भरण्यास सुरुवात झाली.

पाणीवाटपासाठी गावोगावी सार्वजनिक टाक्यांची व्यवस्था करावी, चालकांना संरक्षण द्यावे, तसेच राक्षी येथील टँकर भरण्याच्या ठिकाणाची दुरुस्ती करावी, अशी मागणी चालकांनी केली आहे. पाणीटंचाईच्या काळात वितरण व्यवस्थेतील हा गोंधळ थांबविण्यासाठी शेवगाव-पाथर्डीच्या महसूल व पंचायत समिती प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करण्याची गरज निर्माण झाली आहे.

पुणे, अहिल्यानगर, साताऱ्यात धुवांधार पाऊस

शक्यता आहे. हवामान विभागाकडून या जिल्ह्यांना पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. या काळात वाऱ्याचा वेग हा ४० ते ५० किमी प्रतितास असण्याची शक्यता आहे. हवाम ान विभागाकडून वर्तवण्यात आलेल्या अंदाजानुसार, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, कोल्हापूर, कोल्हापूर घाट परिसर, नांदेड, लातूर, चंद्रपूर, गडचिरोली, वर्धा, वाशिम, यवतमाळ या जिल्ह्यांमध्ये पावसाची शक्यता आहे. या जिल्ह्यांना पावसाचा यलो अलर्ट देण्यात आला आहे. तर ४ नोव्हेंबरसाठी कोल्हापूर जिल्हा, कोल्हापूर घाट परिसर, चंद्रपूर, गडचिरोली, वर्धा, यवतमाळ या जिल्ह्यांना पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. अहिल्यानगर आणि साताऱ्यातही मुसळधार सातारा जिल्ह्यात मुसळधार पाऊस पडला आहे. सातारा शहरासह ग्रामीण भागात पावसाने हजेरी लावली आहे. अचानक आलेल्या पावसामुळे अनेक भागांमध्ये पाणी साचलं. यासोबत रस्ते देखील जलमय झाले. याशिवाय अहिल्यानगर जिल्ह्यातील जामखेड, पारनेर शहरातदेखील आज पावसाने हजेरी लावली. जामखेडमध्ये ढगांचा गडगडाट आणि विजांच्या कडकडाटासह पाऊस पडला.

जिल्हा बँकेच्या सत्तासंघर्षाचा आज फैसला !

लक्ष लागले आहे. मतदान प्रक्रियेसाठी जिल्ह्यात ३३ मतदान केंद्रे निश्चित करण्यात आली आहेत. त्यासाठी २१९ अधिकारी व कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मतमोजणीसाठी ५८ अधिकारी व कर्मचारी तैनात राहणार आहेत. मतदान प्रक्रियेसाठी ६९ पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांची, तर मतमोजणीच्या ठिकाणी बंदोबस्तासाठी १० पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. निवडणूक प्रक्रिया शांततेत आणि सुरळीत पार पाडण्यासाठी प्रशासनाने तयारी पूर्ण केली आहे. ही माहिती निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक मंगेश सुरवसे यांनी दिली. अकोले, कर्जत, पारनेरमध्ये लक्षवेधी लढती सेवा संस्था मतदारसंघातील अकोले, कर्जत आणि पारनेर येथील लढती विशेष लक्षवेधी ठरणार आहेत. अकोलेमध्ये आमदार डॉ. किरण लहामटे यांच्याविरुद्ध जिल्हा बँकेचे माजी अध्यक्ष सिताराम गायकर यांच्या कन्या संजीवनी शिंदे मैदानात आहेत. कर्जतच्या लढतीत अप्रत्यक्षपणे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील विरुद्ध विधान परिषदेचे सभापती राम शिंदे असे राजकीय चित्र निर्माण झाले आहे. पारनेरमध्ये पालकमंत्री विखे पाटील आणि खासदार नीलेश लंके यांच्या गटांतील प्रतिष्ठेची लढत मानली जात आहे. महिला, ओबीसी आणि भटक्या जमातींच्या जागांसाठीही चुरस महिला मतदारसंघातून हर्षदा काकडे, अनुराधा नागवडे, संगीता जयंत वाघ, सुवर्णा पाचपुते, संध्या म हांडुळे आणि पुष्पा गायकवाड यांच्यात लढत होत आहे. ओबीसी मतदारसंघात कारभारी जावळे, जालिंदर वाकचौरे, अजिनाथ हजारे, शिवदास गुंजाळ आणि कडूचंद शेटे हे उमेदवार रिंगणात आहेत. ११ दिग्गज बिनविरोध जिल्हा बँकेच्या निवडणुकीत यापूर्वीच ११ उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. त्यामध्ये आमदार मोनिका राजळे, आमदार अक्षय कर्डिले, माजी मंत्री शंकरराव गडाख, माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील, ज्येष्ठ नेते बिपिन कोल्हे, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्ष राजश्री घुले, माजी संचालक करण ससाणे, रणजीत देशमुख, दत्तात्रय पानसरे, सचिन घुमरे आणि सचिन जगताप यांचा समावेश आहे.

गणेश विसर्जनातील वादाचा पुन्हा भडका

वैजापुरात दोन गटांत रक्तरंजित संघर्ष

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

वैजापूर : गणेश विसर्जन मिरवणुकीदरम्यान झालेल्या जुन्या वादाचा वणवा पुन्हा एकदा भडकला असून, शनिवारी वैजापुरातील येवला रोड परिसरात दोन गटांत रक्तरंजित संघर्ष पाहायला मिळाला. कोयता, लोखंडी कत्ती, फावड्याचा फायबर दांडा, लोखंडी रॉड आणि लाकडी दांडक्यांचा बेछूट वापर करून एकमेकांवर जीवघेणे हल्ले करण्यात आले. भरदिवसा घडलेल्या या थरारक घटनेत अनेक जण गंभीर जखमी झाले असून काहींची प्रकृती चिंताजनक आहे. या हाणामारीमुळे वैजापूर शहरात कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला असून, ''पोलिसांचा नेमका धाक उरला आहे की नाही?'' असा संतप्त सवाल नागरिकांमधून उपस्थित होत आहे.

पहिली घटना शनिवारी दुपारी साडेअशीच्या सुमारास येवला रोडवरील हॉटेल शान-ए-मराठा आणि जीवनश्री कॉलनीजवळ घडली. याप्रकरणी कृष्णा चंद्रकांत जाधव (वय २१, रा. संत जनार्दन सोसायटी, येवला रोड) यांनी फिर्याद दिली असून, यात शान पवार, रोहित अनिल पठारे, प्रितेश नितोष साळुंके, विशाल पवार, तुषार पठारे, आदेश शेवाळे आणि हॉटेलमधील इतर कामगार आरोपी असल्याचे म्हटले आहे. गणपती विसर्जनावेळी झालेल्या जुन्या भांडणाचा राग मनात ठेवून आरोपींनी संगनमताने जमाव जमवला व फिर्यादीवर लोखंडी कत्ती, कोयता व फायबर दांड्याने डोक्यात व हातावर वार करून गंभीर जखमी केले. या हल्ल्यात कृष्णा जाधव यांच्यासह निर्भय पवार, विशाल रामदास कडे आणि सुजित राजपूत हे जखमी झाले असून, वैजापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याच संघर्षाची दुसरी बाजू समोर येत हॉटेल व्यावसायिक भूषण पवार (वय ४०, रा. बजरंग चौक, वैजापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, शनिवारी संध्याकाळी ५ ते ५:३० च्या दरम्यान पुन्हा त्याच परिसरात दुसरा गट आक्रमक झाला. या दुसऱ्या गुन्ह्यात नितीन होंड, गौरव होंड, गजु राजपूत, क्रिश राजपूत, संकेत आहेर, प्रतीक लुटे, सुजित ठाकूर ऊर्फ राजपूत, विशाल कडे, रोहित आहेर, हर्षद राजपूत, अमर राजपूत, तुषार आहेर, मयूर रहाणे व इतर आरोपी आहेत. जुन्या वादातून विशाल पवार यांना जिवे मारण्याच्या उद्देशाने लोखंडी रॉड व लाकडी दांडक्यांनी बेदम मारहाण करण्यात आली व हॉटेलमधील कामगारांची डोकी फोडून त्यांनाही गंभीर जखमी केले गेले. तसेच गणपती मंडळातील रोहित पठारे व तुषार पठारे यांनाही सोडले नाही. या दुसऱ्या प्रकरणात विशाल पवार, शान पवार, संतोष शिवलाल शिहरे, आदेश शेवाळे आणि खुद्द फिर्यादी भूषण पवार हे जखमी झाले आहेत.

एकाच दिवसातील या परस्परविरोधी हल्ल्यांमुळे दोन्ही गटांतील अनेक जखमींना तातडीने वैजापूर उपजिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले, जिथे उपचारासाठी मोठी तारांबळ उडाली. प्रकृती चिंताजनक असलेल्या गंभीर जखमींना छत्रपती संभाजीनगरच्या घाटी रुग्णालयासह येवला, कोपरगाव आणि वैजापूरमधील खासगी रुग्णालयांत हलवण्यात आले आहे. या हिंसेमुळे जखमींच्या नातेवाईकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. विशेष म्हणजे, एका जखमीला शहराबाहेर नेऊन मारहाण केल्यानंतर स्टेशन रोडच्या बाजूला फेकून दिल्याचा गंभीर प्रकार समोर आला असून, त्याचा शोध घेण्यासाठी पोलिसांना तासनतास धावपळ करावी लागली.

गणेश विसर्जनावेळी झालेल्या वादानंतर पोलिसांनी वेळीच कठोर पावले उचलली असती, तर हा वणवा पुन्हा भडकला नसता. वारंवार घडणाऱ्या अशा घटनांमुळे पोलीस यंत्रणेच्या प्रतिबंधात्मक कारवाईवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. शहरात कोयते, कत्ते आणि लोखंडी रॉड हातात घेऊन उघडपणे फिरणारे गुन्हेगार जर कायदा हातात घेत असतील, तर पोलिसांचा दरारा नेमका कुठे गेला? असा सवाल वैजापूरकर विचारत आहेत.

केवळ गुन्हे दाखल करून आणि कागदी घोडे नाचवून हा प्रश्न सुटणार नाही. शहरातील संवेदनशील भागांत कडक गस्त, जुन्या वादातील संशयितांवर तडीपार किंवा प्रतिबंधात्मक कारवाई आणि हत्यारांचा बेकायदा वापर करणाऱ्यांवर कठोर व दंडात्मक बडगा उगारणे गरजेचे आहे. वैजापूरच्या सामान्य नागरिकांना सुरक्षेची हमी देण्याची खरी जबाबदारी आता पोलीस प्रशासनावर येऊन ठेपली आहे.

सुप्त कलागुणांना वाव मिळाल्याने व्यक्तिमत्त्व विकासाला चालना : सम्राट शिंदे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

भोकर : विद्यार्थ्यांमधील सुप्त कलागुणांना वाव देऊन त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी शालेय स्तरावर विविध उपक्रम राबविणे आवश्यक आहे. स्वतःच्या कल्पनेतून, स्वतःच्या हातांनी आकाशकंदील तयार करून तो दिवाळीत घराच्या दारावर लावण्याचा आनंद काही वेगळाच असतो, असे प्रतिपादन जगदंबा विद्यालयाचे मुख्याध्यापक सम्राट शिंदे यांनी केले.

श्रीरामपूर तालुक्यातील भोकर येथील श्री जगदंबा प्रासादिक विद्यालयात कलाशिक्षिका सुजाता गोरे यांच्या संकल्पनेतून विद्यार्थ्यांसाठी पर्यावरणपूरक आकाशकंदील तयार करण्याची कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेत गोरे यांनी विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रात्यक्षिक



दाखवून पर्यावरणपूरक साहित्याचा वापर करून कमी खर्चात आणि कमी वेळेत आकर्षक आकाशकंदील तयार करण्याचे मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनीही उत्साहाने सहभाग घेत आपल्या कल्पकतेतून विविध प्रकारचे आकाशकंदील साकारले.

भारतीय संस्कृती आणि परंपरा जपत पर्यावरणपूरक पद्धतीने सण साजरे करणे ही काळाची गरज आहे. अशा उपक्रमांमुळे पर्यावरणाचा समतोल राखण्याबरोबरच विद्यार्थ्यांना कृतीतून शिकण्याची संधी मिळते. त्यांच्या कलागुणांना वाव मिळून सर्वांगीण विकास होण्यास मदत होते, असे पर्यवेक्षक सुनील वाघुंबरे यांनी सांगितले. या कार्यशाळेत सुमारे ५० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. विद्यार्थ्यांनी तयार केलेले आकाशकंदील दिवाळीनिमित्त आपल्या घरांवर लावून दीपोत्सव साजरा करणार असल्याचे सुजाता गोरे यांनी सांगितले.या उपक्रमात शिक्षक ज्ञानदेव उंडे, गणेश देवतरसे, डॉ. अविनाश महाजन, मुकेश पवार, सचिन शिंदे, प्रदीप पटारे, अशोक राहिंज, रहबर खान, अनिल पोटभरे, कल्पना म्हस्के, दिपाली पाटील, गीतांजली मोरे, सविता रहाणे व शैला शिंदे यांनी सहभाग घेतला. विद्यालयाच्या या उपक्रमाचे संचालक पुंजाहारी शिंदे, बांधकाम कामगार संघटनेचे गणेश छल्लारे, सरपंच शितल पटारे, उपसरपंच गिरीष मते, सोसायटीचे चेअरमन निलेश विधाटे, व्हाईस चेअरमन सिताबाई जगदाळे, तंटामुक्त गाव समितीचे अध्यक्ष रामदास शिंदे व उपाध्यक्ष सुरेश अमोलीक यांच्यासह मान्यवरांनी कौतुक केले. तसेच विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देणाऱ्या शिक्षकांचे अभिनंदन केले.

शुभम आसनेचे बीएएमएस आयुर्वेद परिक्षेत यश

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



माळवाडगांव : श्रीरामपूर तालुक्यातील माळवाडगांव येथील शेतकरी कुटुंबातील डॉ शुभम गोविंद आसने या विद्यार्थ्यांने विवेकानंद आयुर्वेदिक महाविद्यालय नाशिक शिक्षण पूर्ण करून बी ए एम एस परिक्षेत उत्तीर्ण होऊन यश मिळविले आहे.आयुर्वेद विज्ञान नाशिक विद्यापीठाच्या श्री विवेकानंद आयुर्वेद महाविद्यालयात डॉ शुभम याने बी ए एम एस (आयुर्वेद) अंतीम परिक्षेत उत्तीर्ण होऊन विद्यापीठाने बी ए एम एस पदवी बहाल केली आहे. माळवाडगांव येथील अशोकचे माजी संचालक सारंगधर किसनरांव आसने यांचा नातू तर गोविंद सारंगधर आसने यांचा डॉ शुभम, हा चिरंजीव आहे. भाजपाचे राज्य उपाध्यक्ष डॉ सुजय विखे पाटील यांच्यासह माळवाडगांव पंचक्रोशीतील राजकीय, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातून डॉ शुभम याचे कौतुक केले आहे.

विद्यार्थ्यांना क्रीडा गणवेशाचे मोफत वितरण; ६० विद्यार्थ्यांना लाभ

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

राजूर : विद्यार्थ्यांमधील क्रीडागुणांना प्रोत्साहन देण्यासाठी श्री स्वामी समर्थ सेवा संस्था, राजूर संचलित श्री समर्थ माध्यमिक विद्यालय, मवेशी येथे ६० विद्यार्थ्यांना मोफत क्रीडा गणवेशाचे वितरण करण्यात आले. शनिवार, दि. ३१ ऑक्टोबर रोजी आयोजित कार्यक्रमात भास्करजी भांगरे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना गणवेश देण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी धोंडोपंत बांबळे होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून निवृत्ती गवारी उपस्थित होते. मुख्याध्यापिका मंजुषा काळे यांनी



प्रास्ताविकातून उपक्रमाची माहिती देत मान्यवरांचे स्वागत केले. यावेळी भास्करजी भांगरे यांनी विद्यार्थ्यांना सामाजिक बांधिलकी, परोपकार आणि ध्येयपूर्तीसाठी परिश्रमाचे महत्त्व सांगितले. विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबरच विविध खेळ व स्पर्धांमध्ये सहभागी होऊन यश मिळवावे, असे आवाहन त्यांनी केले. विद्यालयाच्या वाचन पेटी उपक्रमाचे कौतुक करून स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी उपयुक्त पुस्तके उपलब्ध करून देण्याचे आश्वासनही त्यांनी दिले.निवृत्ती गवारी यांनी गणवेशामुळे शिस्त, एकता आणि जबाबदारीची जाणीव निर्माण होते, असे सांगितले. विद्यार्थ्यांनी गणवेशाचा अभिमान बाळगावा, असे आवाहन त्यांनी केले. अध्यक्षीय भाषणात धोंडोपंत बांबळे यांनी यशासाठी सातत्यपूर्ण मेहनत, जिद्द आणि प्रयत्नांची आवश्यकता असल्याचे सांगितले. अपयशाने खचून न जाता विद्यार्थ्यांनी ध्येय साध्य करण्यासाठी प्रयत्नशील राहावे, असे मार्गदर्शन त्यांनी केले.

निधनवार्ता

चंद्रकला रेवगडे




गणोरे - हिवरगाव आंबरे (ता- अकोले) सौ. चंद्रकला दशरथ रेवगडे यांचे वयाच्या ५५ व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले.

त्यांच्या पच्छात पती, दोन मुलं, , सुना, नातवंडे, असा मोठा परिवार आहे. दशरथ रभाजी रेवगडे - पती, स्वप्नील (चंदन), बाबु रेवगडे यांच्या त्या मोतीश्री होत्या.

गौतम पब्लिक स्कूलची क्रीडा क्षेत्रात भरारी; व्हॉलीबॉलमध्ये राज्य उपविजेतेपद, हॉकीत दुहेरी विजेतेपद

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

कोळपेवाडी : गौतम पब्लिक स्कूलने यंदाच्या शालेय क्रीडा स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करत क्रीडा क्षेत्रात आपला दबदबा निर्माण केला आहे. चिपळूण येथे झालेल्या राज्यस्तरीय शालेय व्हॉलीबॉल स्पर्धेत पुणे विभागाच्या मुलींच्या संघाने उपविजेतेपद पटकावले, तर गौतमच्या १४ व १७ वर्षांखालील दोन्ही मुलांच्या हॉकी संघांनी विभागीय स्पर्धेत विजेतेपद मिळवत दुहेरी मुकुट संपादन केला. विशेष म्हणजे, व्हॉलीबॉलपटू कल्याणी वावधने हिची राष्ट्रीय स्पर्धेसाठी महाराष्ट्राच्या संघात निवड झाली आहे.



चिपळूण येथे झालेल्या १४ वर्षांखालील राज्यस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेत पुणे विभागाच्या मुलींच्या संघाने मुंबई विभागाचा ३-० असा पराभव करून शानदार सुरुवात केली. उपांत्य फेरीत नागपूर विभागाला पराभूत करून अंतिम फेरी गाठली. अंतिम सामन्यात चुरशीची लढत देत संघाने उपविजेतेपद मिळवले. या संघाचे नेतृत्व गौतमच्या खेळाडूने केले. कल्याणी वावधने हिची २३ ते २७ नोव्हेंबरदरम्यान शिर्डी येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.दरम्यान, गौतम पब्लिक स्कूलच्या मैदानावर २८ व २९ ऑक्टोबर रोजी झालेल्या विभागीय हॉकी स्पर्धेत १४ वर्षांखालील संघाने सोलापूरचा ५-०, तर १७ वर्षांखालील संघाने पुणे शहराचा ७-१ गोलने पराभव केला. दोन्ही संघांची १२ ते १५ नोव्हेंबरदरम्यान बुलढाणा येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

या यशाबद्दल चेअरमन अशोकराव काळे, आमदार आशुतोष काळे, सचिव चैतालीताई काळे व प्राचार्य नूर शेख यांनी खेळाडू आणि प्रशिक्षकांचे अभिनंदन केले. खेळाडूंना रमेश पटारे, राजेंद्र आढाव, इसाक सय्यद व महेश गोंडे यांचे मार्गदर्शन लाभले.

गौतमच्या खेळाडूंचा अभिमान – चैतालीताई काळे

व्हॉलीबॉलमधील राज्य उपविजेतेपद, हॉकीतील दुहेरी विजेतेपद आणि कल्याणी वावधनेची राष्ट्रीय संघातील निवड ही संपूर्ण गौतम परिवारासाठी अभिमानाची बाब आहे. खेळाडूंची जिद्द, प्रशिक्षकांचे मार्गदर्शन आणि संस्थेचे प्रोत्साहन यामुळे हे यश मिळाले आहे, अशी भावना चैतालीताई काळे यांनी व्यक्त केली.

श्रीरामपुरात बोर घेण्याचे दर दुप्पट

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

श्रीरामपूर : नळाला पर्याय म्हणून कुपनलिका घेण्यासाठी अनेक लोक सरसावल्याने याचा गैरफायदा कुपनलिका खोदणाऱ्या लोकांनी घेण्यास सुरुवात केली आहे. मर्यादित संख्येत मशीन असल्याने जादा पैसे देऊनही नंबर लागले आहेत . ५० रुपये फुटाचे दर असणाऱ्या कुपनलिका खोदाईचे दर आता गगनाला भिडले आहेत काल ८० रुपये दर होते तर आज ते शंभर रुपये झाले आहेत. तरी सुद्धा नंबर लागत नसल्याने नागरिक ही जादा रक्कम देऊ न बोअर खोदून घेत आहेत.कॉलनी अपार्टमेंट या भागात आठ ते दहा लोक मिळून एक बो अर घेत आहेत व पाईपलाईनने त्याचे पाणी सर्व घरांमध्ये फिरविले जात आहे. शहरातील पाणीटंचाईवर नागरिकांनी नगरपालिकेवर अवलंबून न राहता स्वतःच उपाययोजना चालू केल्या आहेत. फातिमा कॉलनी मध्ये गेल्या दोन-तीन दिवसात घेण्यात आलेल्या बोरला चांगले पाणी लागल्याने लोकांच्या पाण्याचा प्रश्न बऱ्याच अंशी सुटला आहे.शहराच्या इतर भागात देखील खाजगी बोअर कनेक्शन घेण्यासाठी नागरिक सरसावले आहेत. परंतु मशिनी मर्यादित असल्याने नंबर लागत नाही. दोन दोन तीन तीन दिवस वाट पाहावी लागत असल्याचे दिसून येत आहे.रम्यान पाणीटंचाईवर उपाय म्हणून बोअर खोदाई केली जात असली तरी कुप नलिकांची संख्या वाढल्यास अनेक बोअर आटण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

नशिबाची परिक्षा
सोमावर दि. ०२ नोव्हेंबर २०२६

मिलनम डे			
उदय-अस्त	सिंगल ५-१-९ मजबुत		
१२० ४३० ६७०	३-४	१५८ २४८ २२०	३६-८४-७१- २०-४९

कल्याण			
उदय-अस्त	सिंगल ९-४-५ मजबुत		
१९० २८० २२६	०-२	१५६ १२९ ११०	०६-३२-४८- ७५-२९

मुंबैम (मेन)			
उदय-अस्त	सिंगल ४-७-९ मजबुत		
१२५ २६० २३४	८-१	१२८ १४६ १००	८६-२१-५४- ९७-१०

माधुरी बाजार डे / नाईट			
१३० ३६७ ४५५	४-५४	३४८ ६९० २३०	४१-४३-५७- ५४-४९
८-६-२			

dpbosssss.live

शुभ लाभ

Date	Mon	Tue	Wed	Thu	Fri
27/07/2026 to 31/07/2026	25 59 60 55 00	59 00 42 22 88	35 88 62 39 00	40 00 47 89 00	16 00 70 48 88
03/08/2026 to 07/08/2026	23 34 90 56 89	17 70 85 15 59	33 88 42 12 89	46 00 09 47 88	37 80 05 34 48
10/08/2026 to 14/08/2026	57 77 99 23 34	23 30 53 14 88	25 50 70 23 35	35 55 39 13 53	13 33 76 35 58
17/08/2026 to 21/08/2026	24 40 60 46 00	27 78 73 34 46	11 16 82 48 00	15 56 23 77 79	44 49 77 17 79
24/08/2026 to 28/08/2026	36 00 96 79 00	25 55 23 22 99	27 89 42 23 77	45 00 98 44 00	26 66 41 29 90
31/08/2026 to 04/09/2026	14 49 43 67 00	17 00 81 56 00	15 99 52 33 66	69 00 50 23 55	57 57 99 13 55
07/09/2026 to 11/09/2026	68 80 47 55 77	22 88 27 12 44	57 00 26 35 88	11 12 43 77 79	44 45 33 68 89
14/09/2026 to 18/09/2026	78 89 47 12 46	33 66 20 13 60	79 90 56 17 88	68 00 42 34 55	39 99 16 79 00
21/09/2026 to 25/09/2026	39 90 25 34 88	45 57 62 12 99	48 00 23 59 99	16 66 30 47 99	15 00 60 28 80
28/09/2026 to 02/10/2026	66 99 19 13 55	13 37 18 27 99	26 00 84 25 77	66 00 29 12 66	36 99 84 77 00
05/10/2026 to 09/10/2026	14 40 57 25 00	45 59 85 16 88	13 30 48 56 77	46 99 99 12 66	55 88 84 59 90
12/10/2026 to 16/10/2026	16 60 79 56 88	29 00 11 66 99	12 22 58 18 99	13 00 46 12 33	25 57 42 48 80

माधुरी बाजार डे: ३४९ / ६८ / ४७७

माधुरी बाजार नाईट: २३५ / ०० / १९०

Mydpboss.com

भेंडा येथील बँक ऑफ बडोदामध्ये खातेदारांची गर्दी

आणखी एका राष्ट्रीयीकृत बँकेची शाखा सुरू करण्याची मागणी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

नेवासा : नेवासा तालुक्यातील भेंडा येथील बँक ऑफ बडोदा शाखेत दिवसेंदिवस खातेदारांची संख्या आणि बँकिंग व्यवहारांचा आवाका वाढत असल्याने ग्राहकांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर भेंडा परिसरात आणखी एका राष्ट्रीयीकृत बँकेची शाखा सुरू करण्यात यावी, अशी जोरदार मागणी शेतकरी, खातेदार आणि सर्वसामान्य नागरिकांमधून होत आहे.

भेंडा येथील बँक ऑफ बडोदा शाखेवर ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखाना, विविध शैक्षणिक संस्था, पतसंस्था तसेच आरोग्य विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांचे पगार, आर्थिक व्यवहार आणि इतर बँकिंग कामकाज मोठ्या प्रमाणात अवलंबून आहे. याशिवाय परिसरातील असंख्य शेतकरी आणि नागरिकांची खाती या शाखेत असल्याने दररोज बँकेत मोठी गर्दी होत असते.

बँकेतील अधिकारी व कर्मचारी उपलब्ध मनुष्यबळात अत्यंत तत्परतेने आणि जबाबदारीने कामकाज करताना दिसतात. मात्र, व्यवहारांची प्रचंड संख्या आणि कामाचा वाढता व्याप यामुळे प्रत्येक काउंटरवर ग्राहकांच्या लांबच लांब रांगा लागलेल्या असतात. परिणामी, साधे बँकिंग काम पूर्ण करण्यासाठीही खातेदारांना बराच वेळ प्रतीक्षा करावी लागते. याचा सर्वाधिक त्रास शेतकरी, ज्येष्ठ नागरिक, नोकरदार कर्मचारी आणि सर्वसामान्य ग्राहकांना सहन करावा लागत आहे.



वास्तविक, ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याच्या व्यवस्थापनाने आणि प्रशासनाने वाढत्या बँकिंग व्यवहारांचा विचार करून यापूर्वीच भेंडा परिसरात आणखी एका राष्ट्रीयीकृत बँकेची शाखा सुरू करण्यासाठी पुढाकार घेणे आवश्यक होते. मात्र, या प्रश्नाकडे अपेक्षित गांभीर्याने लक्ष दिले गेले नसल्याची खंत नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

कारखाना प्रशासनाने आता तरी पुढाकार घ्यावा!

सध्याची परिस्थिती पाहता ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याचे वरिष्ठ अधिकारी, पदाधिकारी आणि विशेषतः मॅनेजिंग डायरेक्टर यांनी या प्रश्नात जातीने लक्ष घालून बँकिंग व्यवहार सुरळीत होण्यासाठी ठोस उपाययोजना कराव्यात. तसेच भेंडा येथे आणखी एका राष्ट्रीयीकृत बँकेची शाखा सुरू करण्यासाठी संबंधित बँक व्यवस्थापन आणि वरिष्ठ स्तरावर तातडीने पाठपुरावा करावा, अशी मागणी अनेक शेतकरी व खातेदारांनी केली आहे. बँक कर्मचारी तत्पर, मात्र वाढत्या ग्राहक संख्येमुळे व्यवस्थेवर ताण पडत असून ही वस्तुस्थिती लक्षात घेऊन खातेदारांची गैरसोय दूर करण्यासाठी कारखाना प्रशासनाने आता तरी ठोस पाऊल उचलावे, अशी अपेक्षा भेंडा परिसरातील नागरिक व्यक्त करत आहेत.

ज्ञानेश्वर कारखाना प्रशासनाने लक्ष घालण्याची मागणी

द•ख•ल



पाटबंधारे विभागातील सेवानिवृत्तांचा तिसरा स्नेहमेळावा उत्साहात

अहिल्यानगर : पाटबंधारे विभागातून सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांचा तिसरा स्नेहमेळावा नुकताच शहरात मोठ्या उत्साहात पार पडला. सेवानिवृत्तीनंतरही जपलेली मैत्री, जुन्या आठवणी, परस्परांबद्दलचा जिव्हाळा आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचा आनंद यामुळे हा स्नेहमेळावा अविस्मरणीय ठरला. या वेळी सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना शासनाच्या महा उपलब्धी योजनेबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवरांचे सत्कार, दिवंगतांना श्रद्धांजली आणि ज्येष्ठांच्या कलागुणांचे सादरीकरण अशा विविध उपक्रमांनी कार्यक्रमाला रंगत आली. हॉटेल संजोग येथे हा स्नेह मेळावा रंगला होता. रमेश देशमुख यांनी उपस्थितांचे स्वागत केले, तर पी. एन. डफळ यांनी स्वागतगीत सादर केले. दुर्गादास पुंड यांनी प्रास्ताविक केले आणि अध्यक्षीय निवडीची सूचना मांडली. त्यानंतर सयाजीराव वाव्हळ यांच्याकडे पुढील सूत्रसंचालनाची जबाबदारी सोपविण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी शरद कुलकर्णी यांची, तर प्रमुख पाहुणे म्हणून आसाराम सोनसळे आणि लक्ष्मण रासकर महाराज यांची निवड करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष आणि प्रमुख पाहुण्यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. हा सत्कार किरण मुळे, सोपानराव साबळे आणि सर्जेराव ठोंबरे यांच्या हस्ते करण्यात आला.

शालेय जिल्हास्तरीय रग्बी स्पर्धेत श्री समर्थ विद्यामंदिरचा संघ प्रथम



अहिल्यानगर : जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय आणि अहिल्यानगर महानगरपालिका यांच्या वतीने आयोजित शालेय जिल्हास्तरीय रग्बी स्पर्धेत सावेडी येथील श्री समर्थ विद्यामंदिर प्रशालेच्या १४ वर्षांखालील मुलांच्या संघाने प्रथम क्रमांक पटकावला. या उल्लेखनीय कामगिरीच्या जोरावर संघाची पुणे विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या स्पर्धेत श्री समर्थ विद्यामंदिरच्या खेळाडूंनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करीत प्रतिस्पर्धी संघांवर मात केली. संघातील श्री रोडे, श्रेयस हापसे, साई फिरोदे, आण्विक कासार, मिनेश ठाकूर, शिवम नजन, आयुष राठोड, पियुष राठोड, सात्विक शिंदे, आयुष सुतार, साई रोडे, आयुष शिंदे आदी खेळाडूंनी सांघिक कामगिरीच्या जोरावर संघाला विजेतेपद मिळवून दिले. या सर्व खेळाडूंना प्रशालेचे क्रीडा विभागप्रमुख पी. पी. लोंढे सर यांचे मार्गदर्शन व प्रशिक्षण लाभले. खेळाडूंनी केलेल्या सातत्यपूर्ण सरावाचे आणि मेहनतीचे हे यश असल्याची भावना व्यक्त करण्यात आली. खेळाडूंच्या या उज्ज्वल यशाबद्दल संस्थेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन केले.

सोनेवाडीत विविध विकासकामांचे भूमिपूजन

रस्ते, ड्रेनेजसाठी आठ कोटींचा निधी ; माजी खा.विखे, आ. दाते यांची उपस्थिती

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

नगर तालुका : नगर तालुक्यातील सोनेवाडी येथे विविध विकासकामांचा भूमिपूजन समारंभ शनिवारी (दि. ३१) सायंकाळी उत्साहात पार पडला. केडगाव-सोनेवाडी-घोसपुरी-चिखली रस्ता सुधारणा कामासाठी ६ कोटी ७५ लाख रुपये, सोनेवाडीतील हरिजन वस्ती ते बायपास रस्ता व ड्रेनेजलाइनसाठी १ कोटी ३० लाख रुपये, तर स्मशानभूमी सुशोभीकरणासाठी १० लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

यावेळी बोलताना, आमदार काशिनाथ दाते म्हणाले, दुष्काळी परिस्थिती आणि अन्य कारणांमुळे निधीची कमतरता भासू शकते. मात्र, विविध विकासकामांसाठी निधी मिळविण्याचा पाठपुरावा सुरूच राहील. शिवसेना तालुकाप्रमुख खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांच्या शुभहस्ते हा समारंभ झाला. आ. अक्षय कर्डिले प्रमुख उपस्थित होते.

केडगाव-सोनेवाडी-घोसपुरी-चिखली रस्ता सुधारणा कामासाठी ६ कोटी ७५ लाख रुपये, सोनेवाडीतील हरिजन वस्ती ते बायपास रस्ता व ड्रेनेजलाइनसाठी १ कोटी ३० लाख रुपये, तर स्मशानभूमी सुशोभीकरणासाठी १० लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.



अजित दळवी यांच्या पाठपुराव्यामुळे सोनेवाडीतील रस्ते व अन्य कामांसाठी निधी उपलब्ध झाल्याचे त्यांनी सांगितले. घोसपुरी पाणी योजनेच्या अंमलबजावणीसाठीही प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

आ. अक्षय कर्डिले यांनी सोनेवाडी ग्रामस्थांनी आपल्यावर नेहमीच प्रेम केले असल्याचे सांगितले. दुष्काळी परिस्थितीचा सामना करण्यासाठी महायुती सज्ज असून, नगर तालुक्यातील नागरिकांच्या पाठीशी ठामपणे उभे राहणार आहोत. चारा आणि पाण्याचे नियोजन करण्यात येईल, असे त्यांनी नमूद केले.

माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील म्हणाले, शिवसेना तालुकाप्रमुख अजित दळवी, सोनेवाडी ग्रामस्थ आणि ग्रामपंचायत सदस्य विकासकामांसाठी सातत्याने पाठपुरावा करतात. रस्ते, वीज आणि पाणी या मूलभूत सुविधांच्या विकासाला आमचे प्राधान्य आहे. आवश्यकतेनुसार आणखी निधी उपलब्ध करून देण्यात येईल. दुष्काळी परिस्थितीत विविध उपाययोजना करून नागरिकांना दिलासा देण्याची ग्वाहीही त्यांनी दिली.

सरपंच विठ्ठल दळवी सर यांनी सोनेवाडीतील रस्त्याची अनेक वर्षांपासून दुरवस्था झाल्याचे सांगितले. माजी खासदार सुजय विखे पाटील, आ. काशिनाथ दाते आणि आ. अक्षय कर्डिले यांच्या पाठपुराव्यामुळे निधी उपलब्ध झाल्याने रस्त्याचा प्रश्न मार्गी लागणार असल्याचे त्यांनी नमूद केले. साकळाई पाणी योजना नगर तालुक्यासाठी वरदान ठरणार असून, या योजनेतून सोनेवाडी व परिसरातील तलाव भरल्यास गाव सुजलाम्-सुफलाम् होईल. त्यामुळे त्या दृष्टीने प्रयत्न करावेत, अशी विनंतीवजा मागणी त्यांनी केली.

कार्यक्रमाच्या शेवटी शिवसेना तालुकाप्रमुख अजित दळवी यांनी आभार मानले. यावेळी सोनेवाडी, अकोळनेर, सारोळा, घोसपुरी आणि चास परिसरातील ग्रामस्थ, ग्रामपंचायत सदस्य तसेच आजी-माजी सरपंच उपस्थित होते.

ओंकार गोरेची राज्यस्तरीय रोलर स्केटिंग स्पर्धेसाठी निवड

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

श्रीगोंदा : जिद्द, मेहनत आणि जिद्दीला मिळालेल्या योग्य मार्गदर्शनाच्या जोरावर श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाचा विद्यार्थी ओंकार राजू गोरे याने क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन केले आहे. पुणे विभागीय शालेय रोलर स्केटिंग स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करत त्याने रौप्यपदक पटकावले असून, पालघर येथे होणाऱ्या राज्यस्तरीय शालेय रोलर स्केटिंग स्पर्धेसाठी त्याची निवड झाली आहे.



या यशामुळे श्रीगोंद्याच्या क्रीडा क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय पुणे यांच्या वतीने पुणे विभागीय शालेय रोलर स्केटिंग स्पर्धा २०२६ आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत ओंकारने आपल्या कौशल्यपूर्ण खेळाचे प्रदर्शन करत रौप्यपदकावर नाव कोरले. त्याच्या या कामगिरीच्या जोरावर त्याने राज्यस्तरीय स्पर्धेत प्रवेश मिळवला आहे.

ओंकारच्या या यशाबद्दल श्री छत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष राजेंद्रदादा नागवडे यांनी त्याचे अभिनंदन केले. तसेच जिल्हा बँकेच्या संचालिका अनुराधाताई नागवडे, नागवडे सहकारी साखर कारखान्याच्या उपाध्यक्षा मेघनाताई औटी, कारखान्याचे सर्व संचालक, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सूर्यवंशी, उपप्राचार्य कातोरे, पर्यवेक्षक टकले यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी त्याचे कौतुक केले.

ओबीसी समाजाच्या सन्मानासाठी भाजप कार्यरत : आ. टिळेकर

भाजपा ओबीसी मोर्चाच्या नगर शहर दक्षिण-उत्तर पदाधिकाऱ्यांची बैठक संपन्न!

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

अहिल्यानगर : भारतीय जनता पक्षाच्या ओबीसी मोर्चाच्या अहिल्यानगर शहर दक्षिण व उत्तर विभागातील पदाधिकाऱ्यांची बैठक प्रदेशाध्यक्ष आमदार योगेश टिळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाली. केंद्र व राज्य सरकारच्या माध्यमातून ओबीसी समाजासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्यासह समाजाच्या न्याय्य हक्कांसाठी संघटितपणे काम करण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.

यावेळी आमदार योगेश टिळेकर म्हणाले की, ओबीसी समाजाच्या सन्मानासाठी भारतीय जनता पक्ष काम करत आहे. केंद्र आणि राज्य सरकारने ओबीसी समाजाच्या विकासासाठी विविध योजना कार्यान्वित केल्या आहेत.



या योजनांचा लाभ समाजातील प्रत्येक पात्र घटकापर्यंत पोहोचविण्याची जबाबदारी पदाधिकारी व कार्यकर्त्यांची आहे. सुमारे ५४ टक्के ओबीसी समाजाला एकत्रित करून त्यांच्या न्याय्य हक्कांसाठी संघटितपणे काम करणे आवश्यक आहे. भाजप हा कार्यकर्त्यांचा विचार करणारा पक्ष असून, कार्यकर्त्यांच्या माध्यमातून पक्षाचे विचार आणि शासनाच्या योजना जनतेपर्यंत पोहोचविल्या जातात.

लवकरच प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांचा उत्तर महाराष्ट्र दौरा सुरू होणार असून, या दौऱ्यात भाजप ओबीसी मोर्चाही सहभागी होणार आहे. या पार्श्वभूमीवर सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी एकत्रितपणे काम करावे. आगामी २०२९ च्या लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पक्ष संघटना अधिक मजबूत करण्यासाठी पदाधिकाऱ्यांनी सक्रियपणे योगदान द्यावे, असे आवाहन टिळेकर यांनी केले.

यावेळी उपमहापौर ॲड. धनंजय जाधव म्हणाले की, पक्षवाढीसाठी प्रत्येक पदाधिकाऱ्याने जबाबदारीने काम करणे आवश्यक आहे. शासनाच्या विविध योजना जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी पदाधिकाऱ्यांनी पुढाकार घ्यावा. पक्षाने दिलेल्या पदाचा उपयोग जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी करावा. पदाधिकारी हा पक्षाचा महत्त्वाचा घटक असून, त्याच्या माध्यमातून शासनाच्या योजना समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्याचे काम प्रभावीपणे होऊ शकते, असे त्यांनी सांगितले.

शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते यांनी पक्षाची ध्येयधोरणे, संघटनात्मक बांधणी आणि पदाधिकाऱ्यांच्या जबाबदाऱ्या याबाबत सविस्तर चर्चा केली.

या बैठकीस उपमहापौर ॲड. धनंजय जाधव, अनिल मोहिते, नगरसेवक निखिल वारे, विनोद दळवी, गणेश विद्ये, ॲड. सुधीर पोटे, बाबासाहेब सानप, रोहन सानप, अभिजीत बोरुडे, प्रिया दानवे, स्वाती शिरसुल, ज्योती दांडगे, श्रीकांत फंड, महेश गुगळे, ज्ञानेश्वर दुधाडे, विनोद बोगा, ॲड. राजेश गाली यांच्यासह ओबीसी मोर्चाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शेतकऱ्यांच्या आयुष्यात अंधारच! यंदाच्या दिवाळीवर दुष्काळाचे सावट

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

श्रीगोंदा : दिवाळी म्हणजे आनंदाचा उत्सव, प्रकाशाचा सोहळा आणि नव्या आशांचा दीपोत्सव! घराघरांत पणत्या उजळतात, आकाशकंदील झळकतात, फराळाचा सुगंध दरवळतो आणि नातेवाईकांच्या भेटीगाठींनी वातावरण प्रसन्न होते. मात्र यंदाच्या दिवाळीवर दुष्काळाचे सावट गडद झाले आहे. एका बाजूला शहरातील बाजारपेठा दिवाळीच्या खरेदीने सजल्या असताना दुसरीकडे शेतकऱ्यांच्या शिवारात पाण्याची चिंता, पिकांच्या नुकसानीची भीती आणि आर्थिक विवंचना कायम आहे. त्यामुळे यंदा दिवाळीचा प्रकाश दिसत असला, तरी ग्रामीण भागातील अनेक कुटुंबांच्या चेहऱ्यावर समाधानाचा उजेड दिसत नाही.

दिव्यांची रोषणाई, पण शिवारात पाण्यासाठी धावपळ!

दिवाळी म्हटले की नवीन कपडे, सोने-चांदीची खरेदी, मिठाई, फराळ, फटाके आणि घराची सजावट यांची रेलचेल असते. मात्र यंदा पावसाच्या अनिश्चिततेने शेतकऱ्यांचे आर्थिक गणित बिघडवले आहे. खरीप हंगामातील पिकांना अपेक्षित उत्पन्न मिळेल की नाही, याची चिंता शेतकऱ्यांना सतावत आहे. कांदा, मका, कापूस, तूर आणि फळबागांच्या उत्पादनावर पाण्याचे संकट परिणाम करत आहे. अनेक शेतकऱ्यांना पिके वाचविण्यासाठी विहिरी, बोअरवेल आणि उपलब्ध जलस्रोतांवर अवलंबून राहावे लागत आहे.

बाजारपेठेत गर्दी; खरेदी करताना हात आखडता!

दिवाळीनिमित्त श्रीगोंदा शहरातील बाजारपेठांमध्ये सजावटीच्या वस्तू, कपडे, मिठाई, फराळाचे साहित्य, आकाशकंदील आणि पणत्यांची दुकाने सजली आहेत. ग्राहकांची वर्दळ वाढत असली, तरी महागाई आणि शेतीतील अनिश्चित उत्पन्नामुळे अनेक कुटुंबे खर्चाचे नियोजन करूनच खरेदी करत आहेत. पूर्वी दिवाळीच्या खरेदीत मनसोक्त खर्च करणारा ग्रामीण ग्राहक यंदा गरजेपुरती खरेदी करण्याला प्राधान्य देताना दिसत आहे.

शेतकऱ्यांची दिवाळी कर्जाच्या सावलीत!

शेतकऱ्यांसाठी दिवाळी हा केवळ सण नसून वर्षभराच्या कष्टांचे समाधान मिळण्याचा काळ असतो. मात्र पीक उत्पादन घटले, बाजारभावाने साथ दिली नाही आणि सिंचनासाठी अतिरिक्त खर्च करावा लागला, तर सण साजरा करायचा तरी कसा, असा प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा आहे. खत, बियाणे, औषधे, वीजबिल आणि मजुरीचा खर्च वाढलेला असताना हातात पुरेसे पैसे नसल्याने अनेक शेतकरी आर्थिक ताणाखाली आहेत.

पणत्यांचा प्रकाश आशेचा किरण ठरो!

दिवाळीचा खरा अर्थ केवळ घर उजळविण्यात नाही, तर दुसऱ्याच्या आयुष्यात आनंदाचा प्रकाश निर्माण करण्यात आहे. यंदा दुष्काळाच्या झळा सोसणाऱ्या शेतकरी कुटुंबांच्या चेहऱ्यावर हास्य फुलविण्यासाठी समाजानेही पुढाकार घेण्याची गरज आहे. स्थानिक उत्पादने खरेदी करणे, शेतकरी कुटुंबांना मदतीचा हात देणे आणि गरजूंची दिवाळी गोड करणे, हीच यंदाच्या दीपोत्सवाची खरी सामाजिक बांधिलकी ठरेल.

यंदा घराघरांत दिवे लागतील, आकाशात फटाके फुटतील; पण शेतकऱ्यांच्या शिवारात पुन्हा हिरवाई फुलली, विहिरींना पाणी आले आणि कष्टकऱ्यांच्या चेहऱ्यावर समाधान उमटले, तरच दिवाळीचा खरा प्रकाश सर्वदूर पोहोचेल!

सह्याद्रीच्या जंगलरक्षणासाठी 'भीमाशंकर सत्याग्रह'

दगडांना शेंदूर अन् गोमूत्र शिंपडून अनोखे आंदोलन!

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

अहिल्यानगर : सह्याद्री पर्वतरांगांतील वनसंपदा, वन्यजीवांचे अधिवास आणि पर्यावरणाचे संरक्षण करण्याबाबत महाराष्ट्र सरकारने संवेदनशील भूमिका घ्यावी, या मागणीसाठी पीपल्स हेल्पलाईन व भारतीय जनसंसदेच्या वतीने 'भीमाशंकर सत्याग्रह' आंदोलन करण्यात आले. हुतात्मा स्मारक येथे करण्यात आलेल्या या आंदोलनात मंत्रिमंडळाच्या प्रतीकात्मक दगडांना शेंदूर लावून त्यावर गोमूत्र शिंपडण्यात आले. शासनाच्या कथित पर्यावरणविरोधी भूमिकेचा निषेध करत आंदोलकांनी मंत्रिमंडळाला 'जंगलमारी कॅबिनेट' आणि 'दगडभेजा मंत्रिमंडळ' जाहीर केले.



या आंदोलनात ॲड. कारभारी गवळी, अशोक सब्बन, वीर बहादूर प्रजापती, दिगंबर साबळे, दत्तात्रय साबळे, अभिमान शिंदे, चतुरा शिंदे, पोपट भोसले, अशोक भोसले, बाबासाहेब भोसले, ज्ञानदेव चांदणे, राजू उमाप, सनी शिंदे, राहुल आढाव, आनंदा आढाव आदी सहभागी झाले होते. कर्जत तालुक्यातील सायडोंगर परिसरात टोरंट पॉवर समूहाच्या प्रस्तावित प्रकल्पासाठी मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड होण्याची शक्यता असल्याने स्थानिक नागरिक आणि पर्यावरणप्रेमींमध्ये चिंता व्यक्त केली जात आहे. या प्रकल्पासंदर्भात स्थानिकांचे आक्षेप आणि पर्यावरणीय प्रश्न पुरेशा गांभीर्याने विचारात घेतले जात नसल्याचा आरोप पीपल्स हेल्पलाईन व भारतीय जनसंसदेने केला आहे. शासनाने घेतलेल्या निर्णयांची संपूर्ण माहिती जनतेसमोर पारदर्शकपणे मांडली जात नसल्याबद्दलही संघटनांनी नाराजी व्यक्त केली.

५ नोव्हेंबरला विद्यापीठे व महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा मोर्चा

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

अहिल्यानगर : महाराष्ट्र राज्यातील सार्वजनिक विद्यापीठे व महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी संयुक्त कृती समितीतर्फे ५ नोव्हेंबर २०२६ रोजी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ ते उच्च शिक्षण संचालक कार्यालयावर धडक मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे.



शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा प्रलंबित मागण्यांना त्वरित न्याय मिळावा यासाठी राज्यातील सर्व विध्यापीठे व महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचारी संयुक्त कृती समिती आणि महाराष्ट्र राज्य शिक्षकेतर कर्मचारी महासंघ वतीने आंदोलन पुकारण्यात आले असल्याची माहिती जिल्हा शिक्षकेतर कर्मचारी महासंघाचे जिल्हाध्यक्ष वैभव रोडी, उपाध्यक्ष बाळासाहेब इधे व सचिव संतोष कानडे यांनी दिली.

या मोर्चात जिल्हातील सर्व संघटनाचे पदाधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन आंदोलन यशस्वी करावे असे आवाहन महाराष्ट्र राज्य महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचारी महासंघाचे अध्यक्ष प्रकाश म्हसे, महासचिव रावसाहेब त्रिभुवन तसेच संयुक्त कृती समितीचे प्रमुख अजय देशमुख यांनी केले आहे. या आंदोलनाच्या माध्यमातून सातव्या वेतन आयोगानुसार सुधारीत आश्वासित योजनेचे १०,२० आणि ३० वर्षाचे तीन लाभ तात्काळ लागू करणे, विद्यापीठे व महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना आठवड्यातून पाच दिवसांचे काम लागू करणे, प्रयोगशाळा व ग्रंथालय परिचरांना सुधारीत ग्रेड पे वेतन लागू करणे, विद्यापीठ व महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची रिक्त पदे तात्काळ भरणे आणि कर्मचाऱ्यांचे सेवानिवृत्तीचे वय ६० वर्षे करणे या मागण्यांसाठी शासनाचे लक्ष वेधले जाणार आहे.

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर घरोघर लखपती दीदी योजना : प्रा.सोनाली सालके

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

निघोज : दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाला बळ देण्यासाठी जवळा येथे महिला बचत गटांना बँक ऑफ महाराष्ट्रच्या माध्यमातून १ कोटी रुपयांचे कर्ज वितरण प्रा. सौ. सोनाली संदिप सालके पाटील यांच्या पुढाकारातून कर्ज वितरण कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

दुष्काळी परिस्थितीचा सामना करणाऱ्या ग्रामीण भागातील महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करून त्यांना स्वावलंबनाच्या दिशेने प्रोत्साहित करण्याच्या उद्देशाने महिला बचत गटांसाठी तब्बल १ कोटी रुपयांच्या कर्जाचे वितरण करण्यात आले. बँक ऑफ महाराष्ट्रच्या जवळे व राळेगणसिद्धी शाखांच्या संयुक्त सहकार्याने आयोजित हा कार्यक्रम अहिल्यानगर येथील माननीय मिश्रा साहेब यांच्या अध्यक्षतेखाली आणि प्रा. सौ. सोनाली संदिप सालके पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत उत्साहात पार पडला.

ग्रामीण भागातील महिलांच्या कष्टाला, जिद्दीला आणि उद्योजकतेला आर्थिक पाठबळ मिळावे, त्यांना स्वतःचा व्यवसाय उभारता यावा तसेच कुटुंबाच्या आर्थिक उत्पन्नात भर घालता यावी, या उद्देशाने बँक ऑफ महाराष्ट्रकडून हे कर्ज वितरण करण्यात आले.

यावेळी बोलताना प्रा. सौ. सोनाली सालके पाटील यांनी सांगितले की, दुष्काळी परिस्थितीमुळे ग्रामीण भागातील कुटुंबांसमोर अनेक आर्थिक आव्हाने उभी राहत आहेत. अशा परिस्थितीत महिला बचत गट हे महिलांच्या आर्थिक स्वावलंबनाचे प्रभावी माध्यम ठरत आहेत. बचत गटांच्या माध्यमातून महिलांनी केवळ बचत करण्यापुरते मर्यादित न राहता उद्योग, व्यवसाय आणि उत्पादन क्षेत्रातही पुढाकार घ्यावा. बँकांनी महिलांच्या पाठीशी उभे राहून त्यांना वेळेवर आर्थिक सहकार्य केल्यास ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवी चालना मिळू शकते.



आजचे एक कोटी रुपयांचे कर्ज वितरण म्हणजे केवळ आर्थिक मदत नसून ग्रामीण महिलांच्या स्वप्नांना नवी दिशा, त्यांच्या उद्योगांना नवी संधी आणि कुटुंबांच्या आर्थिक प्रगतीला बळ देणारे महत्त्वपूर्ण पाऊल आहे. महिलांनी मिळालेल्या कर्जाचा योग्य विनियोग करून आर्थिक शिस्त, नियमित परतफेड आणि उद्योजकतेच्या माध्यमातून स्वतःची प्रगती साधावी, असे आवाहनही त्यांनी केले.

महिलांच्या आर्थिक उन्नतीसाठी सातत्याने सहकार्य करणाऱ्या बँक ऑफ महाराष्ट्रच्या सर्व अधिकारी व कर्मचारी वर्गाचे त्यांनी मनःपूर्वक आभार मानले.

यावेळी बँक ऑफ महाराष्ट्रचे विस्तार अधिकारी धीरज वामन, राळेगणसिद्धीचे माजी सरपंच जयसिंग मापारी, राजमाता जिजाऊ महिला सक्षमीकरण अभियान समितीच्या पारनेर तालुकाध्यक्ष तथा महिला बचत गटांच्या तालुकाध्यक्ष प्रा. सौ. सोनाली सालके पाटील, प्रदीप सोमवंशी, पंचायत समितीचे अधिकारी किरण चव्हाण, बँक ऑफ महाराष्ट्र जवळे शाखेचे शाखाप्रमुख सागर पानमंद, जवळे ग्रामपंचायत सदस्य मीना शिंगाडे, ग्रामसेवक शिवाजी खामकर, राळेगणसिद्धी शाखेचे शाखाप्रमुख किरण आवारी उपस्थित होते.

तसेच बँक कर्मचारी वैशाली पठारे, पंकज कुमार, कैलास शिंगाडे, अविनाश सालके, श्याम पठारे, ओंकार मस्के आदी मान्यवर व महिला बचत गटांच्या प्रतिनिधींची उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन किरण आवारी यांनी केले, तर आभार प्रदर्शन सागर पानमंद यांनी मानले. महिला सक्षम तर कुटुंब सक्षम, कुटुंब सक्षम तर गाव सक्षम आणि गाव सक्षम तर देश समृद्ध! या विचाराला प्रत्यक्ष कृतीची जोड देणारा हा उपक्रम ग्रामीण महिलांच्या आर्थिक स्वावलंबनाच्या वाटचालीतील महत्त्वपूर्ण टप्पा ठरला.

दखल

निंबूतच्या दारू विक्रीप्रकरणी महिलांची कारागृहात रवानगी

सोमेश्वरनगर : गुन्हे यापूर्वी दाखल असतानाही हातभट्टीच्या दारू विक्रीचे पुन्हा काही दिवसांत दारू विक्री सुरू ठेवल्याप्रकरणी बारामती तालुक्यातील वडगाव निंबाळकर पोलिसांनी निंबूत येथील दोन महिलांना अटक केली. कोमल प्रमोद नवले आणि जयश्री प्रकाश नवले अशी त्यांची नावे आहेत. अटकेनंतर त्यांची थेट येरवडा कारागृहात रवानगी करण्यात आली. हातभट्टीच्या दारू विक्रीविरोधात पोलिसांकडून सातत्याने कारवाई केली जात आहे. मात्र, यापूर्वीही दारू विक्रीचे गुन्हे दाखल होऊनही संबंधित महिलांनी हा व्यवसाय सुरूच ठेवल्याचे समोर आले. त्यामुळे दारू विक्रेत्यांवर जरब बसविण्यासह त्यांना या व्यवसायापासून परावृत्त करण्याच्या दृष्टीने पोलिसांनी कठोर पाऊल उचलले आहे. हद्दीतील विविध गावांमधून अशा प्रकारे आढळून आल्यास कठोर कारवाई केली जाणार आहे. या प्रकरणी वडगाव निंबाळकर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.वडगाव निंबाळकर सहाय्यक पोलिस निरीक्षक जीवन मोहिते यांच्या मार्गदर्शनाखाली तपासी पोलिस उपनिरीक्षक दीपक वारुळे, पोलिस शिपाई निलेश जाधव, नागनाथ परगे, आरती तोडेकर आणि विकास येटाळे यांनी ही कारवाई केली.

रीक्षा सुरू असताना विद्यार्थ्यांनो वेगाचा थरार नको

दौंड : सध्या सर्वत्र परीक्षेचे वातावरण असून विद्यार्थी परीक्षा केंद्रावर पोहोचण्यासाठी धावपळ करताना दिसत आहेत. मात्र परीक्षेच्या घाईत दुचाकी भरधाव चालवून स्वतः चा जीव धोक्यात घालू नका, असे कळकळीचे आवाहन बारामती फाटा वाहतूक शाखेचे पोलीस हवालदार सुनील साळुंके यांनी विद्यार्थ्यांना केले आहे. परीक्षा ही आयुष्यातील महत्त्वाची पायरी असली तरी विद्यार्थ्यांचे जीवन त्याहून अनमोल आहे. परीक्षा केंद्रावर जाताना दुचाकी सावकाश चालवा, हेल्मेटचा वापर करा, वाहतुकीचे नियम पाळा आणि मोबाईलचा वापर टाळा. वेळेत पोहोचण्याच्या नादात वेग वाढवण्यापेक्षा काही मिनिटे लवकर घरातून निघणे केव्हाही चांगले. रस्त्यावर आपली एक छोटीशी चूक स्वतः सह इतरांच्याही जीवावर बेतू शकते. विद्यार्थ्यांनी परीक्षेचा ताण न घेता आत्मविश्वासाने परीक्षा द्यावी. पालकांनीही आपल्या पाल्यांना वाहन चालवताना काळजी घेण्याबाबत मार्गदर्शन करावे. विद्यार्थ्यांचे उज्ज्वल भविष्य घडविण्यासोबतच त्यांनी सुरक्षितता जपणे हीदेखील समाजाची जबाबदारी आहे.

शिरूर नगरपरिषदेच्या राजकारणात मोठी उलथापालथ!

शिरूर : शिरूर नगरपरिषदेच्या राजकारणात मोठी राजकीय घडामोड घडली. नगरपरिषदेचे उपनगराध्यक्ष मितेश दीपक गादिया यांच्याविरोधात मांडण्यात आलेला अविश्वास ठराव विशेष सर्वसाधारण सभेत बहुमताने मंजूर करण्यात आला. त्यामुळे गादिया यांना उपनगराध्यक्षपदावरून हटविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयामुळे शिरूरच्या स्थानिक राजकारणात नव्या राजकीय समीकरणांची चर्चा सुरू झाली आहे. उपनगराध्यक्ष मितेश गादिया यांच्यासह सहा सदस्यांनी सभात्याग केला. त्यानंतर अविश्वास ठरावाच्या बाजूने मतदान प्रक्रिया पार पडली. यामध्ये ठरावाच्या समर्थनार्थ सर्वाधिक २० मते पडल्याने अविश्वास ठराव बहुमताने मंजूर झाल्याचे नगराध्यक्षांनी जाहीर केले.

४ नोव्हेंबरला जिल्हास्तरीय युवा महोत्सवाचे आयोजन

पुणे : जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, नेहरू युवा केंद्र, टी. सी. कॉलेज, बारामती आणि राष्ट्रीय एकात्मता विद्यार्थी संघटना, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने युवकांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी पुणे जिल्हास्तरीय युवा महोत्सवाचे आयोजन बुधवार, दिनांक ४ नोव्हेंबर २०२६ रोजी टी.सी. कॉलेज, बारामती येथे करण्यात आले आहे.

महोत्सवात समूह लोकनृत्य, समूह लोकगीत, चित्रकला, पथनाट्य, कविता लेखन तसेच विकसित भारत चॅलेंज अंतर्गत पीपीटी सादरीकरण या स्पर्धांचा समावेश आहे. जिल्हास्तरीय सांस्कृतिक स्पर्धांतील विजेत्यांना प्राविण्य प्रमाणपत्र व बक्षीस रक्कम देण्यात येणार आहे. पीपीटी सादरीकरणातून सहा स्पर्धकांची राज्यस्तरीय सहभागासाठी निवड करण्यात येईल. या स्पर्धांसाठी १५ ते २९ वर्षे वयोगटातील युवक-युवती पात्र असतील. स्पर्धकांनी प्रवेश अर्जासोबत आधारकार्ड व जन्माचा दाखला जोडणे आवश्यक आहे.

उजनी धरणावर २ हजार मेगावॅटचा फ्लोटिंग सोलार प्रकल्प

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

पुणे : उजनी धरण परिसरात प्रस्तावित फ्लोटिंग सोलार, बॅटरी स्टोरेज आणि कृत्रिम बुद्धिमत्तेवर (AI) आधारित डेटा सेंटर प्रकल्पाबाबत निर्माण झालेल्या विविध शंका, गैरसमज आणि अफवांवर प्रशासनाने स्पष्टीकरण दिले आहे. या प्रकल्पासाठी राज्य शासनाने १६ एप्रिल २०२६ रोजी सामंजस्य करार (MOU) केला असून, प्रकल्पामुळे स्थानिक विकासाला चालना मिळणार आहे.

प्रस्तावित प्रकल्पांतर्गत उजनी जलाशयाच्या पूर्ण संचय पातळीवरील एकूण ३३ हजार ६३० हेक्टर क्षेत्रापैकी केवळ ३ हजार हेक्टर म्हणजेच सुमारे ९ टक्के क्षेत्रावर फ्लोटिंग सोलार प्रकल्प उभारण्यात येणार आहे. उर्वरित ९१ टक्के जलाशय खुले राहणार आहे. या प्रकल्पातून २ हजार मेगावॅट वीजनिर्मिती अपेक्षित असून, १ हजार ८०० मेगावॅट क्षमतेची बॅटरी स्टोरेज व्यवस्था उभारण्यात येणार आहे. तसेच १.४ गिगावॅट क्षमतेचे अत्याधुनिक अख आधारित डेटा सेंटर प्रस्तावित आहे.

४१५ एकर शासकीय जमिनीवर पहिला टप्पा

प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यासाठी भीमानगर-रांझणी (ता. माढा), तरटगाव आणि हिंगणगाव (ता. इंदापूर) येथील एकूण ४१५.७५ एकर क्षेत्र प्रस्तावित आहे.

दुसऱ्या टप्प्यात वन विभागाची मान्यता मिळाल्यास आणखी १७४ एकर क्षेत्राचा वापर करण्यात येणार आहे. या व्यतिरिक्त कोणतीही खासगी किंवा अन्य शासकीय जमीन संपादित करण्याचे प्रस्तावित



नसल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

भीमानगर येथील जलसंपदा विभागाच्या जागेवर राहणाऱ्या ३११ कुटुंबांसाठी ५१.१८ एकर जमीन कोणताही मोबदला न घेता देण्यात आली आहे. त्यामुळे कोणतेही कुटुंब विस्थापित होणार नसल्याचे प्रशासनाचे म्हणणे आहे. संपादित क्षेत्रातील सुमारे १२ एकर जमिनीवर शेती करणाऱ्या शेतकऱ्यांशी चर्चा करून सकारात्मक निर्णय घेण्यात येणार आहे.

पाणी वापर ०.५ टीएमसीपेक्षा कमी

या प्रकल्पासाठी सहा टीएमसी पाणी लागणार असल्याच्या चर्चेचे प्रशासनाने खंडन केले आहे. प्रकल्प आराखड्यानुसार प्रतिवर्षी ०.४२ टीएम सी पाण्याची आवश्यकता असून, कमाल वापर ०.५ टीएमसी प्रतिवर्षी राहणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. सध्याच्या पाणी वितरण व्यवस्थेत कोणतीही कपात केली जाणार नसल्याने शेतकऱ्यांच्या पाणीपुरवठ्यावर परिणाम होणार नसल्याचा दावा करण्यात आला आहे.

डेटा सेंटरमध्ये पारंपरिक पाणीआधारित कूलिंगऐवजी 'क्लोज्ड लूप डायरेक्ट टू चिप' तंत्रज्ञान वापरण्यात येणार आहे. त्यामुळे पाण्याचा वापर मर्यादित राहील. तसेच कोणतेही प्रक्रिया सांडपाणी उजनी धरणात अथवा नदीत सोडले जाणार नसल्याचे प्रशासनाने नमूद केले आहे.

ग्रीन हायड्रोजन आणि अणुऊर्जा प्रकल्प नसणार

उजनी परिसरात ग्रीन हायड्रोजन किंवा स्मॉल मॉड्युलर रिॲक्टर (डचठ) आधारित अणुऊर्जा प्रकल्प उभारण्यात येणार असल्याच्या चर्चाही प्रशासनाने फेटाळल्या आहेत. ग्रीन हायड्रोजन प्रकल्प प्रस्तावातून वगळण्यात आला असून, डचठ प्रकल्पाचाही समावेश नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

२ हजार ८०० कायमस्वरूपी रोजगारांची अपेक्षा :

या प्रकल्पातून सुमारे २ हजार ८०० कायम स्वरूपी आणि ४० हजार प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगारनिर्मिती अपेक्षित असल्याचे प्रशासनाने म्हटले आहे. पुणे आणि सोलापूर जिल्ह्यातील अभियांत्रिकी तसेच उच्च तंत्रशिक्षण संस्थांमधील विद्यार्थ्यांना रोजगार आणि इंटर्नशिपच्या संधी उपलब्ध होऊ शकतात.

फ्लोटिंग सोलार प्रकल्पामुळे महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाला दरवर्षी सुमारे १८० कोटी रुपयांचे उत्पन्न मिळण्याची अपेक्षा आहे. हा निधी उजनी प्रकल्पाच्या देखभाल-दुरुस्ती आणि पाणी वितरण व्यवस्थेसाठी वापरण्यात येणार आहे. तसेच कंपनीच्या उड्ठ निधीतून स्थानिक पायाभूत सुविधांचा विकास करण्याचे नियोजन आहे.

पर्यावरणीय मान्यतांनंतरच पुढील कार्यवाही

जलाशयाच्या ९१ टक्के क्षेत्रावर सूर्यप्रकाश उपलब्ध राहणार असल्याने मासे, जलचर आणि जैवविविधतेवर परिणाम होणार नसल्याचा दावा प्रशासनाने केला आहे.

प्रकल्पाच्या मंजुरीपूर्वी पर्यावरण आणि जैवविविधतेविषयक आवश्यक मान्यता घेण्यात येणार आहेत. फ्लोटिंग सोलारमुळे बाष्पीभवन कमी होऊन वार्षिक सुमारे १.५ टीएमसी पाण्याची बचत अपेक्षित असल्याचेही निवेदनात नमूद आहे.

प्रकल्पाबाबत स्थानिक नागरिकांच्या शंकांचे निरसन करण्यासाठी महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे यांच्यामार्फत स्वतंत्र प्रकल्प समन्वयक नियुक्त करण्यात येणार आहे.

भीमानगर, तरटगाव आणि हिंगणगाव येथील प्रत्येकी चार स्थानिक प्रतिनिधींची निवड करून त्यांच्या माध्यमातून नागरिकांशी संवाद साधला जाणार आहे, अशी माहिती उपविभागीय अधिकारी, सीना माढा प्रकल्प उपविभाग क्रमांक १ आणि उजनी धरण व्यवस्थापन उपविभाग यांनी कळविले आहे.

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर पुणे जिल्हा ब्राह्मण महासंघाचा माणुसकीचा दीप!

३ गावात दिवाळीपूर्वी गोरगरिबांना २५० शिधा किटचे वाटप

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

कवठे येमाई : दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर सर्वसामान्य आणि गरजू कुटुंबांची दिवाळी गोड व्हावी,या उदात्त हेतूने पुणे जिल्हा ब्राह्मण महासंघाच्या वतीने रविवार, दि. १ नोव्हेंबर रोजी शिरूर तालुक्यातील कानूर मेसाई, मिडगुलवाडी आणि कवठे येमाई परिसरात तब्बल २५० शिधा किटचे वाटप करण्यात आले. सामाजिक बांधिलकी जपत राबविण्यात आलेला हा अभिनव उपक्रम राज्यात पहिलाच असल्याचे मत आयोजकांनी व्यक्त केले असून,सर्व स्तरांतून या उपक्रमाचे अभिनंदन व कौतुक होत आहे.

दिवाळीच्या सणाची चाहूल



लागली असतानाच दुष्काळाचे सावट गडद होत आहे. अशा परिस्थितीत आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि गरजू कुटुंबाच्या घरातही दिवाळीचा आनंद फुलावा, या भावनेतून महासंघाने हा उपक्रम हाती घेतला. हरभरा डाळ,पोहे,साखर,तांदूळ,रवा आदी जीवनावश्यक वस्तूंचा समावेश असलेली शिधा किट प्रत्यक्ष गरजू कुटुंबांपर्यंत पोहोचविण्यावर विशेष भर देण्यात आला.

या उपक्रमासाठी पुणे जिल्हा ब्राह्मण महासंघाचे जिल्हाध्यक्ष मंदार रेडे, पुणे जिल्हा महिला आघाडीच्या अध्यक्षा केतकी कुलकर्णी, अनिरुद्ध पळशीकर (कोथरूड), महिला आघाडीच्या सरचिटणीस आकांक्षा देशपांडे, शिक्षक आघाडीचे अध्यक्ष स्वाती बहुलकर, सरचिटणीस सुरेश कुलकर्णी (कोथरूड), वारजे शाखाध्यक्ष अभिनव पाठक, माधव कुलकर्णी, कमलाकर कुलकर्णी, आदित्य कुलकर्णी, शिक्रापूर शाखेच्या महिला आघाडीच्या अध्यक्षा दीपाली जोशी यांच्यासह महासंघाचे असंख्य पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. स्थानिक पातळीवर ही या उपक्रमाला उत्स्फूर्त सहकार्य लाभले. शिरूर पंचायत समितीच्या माजी सदस्य डॉ.कल्पना पोकळे, योग्य लाभार्थ्यांपर्यंत पोहोचण्यासाठी मोलाचे योगदान दिले.



पिंपळे जगताप (ता. शिरुर) येथील सेवाधाम मतिमंद निवासी विद्यालयात पणत्या रंगवताना विशेष विद्यार्थी.
(छायाचित्र आकाश भोरडे)

सेवाधामच्या विशेष मुलांनी रंगवल्या दिवाळी निमित्त पणत्या

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

तळेगाव ढमढेरे : पिंपळे जगताप (ता. शिरूर) येथील सेवाधाम मतिमंद निवासी विद्यालयातील विशेष (बौद्धिक दिव्यांग) विद्यार्थ्यांनी स्वतःच्या हस्तकौशल्याचा वापर करत सुंदर पणत्या रंगवल्या असून विद्यार्थ्यांच्या सदर उपक्रमाने विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेला व आत्म निर्भरतेला प्रोत्साहन मिळाले आहे.

विशेष विद्यार्थ्यांसाठी असे उपक्रम राबवल्यास विशेष विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढून समाजामध्ये त्यांच्याविषयी सकारात्मक दृष्टीकोन निर्माण होऊन दिवाळीसारख्या सणात त्यांच्या सहभागाने आनंद द्विगुणित होत असल्याचे देखील मुख्याध्यापक पवन कट्यारमल यांनी सांगितले.

पिंपळे जगताप (ता.शिरूर) येथील सेवाधाम मतिमंद निवासी विद्यालय येथे बौद्धिक दिव्यांग अशा विशेष विद्यार्थ्यांनी मुख्याध्यापक पवन कट्यारमल, कलाशिक्षक संजय पोटफोडे व श्रीकृष्ण हरगुडे यांच्या मार्गदर्शनाने सुंदर रंगीबेरंगी पर्यावरण पुरक रंग वापरुन आकर्षक पणत्या तयार केल्या असून या उपक्रमात देवराज पवार, संकेत दाभाडे, श्रावण खेडेकर, नवरतन चौधरी, आर्यन नागवडे, प्रज्वल चांदगुडे, समर्थ डोळसे या विशेष विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता, तर सदर पणत्यांचे प्रदर्शन व विक्री आयोजन विद्यालय परिसरात करण्यात येणार असून या अनोख्या उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या हस्तनेत्र कौशल्य विकसित करणे, रंगसंगती, मोजणी, एकाग्रता वाढविणे असे असल्याचे विद्यालयाचे मुख्याध्यापक पवन कट्यारमल यांनी सांगितले.

अजित वडगावकर यांना 'हिंदू रत्न पुरस्कार-२०२६' प्रदान

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

आळंदी देवाची : श्री ज्ञानेश्वर शिक्षण संस्थेचे सचिव तथा अजित वडगावकर यांना शिक्षण, समाजसेवा, धार्मिक कार्य आणि उद्योग क्षेत्रातील चार दशकांच्या उल्लेखनीय योगदानाबद्दल 'भारतरत्न सरदार वल्लभभाई पटेल हिंदू रत्न पुरस्कार-२०२६' प्रदान करण्यात आला. पुणे येथे महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाचे अध्यक्ष रवींद्र साठे यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी मणिभाई मानव सेवा ट्रस्टचे अध्यक्ष



डॉ.रवींद्र भोळे, संजय महाराज घुंडरे, विठ्ठल शिंदे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

वडगावकर यांनी गेली २६ वर्षे श्री ज्ञानेश्वर शिक्षण संस्थेच्या सचिवपदाची जबाबदारी सांभाळताना शैक्षणिक विकासात मोलाचे योगदान दिले आहे. तसेच कोरोना काळातील मदतकार्य, वारकरी संप्रदायासाठीचे कार्य, सामाजिक उपक्रम आणि वडगावकर सेल्स कॉर्पोरेशन व इंद्रायणी इंडस्ट्रियल असोसिएशनच्या माध्यमातून उद्योग-व्यापार क्षेत्रातही त्यांनी उल्लेखनीय कामगिरी केली आहे.पुरस्काराबद्दल भावना व्यक्त करताना अजित वडगावकर यांनी हा सन्मान माऊलींची कृपा, संत-महंतांचे आशीर्वाद, वाडवडिलांची पुण्याई तसेच संस्था पदाधिकारी, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी, प्रसारमाध्यमांचे प्रतिनिधी, कुटुंबीय, नातेवाईक आणि मित्रपरिवार यांच्या सहकार्याचे फलित असल्याचे सांगितले. हा पुरस्कार त्यांनी या सर्वांना समर्पित केला.

पावसाचा प्रत्येक थेंब जमिनीत मुरवून गावे जलसुरक्षित व स्वयंपूर्ण करा : दिलीप कुमार

पुणे जिल्ह्यातील खेड तालुक्यातील जलसंधारण कामांची केंद्रीय भूमिसंसाधन विभागाच्या सचिवांकडून पाहणी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

पुणे : पावसाचा प्रत्येक थेंब अडवून तो जमिनीत मुरवणे आवश्यक आहे. त्यातूनच गावे जलसुरक्षित आणि स्वयंपूर्ण बनतील, असे प्रतिपादन केंद्रीय ग्रामीण विकास मंत्रालयाच्या भूमिसंसाधन विभागाचे (DOLR) सचिव श्री. दिलीप कुमार यांनी केले. प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना २.० अंतर्गत जलसंधारण विकास घटक (WDC-PMKSY 2.0) योजनेच्या माध्यमातून पुणे जिल्ह्यातील खेड तालुक्यातील वरुडे, गुलाणी आणि वाफगाव या गावांमध्ये सुरू असलेल्या जलसंधारण कामांची त्यांनी पाहणी केली.

या वेळी ग्रामस्थांशी संवाद साधताना दिलीप कुमार म्हणाले की, पाणी हे आपल्या भविष्याचा आधार आहे. त्यामुळे पावसाचा प्रत्येक थेंब जतन करून जमिनीत मुरवला पाहिजे. जलसंधारणाच्या माध्यमातून निर्माण झालेल्या पाणलोट संरचनांची नियमित देखभाल व दुरुस्ती करण्याची सामूहिक जबाबदारी ग्रामस्थांनी स्वीकारावी. या मालमत्ता पुढील २० वर्षे कार्यरत राहतील, यासाठी प्रयत्न करावेत. खेड प्रकल्पांतर्गत येणाऱ्या गावांचे रूपांतर हिवरे बाजारच्या धर्तीवर जलसुरक्षित व स्वयंपूर्ण गावांमध्ये करण्याचे आवाहनही त्यांनी केले.

सचिवांनी डोंगरमाथ्यापासून पायथ्यापर्यंत (Ridge to Valley) या तत्त्वावर विकसित केलेल्या विविध जलसंधारण कामांची पाहणी केली. यामध्ये सलग सम तल चर (CCT), माती नाला बांध, सिमेंट नाला बांध, कोल्हापूर पद्धतीचे बंधारे आणि जलसाठा तलावांचा समावेश होता. या संरचनांमुळे पावसाचे वाहून जाणारे



पाणी रोखणे, भूजल पुनर्भरण वाढवणे आणि शेतीसाठी पाण्याची उपलब्धता सुधारणे याबाबत त्यांनी आढावा घेतला.

याशिवाय शेततळी, फळबाग लागवड, लाभार्थ्यांना देण्यात आलेली कृषी उपकरणे तसेच महिला बचत गटांना मिळालेल्या लाभांचीही त्यांनी माहिती घेतली. जलसंधारण समित्यांचे प्रतिनिधी आणि लाभार्थ्यांशी संवाद साधून योजनेच्या अंमलबजावणीचा आढावा घेतला. खेड प्रकल्पांतर्गत ११ गावांमध्ये झालेल्या जलसंधारण कामांमुळे भूजल पातळीत सुधारणा झाली असून शेतकऱ्यांना वर्षातून दोन ते तीन पिके घेणे शक्य झाले आहे. परिणामी शेतीचे उत्पन्न आणि ग्रामीण उपजीविकेत वाढ झाली असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले.

यंदा दुष्काळसदृश परिस्थिती असूनही शेततळ्यांमधील पाणीसाठा तसेच सिमेंट नाला बांध आणि समतल चरांमुळे विहिरींच्या पाणीपातळीत झालेली वाढ यामुळे उभ्या पिकांना सिंचन करणे शक्य झाल्याचे त्यांनी नमूद केले.

महाराष्ट्रातील दुष्काळप्रवण भागांमध्ये जलसंधारणाची कामे वेळेत पूर्ण करण्यास प्राधान्य द्यावे, असे निर्देश दिलीप कुमार यांनी अधिकाऱ्यांना दिले. एल निनोच्या संभाव्य परिणामांच्या पार्श्वभूमीवर राज्यातील ३०४ दुष्काळप्रभावित तालुक्यांपैकी योजनेत समाविष्ट असलेल्या ७६ तालुक्यांमध्ये कामांना गती देण्याचे त्यांनी सांगितले. पाणी साठवण क्षमता वाढविण्यासाठी पाझर तलाव, साठवण तलाव, साठवण बंधारे आणि कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्यांची कामे प्राधान्याने पूर्ण करावीत. यामुळे गावांमधील पाण्याची उपलब्धता वाढून पिकांना संरक्षित सिंचन मिळेल आणि दुष्काळी परिस्थितीतील शेतीची जोखीम कमी होईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

पुण्यातील यशदा येथे सचिव दिलीप कुमार यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक नुकतीच घेण्यात आली. या बैठकीस महाराष्ट्र शासनाच्या मृद व जलसंधारण विभागाचे सचिव डॉ. जितेंद्र पापळकर, संयुक्त सचिव नितीन खाडे तसेच वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणेचे अधिकारी व क्षेत्रीय कर्मचारी उपस्थित होते.

या बैठकीत WDC-PMKSY 2.0 योजनेच्या आर्थिक आणि भौतिक प्रगतीचा आढावा घेण्यात आला. सर्व प्रकल्प निर्धारित वेळेत पूर्ण करणे, कामांचा दर्जा राखणे, केंद्र व राज्य शासनामधील समन्वय अधिक मजबूत करणे आणि उपलब्ध निधीचा प्रभावी वापर करणे यावर विशेष भर देण्यात आला.

नैसर्गिक ओढा बुजवून भूमी अभिलेख कार्यालयाची नवी इमारत?

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

शिरुर : नागरिकांच्या जागा तसेच शेतजमिनींची शासकीय अधिकृत मोजणी करून हद्द कायम करणे आणि संबंधित जागेची मोजणी क प्रत उपलब्ध करून देणाऱ्या शिरूर भूमी अभिलेख कार्यालयाच्या नवीन इमारतीच्या बांधकामासाठी नैसर्गिक ओढा बुजविण्यात आल्याचा धक्कादायक आरोप नागरिकांनी केला आहे. तहसील कार्यालयालगत सुरू असलेल्या या बांधकामाची महसूल प्रशासनाने तातडीने स्थळ पाहणी करून प्रत्यक्ष पंचनामा करावा, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

शिरूर तहसील कार्यालयाजवळ भूमी अभिलेख कार्यालयाच्या नवीन इमारतीचे बांधकाम सध्या जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून सुरू आहे. मात्र, या ठिकाणाहून पूर्वीपासून वाहत असलेला नैसर्गिक ओढा बुजवून त्याच ठिकाणी बांधकाम सुरू असल्याचे नागरिकांच्या निदर्शनास आले आहे. याबाबत नागरिकांनी भूमी अभिलेख कार्यालयाचे उपअधीक्षक अमोल भोसले यांच्या निदर्शनासही ही बाब आणून दिल्याचे सांगण्यात येत आहे. मात्र, त्यानंतरही बांधकाम सुरू असल्याने नागरिकांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. नैसर्गिक जलप्रवाह असलेल्या जागेवर बांधकामाला परवानगी कशी मिळाली? तसेच या ठिकाणी ओढा अस्तित्वात असताना बांधकामासाठी निधी मंजूर करताना संबंधित यंत्रणांनी प्रत्यक्ष जागेची पाहणी केली होती का? बांधकामासाठी जागा निश्चित करताना नैसर्गिक जलप्रवाहाची नोंद घेण्यात आली होती का? असे अनेक प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केले जात आहेत.विशेष म्हणजे, अनेक वर्षांपासून अस्तित्वात असल्याचे नागरिकांचे म्हणणे असलेला हा नैसर्गिक ओढा भूमी अभिलेख विभाग व शिरूर सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच संबंधित शासकीय यंत्रणांच्या निदर्शनास कसा आला नाही,असा सवालही उपस्थित होत आहे.

जाहीर निविदा

ग्रामपंचायत धामणी (ता. आंबेगाव) जि. पुणे खालील नमुद कामे करार पद्धतीने करून घेणेची आहेत. याकामी नोंदणीकृत ठेकेदारांनी उक्त नोंदणी प्रमाणपत्र, आदी कागदपत्र स्वतंत्र सीलबंद करणे त्यातुन (लखोटा क्र.१) आणि निविदा अन्य स्वतंत्र लखोट्यातून (लखोटा क्र.२) ग्रामपंचायत कार्यालयात खालील विहीत मुदतीत सादर करणेचा आहेत. लखोटा क्र. १ मध्ये आवश्यक कागदपत्रांच्या छायांकित प्रति उपलब्ध झाल्यातरच निविदेचा लखोटा क्र. २ उघडणेत येईल. लखोटा क्र. १ मध्ये उपरोक्त आवश्यक कागदपत्र उपलब्ध नसल्यास लखोटा क्र. २ उघडला जाणार नाही.

अ.क्र.	कामाचे नाव	अंदाजपत्रकीय रक्कम रु.	टेंडर फी रु.	कंत्राटदर वर्ग	कामाची मुदत
१.	मौजे धामणी येथील श्रीरामनगर बंदिस्त गटर करणे, ता.आंबेगाव.	१,६९,५८२.००/-	२०० /-	सु. बे.	३ महिने
२.	मौजे धामणी येथे करंजखेले मळ्यातील हनुमान मंदिर समाजमंदिर दुरुस्ती करणे,ता.आंबेगाव.	८४,०३०.००/-	२०० /-	सु. बे.	३ महिने
३.	मौजे धामणी येथील श्री.शिवाजी विद्यालय जवळील स्मशानभूमी सुधारणा करणे, ता.आंबेगाव.	१,५१,९४५.००/-	२०० /-	मजूर संस्था	३ महिने

वरील नमूद कामाचे कोरे निविदा फॉर्म कार्यालयीन वेळेत रक्कम रुपये २००/- फक्त भरणा केल्यानंतर उपलब्ध होईल. याकामी इच्छुक नोंदणीकृत ठेकेदारांनी आपल्या निविदा व उपरोक्त नमूद कागदपत्रे यांचे स्वतंत्र लखोटे तयार करून त्याला क्रमांक नमूद करून दिनांक ०६/१०/२०२६ रोजी दुपारी ठीक पाच वाजेपर्यंत ग्रामपंचायत कार्यालयात सादर करण्याचा आहे. सदर कामी विहित मुदतीत न आलेल्या व बयाणा रक्कम न भरलेल्या या नोंदणी प्रमाणपत्र आवश्यक कागदपत्रे असणारा लखोटा सादर न केलेल्या निविदा स्वीकारल्या जाणार नाही. प्राप्त निविदा लगतचे मासिक मिटिंगमध्ये उघडण्यात येतील.
प्राप्त निविदापैकी कोणतीही निविदा स्वीकारणे वा कोणतेही कारण न देता फेटाळण्याचा हक्क ग्रामपंचायतने राखून ठेवलेला आहे.

ग्रामसेवक
ग्रामपंचायत धामणी

सरपंच
ग्रामपंचायत धामणी

श्री वीरभद्र आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना दिवाळी फराळाची अनोखी भेट!

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



जामखेड : दिवाळी म्हणजे आनंद, उत्साह, मांगल्य, प्रेम आणि आपुलकीचा सण! मात्र समाजातील प्रत्येक घटकाच्या आयुष्यात या आनंदाचा प्रकाश पोहोचतोच असे नाही. याच सामाजिक जाणीवेतून वंचित, दुर्लक्षित, निराधार आणि गरजू विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलविण्याच्या उदात्त हेतूने जैन कॉन्फरन्स चतुर्थ झोन दिल्ली, कोठारी प्रतिष्ठान आणि समर्थ हॉस्पिटल जामखेड यांच्या संयुक्त विद्यमाने संजीवनी मेडिकल ट्रेनिंग सेंटर संचलित श्री वीरभद्र प्राथमिक आश्रमशाळा, बारादरी, अहिल्यानगर येथे शनिवार, दिनांक ३१ ऑक्टोबर २०२६ रोजी दिवाळी फराळ वाटपाचा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

या उपक्रमांतर्गत विमुक्त जाती, भटक्या जमाती, आदिवासी आणि ओबीसी समाजातील आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना दिवाळी फराळाचे वाटप करण्यात आले. मान्यवरांनी स्वतः विद्यार्थ्यांना फराळाचे वाटप करून त्यांच्यासोबत दिवाळीचा आनंद साजरा केला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद आणि समाधानाचे भाव उमटले.

३५ वर्षांची समाजसेवेची परंपरा; संजय कोठारी यांचा प्रेरणादायी प्रवास

यावेळी सामाजिक कार्यकर्ते संजय कोठारी यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, गेल्या तब्बल ३५ वर्षांपासून दिवाळीच्या पावन पर्वावर समाजातील गरजू, निराधार आणि वंचित घटकांसोबत आनंद वाटून घेण्याची परंपरा आम्ही जपली आहे. वृद्धाश्रम, अनाथाश्रम, मूकबधिर विद्यालये तसेच समाजातील दुर्लक्षित घटकांपर्यंत दिवाळीचा गोडवा पोहोचविण्यासाठी दरवर्षी विविध उपक्रम राबविले जातात. घरातून दिवाळीच्या फराळाच्या खरेदीसाठी दोन वेळा यादी देण्यात आली होती; मात्र स्वतःच्या घरातील दिवाळी साजरी करण्यापूर्वी समाजातील या मुलांची दिवाळी साजरी करायची, असा विचार मनात असल्याने प्रथम या विद्यार्थ्यांसोबत दिवाळी साजरी करण्याचा निर्णय घेतल्याचे त्यांनी सांगितले. त्यांच्या या विचारातून सामाजिक संवेदनशीलतेचे दर्शन घडले.

श्री वीरभद्र आश्रमशाळेतही संजय कोठारी यांनी मागील वर्षभरात तीन सामाजिक उपक्रम राबविले आहेत. यापूर्वी विद्यार्थ्यांना २०० वह्यांचे वाटप करण्यात आले होते, तसेच २०० विद्यार्थ्यांना शालेय गणवेश देण्यात आले होते. आजचा दिवाळी फराळ वाटपाचा उपक्रम या सेवाकार्यातील आणखी एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरला. यावेळी बोलताना जैन कॉन्फरन्सचे राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य राजेंद्र बलदोटा म्हणाले की, सामाजिक कार्यकर्ते संजय कोठारी हे वर्षातील सुमारे ३६५ दिवस सामाजिक कार्यासाठी झटत असतात. त्यांच्या आजोबांनीही सामाजिक कार्याचा आदर्श निर्माण केला होता. त्याच समाजसेवेचा वारसा संजय कोठारी यांनी पुढे चालविला आहे. त्यांचे आजोबा उच्चाधिकार समितीचे सचिव होते. त्यांना लाल दिव्याची गाडी असतानाही त्यांनी समाजातील सर्व स्तरांतील लोकांसाठी काम करण्याला प्राधान्य दिले. त्याच विचारांचा वारसा संजय कोठारी यांनी स्वीकारला असून जैन कॉन्फरन्सच्या माध्यमातून ते देशभर समाजसेवेचा आदर्श निर्माण करीत आहेत. दिवाळीसारखा सण भटक्या, विमुक्त, अनाथ आणि वंचित मुलांसोबत साजरा करून त्यांनी समाजासमोर माणुसकीचा सुंदर संदेश दिला आहे, असे गौरवोद्गार त्यांनी काढले. कार्यक्रमाचे अध्यक्ष एन.टी.व्ही. न्यूज महाराष्ट्र राज्याचे संपादक इकबाल शेख यांनी संजय कोठारी यांच्या सामाजिक कार्याचे कौतुक केले. ते म्हणाले की, संजय कोठारी यांचे कार्य मी अनेक वर्षांपासून पाहत आहे. अपघातातील जखमींना मदत करून त्यांचे प्राण वाचविण्याच्या कार्यात त्यांनी मोठे योगदान दिले आहे. आतापर्यंत सुमारे ७,३५० अपघातग्रस्तांना मदत करून त्यांचे प्राण वाचविण्याचा प्रयत्न त्यांनी केला असल्याचे त्यांनी नमूद केले. समाजासाठी निःस्वार्थपणे कार्य करणाऱ्या अशा व्यक्तींचा आदर्श नव्या पिढीने घ्यावा, असेही त्यांनी सांगितले.

कार्यक्रमात चंदूकाका ज्वेलचे युवा उद्योजक आनंद कांतीलाल कोठारी यांनी आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांसाठी ५०० वह्या देण्याचे जाहीर केले. तसेच विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व शाळा विकासाच्या कार्यासाठी पुढील मान्यवरांनी आर्थिक मदत जाहीर केली. दिवाळीच्या सणाला केवळ घराघरांत दिवे लावणे, रोषणाई करणे आणि फराळाचा आस्वाद घेणे एवढेच महत्त्व नाही, तर समाजातील गरजू व्यक्तींच्या जीवनात आनंद निर्माण करणे हीच दिवाळीची खरी शिकवण आहे. वंचित विद्यार्थ्यांना प्रेम, आपुलकी आणि सहकार्याची भेट देणारा हा उपक्रम सामाजिक बांधिलकीचे उत्तम उदाहरण ठरला. दुसऱ्यांच्या जीवनात आनंदाचा दीप प्रज्वलित करणे, त्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलविणे आणि त्यांच्या भविष्याला शिक्षणाच्या प्रकाशाने उजळविणे, हीच खऱ्या अर्थाने माणुसकीची दिवाळी आहे!

द•ख•ल



हातगाव ग्रामस्थांच्या वतीने कांबळे, गरकळ व गलांडे यांचा सन्मान

हातगाव : शेवगाव तालुक्यातील हातगाव येथील ग्रामस्थांच्या वतीने जिल्हा परिषद शाळेचे शिक्षक अंबादास विठ्ठल कांबळे व सामाजिक क्षेत्रात कायम पुढाकार घेणारे संजय रामभाऊ गलांडे यांना पाथर्डी तालुक्यातील निंबादैत्यनांदूर येथील जय भगवान युवा प्रतिष्ठान मार्फत दिला जाणारा राज्यस्तरीय आदर्श पुरस्कार तसेच गलांडे यांना आदर्श कार्य गौरव पुरस्कार तर रोटरी क्लब ऑफ इंडिया शेवगाव यांचे तर्फे दिला जाणारा आदर्श शिक्षक पुरस्कार देविदास बाबासाहेब गरकळ या तिघांनाही जाहीर होऊन त्याचे वितरणही नुकतेच विविध मान्यवरांच्या उपस्थितीत झाले असून या तिघांचाही एकत्रित सन्मान ग्रामस्थांच्या वतीने जिल्हा परिषद शाळा येथे नुकताच घेण्यात आला आहे. शिक्षक कांबळे व गरकळ यांनी आपल्या शाळेत ग्रामस्थांशी वेळोवेळी संपर्क साधून लोकवर्गणीतून जे वेग जी वेगळे उपक्रम राबवले आहेत ते उपक्रम स्तुत्य असल्याने त्यांनी केलेल्या या उपक्रमाची दखल घेत सदर संस्थेने त्यांच्या नावाने पुरस्कार जाहीर केले होते. या वेळी हातगाव केंद्र शाळेत नव्याने हजर झालेले केंद्रप्रमुख कपिल पुलकंठवार यांचाही सत्कार करण्यात आला आहे. या वेळी बंडू घुले, बंडू हागे,भारत अभंग, शंकर भराट, गोरख कदम, दिगंबर गाडे,रामेश्वर अकोलकर,अंकुश गवळी, बाबासाहेब बावणे यांच्यासह अनेक ग्रामस्थ तसेच मुख्याध्यापक गणेश पुरुषोत्तम,शिक्षक हरीभाऊ सरदार, बाळासाहेब वाघुंबरे,संजीवन शेलार,श्रीमती वर्षा नागरे व दत्तात्रय लेंडाळ उपस्थितीत होते.

धार्मिक संप्रदाय वाढविण्यासाठी लाळगे मळा परिसरातील जनतेचे योगदान सर्वाधिक

निघोज : गेली १७ वर्षांपासून लाळगे मळा येथील वागजाई मंडळाच्या माध्यमातून अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले असून हे मंडळ प्रत्येक धार्मिक सण असो किंवा उस्तव मोठ्या प्रमाणात साजरे करुण धार्मिक संप्रदाय वाढविण्यासाठी महत्वपूर्ण योगदान



देत असल्याचे प्रतिपादन समाधान महाराज शर्मा यांनी व्यक्त केले आहे. निघोज परिसरातील लाळगे मळा येथील वागजाई मंडळाने अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन केले होते यावेळी काल्याच्या किर्तनानिमीत्ताने ते उपस्थीतांना मार्गदर्शन करताना बोलत होते. या अखंड हरिनाम सप्ताहात नरहरी महाराज सांगळे, अर्चनाताई गिरी महाराज, कैलास महाराज येवले, समाजप्रबोधनकार वैभव महाराज गाढवे आदिंचे किर्तने झाले. प्रत्येक किर्तनाला मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते. समाधान महाराज शर्मा यावेळी म्हणाले मी गेली वीस वर्षांपासून अहिल्यानगर व पुणे जिल्ह्यात किर्तने,प्रवचने व धार्मिक कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित असतो. निघोज येथील भावीकांचे आपल्यावर विशेष प्रेम आहे. निघोज परिसरातील प्रत्येक वाडी वस्तीवर अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात येते. तालुक्यातील हे पहिले गाव असे आहे की या गावात ३६५ दिवस धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. धार्मिक संप्रदायांची आज खऱ्या अर्थाने गरज असल्याचे त्यांनी आपल्या किर्तनात सांगितले. यावेळी कै. ताईबाई बाबुराव लाळगे यांच्या स्मरणार्थ भागाशेठ लाळगे व डी बी लाळगे कंट्रक्शन कंपनीचे अध्यक्ष दत्तात्रय लाळगे यांच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

गोरगरीबांची दिवाळी उपक्रम १३ व्या वर्षी संपन्न होणार

निघोज : गेली बारा वर्षांपूर्वी माजी सरपंच व माजी उपसभापती संदीप पाटील वराळ यांनी त्यांच्या सहकाऱ्यांच्या माध्यमातून गोरगरीबांची दिवाळी हा सामाजिक उपक्रम सुरू केला होता. मात्र संदीप पाटील वराळ यांच्या अनुपस्थितीत सुध्दा गेली दहा वर्षांपासून संदीप पाटील वराळ जनसेवा फाऊंडेशनचे तालुकाध्यक्ष सचिन पाटील वराळ व त्यांच्या सहकाऱ्यांनी हा सामाजिक उपक्रम सुरू ठेवला असून हे या उपक्रमाचे १३ वे वर्ष आहे. गेली चार दिवसांपासून लोकसहभागातून मोठ्या प्रमाणात जनतेने योगदान दिले असून दिवाळी पाडव्याच्या आदल्या दिवशी म्हणजे सोमवार दि.९ रोजी कपिलेश्वर मंगल कार्यालयात जवळपास दिड हजार कुटुंबांना साडी व मिठाई वाटप तसेच ज्येष्ठ मंडळींचा सत्कार करीत हा सामाजिक उपक्रम संपन्न होणार आहे. संदीप पाटील वराळ जनसेवा फाऊंडेशन माध्यमातून लोकांच्या अडीअडचणीला मदत करण्याचे काम पदाधिकारी व सदस्य ३६५ दिवस करीत असतात मात्र यावर्षी पाऊस पाणी नाही दुष्काळी परिस्थिती सर्वत्र आहे याचा फटका पारनेर तालुक्यातील जनतेला सर्वाधिक बसणार आहे. पाण्यावर शासनाचे कडक निर्बंध आहेत. याचा फटका निघोज परिसराला जास्त प्रमाणात बसणार असल्याने संदीप पाटील गोरगरीबांची दिवाळी हा सामाजिक उपक्रम घरोघर जाण्यासाठी जास्तीत जास्त गरीब कुटुंबातील लोकांना याचा लाभ मिळण्यासाठी जास्तीत जास्त देणगी देण्याचे आवाहन संदीप पाटील वराळ जनसेवा फाऊंडेशनचे पदाधिकारी व सदस्य यांनी केले आहे.

अभियंता डॉ. डी. एस. काटे यांना राज्यपालांच्या हस्ते सन्मान



शेवगाव : राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावर वित्तीय साक्षरता या विषयावर लिखाणाद्वारे व शिबिरांद्वारे प्रबोधन केल्याबद्दल उद्योजक, अभियंता व अर्थशास्त्र विषयाचे अभ्यासक डॉ. डी. एस. काटे यांना जम्मू-काश्मीर व लडाख स्थापना दिनानिमित्त महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांच्या हस्ते मुंबई येथील राजभवनातील दरबार हॉलमध्ये सन्मानित करण्यात आले. शेवगाव तालुक्यातील आखेगाव येथिल डॉ. काटे हे अभियंता असून यशस्वी उद्योजक आहेत. उद्योग आणि अभियांत्रिकी क्षेत्रातील प्रदीर्घ अनुभवासोबतच त्यांनी अर्थशास्त्र विषयात डॉक्टरेट प्राप्त केली आहे. सामान्य माणसाला अर्थशास्त्र सोप्या भाषेत समजावे, त्याने कर्जाच्या जाळ्यात अडकू नये, बचत व योग्य गुंतवणूक करावी, यासाठी ते गेली अनेक वर्षे कार्यरत आहेत.या कार्याची दखल घेऊन त्यांना हा सन्मान देण्यात आला. यावेळी बोलताना डॉ. काटे म्हणाले, वित्तीय साक्षरता हीच खरी आर्थिक स्वातंत्र्याची चावी आहे. प्रत्येक कुटुंब आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हावे, हाच माझ्या लिखाणाचा व शिबिरांचा उद्देश आहे. राज्यपालांच्या हस्ते मिळालेला हा सन्मान माझ्या कार्याला नवी ऊर्जा देणारा आहे. देशभरातून अनेक मान्यवर कार्यक्रमास उपस्थित होते.

श्री धाकोजी महाराज विद्यालयाची तिरुपती बालाजी सहल उत्साहात



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

राशीन : विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षणासोबतच प्रत्यक्ष अनुभव, ऐतिहासिक वारसा, धार्मिक संस्कृती आणि विज्ञानाची ओळख करून देणे महत्त्वाचे असते. याच उद्देशाने विश्वकर्मा ग्रामविकास प्रतिष्ठान, कर्जत संचलित श्री धाकोजी महाराज माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, निमगाव डाकू यांच्या वतीने आंध्रप्रदेशातील श्री क्षेत्र तिरुपती बालाजी येथे आयोजित करण्यात आलेली शैक्षणिक व धार्मिक सहल अत्यंत उत्साहात आणि यशस्वीरीत्या संपन्न झाली. या सहलीत तब्बल ७७ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवून भक्ती, ज्ञान आणि आनंदाचा अविस्मरणीय अनुभव घेतला.

विद्यालयाच्या रौप्यमहोत्सवी वर्षाचे औचित्य साधून विश्वकर्मा शिक्षण संस्थेचे अध्यक्ष तथा कर्जत नगरपंचायतीचे नगरसेवक श्री. प्रसाद ढोकरीकर यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रेरणेने या सहलीचे आयोजन करण्यात आले होते. विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. कय्युम मोमीन व सहल विभागप्रमुख श्री. सुरेश गोडसे यांनी सहलीचे नियोजन केले.

दि. २७ ऑक्टोबर रोजी सहलीचा शुभारंभ राशीन येथील श्री जगदंबा देवीचे दर्शन घेऊन करण्यात आला. त्यानंतर श्री क्षेत्र सिद्धटेक येथे श्री सिद्धिविनायकाचे दर्शन घेऊन विद्यार्थ्यांनी आशीर्वाद घेतले. पुढे दौंड रेल्वे स्थानकावरून पुणे-कन्याकुमारी एक्स्प्रेसने रेणिगुंटा येथे प्रवास करत सहल तिरुपतीच्या दिशेने रवाना झाली. तिरुपती येथे पोहोचल्यानंतर श्री बालाजींच्या दर्शनासाठी आवश्यक दर्शन पास घेऊन सर्व विद्यार्थ्यांनी शिस्तबद्ध पद्धतीने दर्शन रांगेतून भगवान श्री व्यंकटेश्वरांचे दर्शन घेतले. बालाजी मंदिरातील दिव्य वातावरण, मंदिराची भव्यता आणि भक्तिमय परिसर अनुभवताना विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद व समाधान ओसंडून वाहत होते. यावेळी विद्यार्थ्यांनी बालाजी मंदिर परिसरातील विविध मंदिरांचे तसेच श्री विष्णुपादुकांचे दर्शन घेतले. महाप्रसादाचाही लाभ घेतला. या सहलीदरम्यान विद्यार्थ्यांनी इस्कॉन मंदिर, कपिलधारा मंदिर, पद्मावती मंदिर, गोविंदराज मंदिर, श्री कालहस्ती मंदिर आणि जुने बालाजी मंदिर अशा विविध धार्मिक स्थळांना भेटी दिल्या. प्राचीन मंदिरांचे भव्य दगडी बांधकाम, कलाकुसर, स्थापत्यशास्त्र आणि ऐतिहासिक वास्तू पाहून विद्यार्थी अक्षरशः भारावून गेले. त्या काळातील वास्तुविशारदांनी अत्याधुनिक साधनांशिवाय इतक्या भव्य वास्तूंची निर्मिती कशी केली असेल, याबाबत विद्यार्थ्यांमध्ये कुतूहल निर्माण झाले.

कामरगावकरांचा एल्गार! ३ नोव्हेंबरला महामार्ग रोखणार

चारा डेपो, पाणीटंचाईसह विविध प्रश्नांवर ग्रामस्थ आक्रमक

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



नगर तालुका : गावातील विविध सार्वजनिक प्रश्नांकडे वारंवार पाठपुरावा करूनही प्रशासनाकडून दुर्लक्ष होत असल्याने कामरगाव ग्रामस्थांनी आता आंदोलनाचा पवित्रा घेतला आहे. दुष्काळी परिस्थिती, पशुधनासाठी चारा डेपो, पिण्याच्या पाण्याचे टँकर यांसह विविध मागण्यांसाठी मंगळवार, दि. ३ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजता अहिल्यानगर-पुणे महामार्गावर रास्तारोको आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती युवानेते सिद्धांत आंधळे, माजी सरपंच तुकाराम कातोरे व दूध संस्थेचे अध्यक्ष रवीराज साठे यांनी दिली.

कामरगाव परिसरात सध्या तीव्र दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. गावातील दूध उत्पादक शेतकऱ्यांकडे सुमारे दीड हजार जनावरे असून चाऱ्याअभावी पशुधन जगविण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. चारा उपलब्ध होत नसल्याने दूध व्यवसायावरही परिणाम होत आहे. त्यामुळे पशुधन वाचविण्यासाठी गावात तातडीने चारा डेपो सुरू करण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

याशिवाय कामरगाव लघुपाटबंधारे तलावातील गाळ उपशासाठी शेतकऱ्यांना परवानगी द्यावी, गावात पशुवैद्यकीय सेवा उपलब्ध करून द्यावी, संभाव्य पाणीटंचाई लक्षात घेऊन पिण्याच्या पाण्याचे टँकर सुरू करण्याचे नियोजन करावे, रखडलेली जलजीवन मिशन योजना तातडीने पूर्ण करावी तसेच योजनेतील अनियमितता व दिरंगाईची चौकशी करावी, अशा मागण्या करण्यात आल्या आहेत.

वालुंबा नदीवरील अपघातप्रवण धोकादायक वळणावर संरक्षण कठडे बसवावेत आणि ग्राम महसूल सेवकाने नियमित कर्तव्यावर रुजू व्हावे या मागण्यांचाही निवेदनात समावेश आहे.

या सर्व मागण्यांचे लेखी निवेदन नगर तालुक्याचे तहसीलदार मिलिंद कुलथे यांना देण्यात आले आहे. प्रशासनाने आंदोलनापूर्वी ठोस कार्यवाही न केल्यास ३ नोव्हेंबर रोजी महामार्गावर रास्तारोको जनआंदोलन करण्यात येणार असल्याचा निर्धार शिष्टमंडळाने व्यक्त केला आहे.

यावेळी सिद्धांत आंधळे, तुकाराम कातोरे, रवीराज साठे, अरविंद ठोकळ, सागर शिंदे, गोरख कातोरे, रामचंद्र कातोरे, अनिकेत ठोकळ यांच्यासह अनेक ग्रामस्थ उपस्थित होते.

जुनी पेन्शनच्या मागणीसाठी कर्मचाऱ्यांचे जिल्हाभर आंदोलन

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



टाकळी ढोकेश्वर : महाराष्ट्र शासनाने ३१ ऑक्टोबर २००५ रोजी घेतलेल्या निर्णयाच्या निषेधार्थ महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन संघटनेच्या वतीने ३१ ऑक्टोबर हा दिवस 'काळा दिवस' म्हणून पाळण्यात आला. या निमित्ताने अहिल्यानगर जिल्ह्यातील एनपीएस धारक कर्मचारी,अधिकारी,शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी काळ्या फिती लावून आपापल्या कार्यस्थळी नियमित कामकाज करत निषेध व्यक्त केला.

जिल्ह्यातील विविध शासकीय विभागांतील कर्मचाऱ्यांनी या आंदोलनात उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. काळ्या फिती लावून कामकाज करत कर्मचाऱ्यांनी जुनी पेन्शन योजनेच्या मागणीला आपला पाठिंबा दर्शविला. तसेच अनेक कर्मचाऱ्यांनी आंदोलनाचे छायाचित्र सोशल मीडियावर प्रसारित करून आपल्या निषेधाची भावना व्यक्त केली. आंदोलनाच्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन संघटनेच्या वतीने जिल्ह्यातील सर्व तालुक्यांच्या तहसीलदारांना निवेदने देण्यात आली. तसेच जिल्हाधिकारी, अहिल्यानगर यांनाही जुनी पेन्शन योजना लागू करण्याच्या मागणीचे निवेदन सादर करण्यात आले.

वेगवेगळे शासकीय विभाग, वेगवेगळे संवर्ग; मात्र सर्वांचा प्रश्न एकच आणि मागणीही एकच - जुनी पेन्शन! या भावनेतून जिल्हाभरातील कर्मचाऱ्यांनी आंदोलनात सहभागी होत आपली संघटनात्मक एकजूट दाखवून दिली. आंदोलन जिल्हाभर यशस्वी करण्यासाठी महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन संघटनेचे राज्य सहकार्याध्यक्ष राजेंद्र ठोकळ, जिल्हाध्यक्ष प्रवीण झावरे, नानासाहेब गाढवे, बाजीराव मोढवे, निलेश राजवळ, राज कदम, अरविंद थोरात, मनीषा वाकचौरे, शरद कोतकर, केशव कोल्हे, प्रतीक नेटके, शिवनाथ भुजबळ, किरण निंबाळकर, प्रशांत गवारी, सचिन नाबगे, सतीश पटारे, शिवाजी आव्हाड, ज्ञानेश्वर सोनवणे, अरुण पठाडे, सय्यद तोसिफ, शैलेश खणकर, अमोल साळवे, नितीन भोईटे, देवेंद्र आंबेडकर, नितीन दळवी, योगेश खेडकर, गणेश महाडिक, ऋषी गोरे, अमोल भंडारी, राज चव्हाण, संदीप भालेराव, भाऊसाहेब गिरमकर, रामदास चौरे, अशोक घालमे, ज्ञानेश्वर गायकवाड, सोन्याबापू भांड, रवी फुंदे, संदीप कवडे, चंद्रकांत गट, युवराज हिलाळ, प्रवीण साळवे, प्रदीप उकांडे आदी पदाधिकारी व कार्यकर्त्यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

आव्हाणे बु प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांनी बनवले पर्यावरण पूरक आकाश कंदील



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

ढोरजळगांव : दिवाळी सणाचे औचित्य साधून शेवगाव तालुक्यातील आव्हाणे बुद्रुक येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील ९७ विद्यार्थ्यांनी पर्यावरण पूरक आकाश कंदील तयार केले आहेत विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पकतेतून अनेक कौशल्यातून साकारलेल्या आकर्षक आकाश कंदील आणि सर्व पालक व ग्रामस्थांचे लक्ष वेधून घेतले होते. यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती माया बागडे तसेच शिक्षिका निर्मला खोसे ,नीता नांगरे व शिक्षक रामेश्वर जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला होता. शाळेचे या उपक्रमाचे कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक संजय कोळगे तसेच गावचे सरपंच रामदास वाघमारे, उपसरपंच संगीता कोळगे आणि शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सचिन भालेराव यांच्यासह पालकांनी, ग्रामस्थांनी कौतुक केले आहे.

'ग्रीन सिटी' मोहिमेत १५ हजार वृक्षलागवड व संवर्धनाचे उद्दिष्ट पूर्ण!



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

अहिल्यानगर : पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या संकल्पनेतील ग्रीन सिटी मोहिमेअंतर्गत अहिल्यानगर शहरात एक लाख वृक्षलागवड व संवर्धनाचा संकल्प करण्यात आला आहे. यापैकी आतापर्यंत १५ हजार वृक्षलागवड व संवर्धनाचे उद्दिष्ट पूर्ण झाले आहे. या मोहिमेच्या पुढील टप्प्यात साई द्वारका सेवा ट्रस्ट आणि अहिल्यानगर महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने वृक्षवाटप उपक्रम राबविण्यात आला. उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांच्या संकल्पनेतून सुरू असलेल्या या उपक्रमाचे आमदार योगेश टिळेकर यांनी कौतुक केले. यावेळी आमदार योगेश टिळेकर म्हणाले की, समाजात वावरत असताना समाजाचे आपल्यावर काहीतरी ऋण आहे, या भावनेतून प्रत्येकाने आपले कर्तव्य पार पाडले पाहिजे. पुढील पिढीसाठी आपण काय ठेवणार, याचा विचार करताना संपत्ती, गाडी आणि बंगला यापेक्षा वृक्षांची सावली आणि पाण्याचे संवर्धन यासाठी काम करणे अधिक महत्त्वाचे आहे.

कायद्याच्या विद्यार्थ्यांनी कल्पनाशक्तीचा विकास करावा : सुद्रिक

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



निघोज : कायद्याचा अभ्यास करताना नियमित वाचन, सर्वांगीण ज्ञान आणि चिकित्सक दृष्टिकोन विकसित करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. वकील म्हणून काम करताना कल्पनाशक्तीचा विकास करून प्रत्येक प्रकरणाचा विविध अंगांनी विचार करावा. कोणतीही केस हाताळताना प्रत्यक्ष घटनास्थळाची पाहणी करावी, तसेच उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयाचे महत्त्वपूर्ण न्यायनिवाडे काळजीपूर्वक अभ्यासावेत, असा सल्ला ज्येष्ठ विधितज्ञ ॲड. सतीषचंद्र सुद्रिक यांनी दिला.

समर्थ रुरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट संचलित समर्थ लॉ कॉलेज, बेल्हे (बांगरवाडी), ता. जुन्नर येथे प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या स्वागत समारंभप्रसंगी ते बोलत होते. न्यायालयीन कामकाजातील बदलांचा अभ्यास करून त्यानुसार कामकाजात सुसूत्रता आणणे आवश्यक असल्याचेही त्यांनी सांगितले.

फौजदारी न्यायालयातील कामकाज प्रभावीपणे हाताळण्यासाठी वकिलांनी सर्वंकष अभ्यास करणे गरजेचे आहे. वकील हा केवळ न्यायालयीन कामकाजापुरता मर्यादित नसून त्याला समाजातील विविध क्षेत्रांचे ज्ञान असणे आवश्यक आहे. नवीन वकिलांनी या बाबी लक्षात घेऊन पक्षकाराला न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील राहावे. तसेच सामाजिक भान राखून आणि पक्षकाराच्या आर्थिक परिस्थितीचा विचार करून जबाबदारीने काम करावे, असेही ॲड. सुद्रिक यांनी नमूद केले.

प्राचार्य डॉ. सुनील कवडे यांनी महाविद्यालयाची स्थापना, महाविद्यालयामार्फत उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या कायदेविषयक सुविधा तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. यावेळी त्यांनी प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे स्वागत करून त्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष वसंतराव शेळके, उपाध्यक्ष माऊलीशेठ शेळके, सचिव विवेक शेळके, विश्वस्त वल्लभ शेळके, जिल्हा परिषदेच्या माजी सदस्या स्नेहलताई शेळके, कॅम्पस डायरेक्टर डॉ. राजीव सावंत, प्राचार्य डॉ. सुनील कवडे, प्रशासकीय अधिकारी प्रा प्रदीप गाडेकर, ॲड. अंकिता सुद्रिक, ॲड. प्रेरणा भोसले आणि श्री. शिवाजी कुमकर यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक उपस्थित होते.

कार्यक्रमाचे नियोजन व सूत्रसंचालन प्रा. सचिन दरेकर यांनी केले. पाहुण्यांचा परिचय प्रा.पूजा दुग्गड यांनी करून दिला, तर श्री. शिवाजी कुमकर यांनी उपस्थितांचे आभार मानले.

दैनिक
राष्ट्रसह्याद्री

सोमवार, दि.०२ नोव्हेंबर २०२६ । पान ८

घरात घुसून महिलेचा विनयभंग; विरोध केल्यास मुलांसह जीवे मारण्याची धमकी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

राहुरी : तालुक्यातील देवळाली प्रवरा येथे घरात घुसून महिलेचा विनयभंग केल्याची घटना उघडकीस आली आहे. या कृत्याला विरोध केल्यास संबंधित महिला व तिच्या मुलांना जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोपही करण्यात आला आहे. याप्रकरणी ऋषिकेश आदिनाथ चव्हाण (रा. राहुरी कॉलेज) याच्याविरुद्ध राहुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गुरुवार, दि. २९ ऑक्टोबर रोजी रात्री आठ वाजण्याच्या सुमारास देवळाली प्रवरा येथे ही घटना घडली. संबंधित महिला घरात असताना आरोपीने घरात प्रवेश केला. त्यानंतर महिलेचा हात पकडून तिला जवळ ओढले आणि तिच्या मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. या प्रकाराला महिलेने विरोध केला असता, तसेच घडलेल्या घटनेची माहिती कोणाला दिल्यास महिलेला व तिच्या मुलांना जीवे मारण्याची धमकी दिल्याचेही फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी राहुरी पोलिसांनी ऋषिकेश चव्हाण याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पोलीस निरीक्षक रवींद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हेडकॉन्स्टेबल विजय नवले पुढील तपास करीत आहेत.

अहिल्यानगर जिल्ह्यावर पाणीटंचाईचे महासंकट!

जून २०२७ पर्यंत १,१०९ गावे अन् ५,२४१ वाड्यांना टंचाईची झळ

४७२ कोटींचा कृती आराखडा तयार । टँकरवरच ३८२ कोटी ४६ लाख खर्च होण्याचा अंदाज

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

अहिल्यानगर : यंदा एल निनोच्या संभाव्य प्रभावामुळे पावसाने ओढ दिल्याने अहिल्यानगर जिल्ह्यासमोर आगामी उन्हाळ्यात पाणीटंचाईचे गंभीर संकट उभे राहण्याची चिन्हे आहेत. जिल्ह्यात ऑक्टोबर २०२६ ते जून २०२७ या कालावधीत तब्बल १ हजार १०९ गावे आणि ५ हजार २४१ वाड्यांना पाणीटंचाईची झळ बसण्याचा अंदाज जिल्हा प्रशासनाने व्यक्त केला आहे. या संभाव्य संकटावर मात करण्यासाठी तब्बल ४७१ कोटी ६९ लाख १८ हजार रुपयांचा टंचाई निवारण कृती आराखडा तयार करण्यात आला आहे. विशेष म्हणजे, या आराखड्यातील ३८२ कोटी ४६ लाख रुपये केवळ टँकरद्वारे पाणीपुरवठ्यासाठी खर्च होण्याची शक्यता आहे. त्यामुळे आगामी नऊ महिने जिल्ह्याच्या ग्रामीण भागासाठी पाण्याचे मोठे आव्हान ठरणार आहे.

पाणीटंचाईची तीव्रता लक्षात घेऊन राज्य शासनाने ऑक्टोबरमध्येच जिल्ह्यात दुष्काळ जाहीर केला आहे. ऑगस्टपासूनच अनेक भागांत पाणीटंचाई जाणवू लागल्याने जिल्हा प्रशासनाने जून २०२७ पर्यंतचे नियोजन केले आहे. या आराखड्यात पिण्याच्या पाण्याबरोबरच जनावरांसाठी पाणी उपलब्ध करून देण्याच्या उपाययोजनांचाही समावेश करण्यात आला आहे.

जिल्ह्यातील ८४२ गावे आणि ४ हजार ५७६ वाड्यांना टँकरद्वारे पाणीपुरवठा करावा लागू शकतो, असा अंदाज आहे. त्यासाठी २ हजार ३७८ टँकरची आवश्यकता भासणार असल्याचे नियोजनात नमूद आहे. मात्र, विविध उपाययोजनांच्या तपशिलात टँकरची एकूण संभाव्य संख्या २ हजार ३८७ असल्याचे नमूद करण्यात आले आहे. टँकरच्या माध्यमातून एवढ्या मोठ्या प्रमाणावर पाणीपुरवठा करावा लागणार असल्याने प्रशासनासमोर पाणी उपलब्धता, वाहतूक आणि वितरणाचे मोठे आव्हान असेल.

केवळ टँकरवर अवलंबून न राहता पाणीटंचाई निवारणासाठी पर्यायी उपाययोजनाही आराखड्यात प्रस्तावित करण्यात आल्या आहेत. त्यानुसार २८ ठिकाणी बुडक्या खोदण्यासाठी १४ लाख रुपये, २७७ विहिरी खोल करणे व गाळ काढण्यासाठी ७ कोटी ८० लाख रुपये, तर ४३८ खासगी विहिरी अधिग्रहित करण्यासाठी ३ कोटी १३ लाख रुपये खर्च अपेक्षित आहे. टँकर भरण्यासाठी १३४ विहिरी अधिग्रहित करण्यावर २ कोटी १० लाख रुपये खर्च होणार आहेत.



श्रीरामपूर : प्रवरा आणि गोदावरी नद्यांच्या मध्यावर वसलेल्या तसेच भंडारदरा कालव्याने पाणीपुरवठा होत असलेल्या श्रीरामपूर शहरातील पाणीटंचाईचे भीषण वास्तव या छायाचित्रात दिसत आहे. शहरातील बोरावके कॉलेज जवळील सिद्धार्थनगर परिसरात नागरिकांना पिण्यासाठी पाणी उपलब्ध होत नसल्याने संताप व्यक्त केला जात आहे.

जामखेडला सर्वाधिक ७६ कोटींचा भार

तालुकानिहाय टँकर नियोजनात जामखेड तालुका सर्वाधिक खर्चाच्या यादीत असून, तेथे २६३ टँकरसाठी सुमारे ७६ कोटी रुपयांची तरतूद अपेक्षित आहे. पारनेर तालुक्यात सर्वाधिक ४०० टँकरची आवश्यकता भासण्याचा अंदाज असून, त्यासाठी ६५ कोटी ६१ लाख रुपये खर्च अपेक्षित आहे. श्रीगोंदा तालुक्यात २३५ टँकरसाठी ४६ कोटी ६८ लाख रुपये, तर पाथर्डी तालुक्यात २७८ टँकरसाठी ४४ कोटी ४६ लाख रुपयांची तरतूद प्रस्तावित आहे. दुसरीकडे, श्रीरामपूर तालुक्यात तुलनेने कमी म्हणजे २५ टँकरची आवश्यकता भासणार असून, त्यासाठी १ कोटी ६५ लाख रुपये खर्च अपेक्षित आहे.

प्रगतीपथावर असलेल्या ५६ नळपाणीपुरवठा योजना पूर्ण करण्यासाठी ६ कोटी ५८ लाख रुपये, तर १७७ नळयोजनांच्या विशेष दुरुस्तीसाठी ५५ कोटी ५९ लाख रुपयांची तरतूद प्रस्तावित आहे. याशिवाय ३४० ठिकाणी नवीन विंधन विहिरी घेण्यासाठी ३ कोटी ४० लाख रुपये, ५४ ठिकाणी तात्पुरत्या पूरक नळपाणीपुरवठा योजना राबविण्यासाठी ५ कोटी ५० लाख रुपये, तर १०७ पाणीस्रोतांचे बळकटीकरण करण्यासाठी ५ कोटी ३९ लाख रुपये खर्च अपेक्षित आहे.

जिल्ह्यातील संभाव्य टंचाईग्रस्त गावे आणि वाड्यांची संख्या पाहता आगामी काळात पिण्याच्या पाण्याचा प्रश्न अधिक गंभीर होण्याची शक्यता आहे. विशेषतः टँकरसाठी प्रस्तावित ३८२ कोटी ४६ लाख रुपयांचा खर्च हा संपूर्ण आराखड्यातील सर्वात मोठा भाग आहे. त्यामुळे उपलब्ध पाणीसाठ्याचे काटेकोर नियोजन, विहिरी व नळयोजनांची कामे वेळेत पूर्ण करणे, पाणीगळती रोखणे आणि टँकरद्वारे होणारा पुरवठा नियमित ठेवणे आवश्यक ठरणार आहे. कागदावरील ४७२ कोटींच्या नियोजनाचे प्रत्यक्षात रूपांतर किती प्रभावीपणे होते, यावरच आगामी उन्हाळ्यात ग्रामीण भागातील लाखो नागरिकांना दिलासा मिळणार आहे.

नेवासा कांदा बाजारात कमाल ४ हजार ५२५ रुपयांचा भाव

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



नेवासा : माजी मंत्री शंकरराव गडाख पाटील यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली कार्यरत असलेल्या नेवासा कृषी उत्पन्न बाजार समितीत रविवार, दि. १ नोव्हेंबर २०२६ रोजी झालेल्या कांदा बाजारात शेतकऱ्यांच्या कांद्याला कमाल ४ हजार ५२५ रुपये प्रतिक्विंटल भाव मिळाला असल्याची माहिती सभापती नंदकुमार पाटील यांनी दिली बाजारात एकूण २०० वाहनांतून कांद्याची आवक झाली असून, सरासरी ३ हजार ६७५ रुपये प्रतिक्विंटल दराने कांद्याचे लिलाव पार पडले. कांद्याला मिळालेल्या या भावामुळे बाजार समितीतील व्यवहारांकडे शेतकऱ्यांचे लक्ष वेधले गेले. नेवासा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती नंदकुमार पाटील यांनी सांगितले की रविवारी झालेल्या कांदा लिलावात कमाल भाव ४ हजार ५२५ रुपये, सरासरी भाव ३ हजार ६७५ रुपये, तर किमान भाव १ हजार २५५ रुपये प्रतिक्विंटल नोंदविण्यात आला. बाजार समितीमध्ये झालेल्या लिलावात ४ हजार १ ते ४ हजार ५२५ रुपये प्रतिक्विंटल दराच्या गटात ३१ वाहनांतील कांदा विक्रीस आला. ३ हजार ५०१ ते ४ हजार रुपये दराच्या गटात सर्वाधिक ८३ वाहनांची आवक झाली. ३ हजार १ ते ३ हजार ५०० रुपये दराच्या गटात ४० वाहने, तर २ हजार ५०१ ते ३ हजार रुपये दराच्या गटात १८ वाहनांतील कांद्याची विक्री झाली. याशिवाय १ हजार २५५ ते २ हजार ५०० रुपये दराच्या गटात २८ वाहनांचा समावेश होता.एकूण २०० वाहनांमधून झालेल्या कांदा आवकीत बहुतांश वाहनांतील कांद्याला ३ हजार ५०१ ते ४ हजार रुपये प्रतिक्विंटल दर मिळाला असल्याची माहिती नेवासा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती नंदकुमार पाटील यांनी दिली.

शेतकऱ्यांच्या विहिरीवर चोरट्यांचा डल्ला

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

श्रीगोंदा : तालुक्यात शेतकऱ्यांच्या शेतीपंपांना लक्ष्य करणाऱ्या चोरट्यांचा उपद्रव पुन्हा समोर आला आहे. निमगाव खलू येथील शेतकऱ्याच्या विहिरीवरील ५ एचपी क्षमतेची सोलर पंपाची मोटार आणि विद्युत केबल अज्ञात चोरट्यांनी चोरून नेली. या घटनेत शेतकऱ्याचे २७ हजार रुपयांचे नुकसान झाले असून, शेतीपंप आणि विद्युत साहित्याच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. निमगाव खलू येथील ज्ञानदेव बापूराव कोल्हेडकर (वय ५८) यांची गट क्रमांक २९५ मध्ये शेतजमीन आहे. त्यांच्या विहिरीवर बसविण्यात आलेली २५ हजार रुपये किमतीची ५ एचपी सोलर पंपाची मोटार तसेच दोन हजार रुपये किमतीची विद्युत केबल चोरट्यांनी लक्ष्य केली. २५ ऑक्टोबर रोजी सायंकाळी पाच ते २६ ऑक्टोबर रोजी सकाळी आठ वाजेच्या दरम्यान ही चोरी झाली. याप्रकरणी कोल्हेडकर यांनी श्रीगोंदा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असून, अज्ञात चोरट्यांविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार पांडुरंग मांडवकर करीत आहेत. शेतीसाठी लाखमोलाचे असलेले पाणी उपसण्याचे साहित्य चोरट्यांकडून लक्ष्य केले जात असल्याने शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसत आहे. ग्रामीण भागातील विहिरी आणि शेतांमधील साहित्याच्या चोरीला आळा घालण्यासाठी पोलिसांनी गस्त वाढविण्याची मागणी होत आहे.

लग्नाच्या स्वप्नांवर मानसिक छळाचे सावट २७ वर्षीय तरुणीची जीवनयात्रा संपली

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

श्रीगोंदा : विवाहाचे स्वप्न उराशी बाळगलेल्या २७ वर्षीय तरुणीच्या आयुष्याचा दुर्दैवी शेवट झाल्याची घटना श्रीगोंदा शहरात उघडकीस आली आहे. लग्नासाठी जमलेले स्थळ मोडण्यासाठी चुकीची माहिती देणे आणि 'तुझे लग्न होणार नाही' असे म्हणत वारंवार मानसिक त्रास दिल्याच्या आरोपातून मयूरी सुनील मखरे या तरुणीने राहत्या घरी आत्महत्या केली. या प्रकरणामुळे शहरात खळबळ उडाली असून, आत्महत्येस प्रवृत्त केल्याच्या आरोपावरून प्रतीक सुरेश भुजबळ याच्याविरुद्ध पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. याप्रकरणी उमेश शहाजी मखरे (वय २७, रा. दत्तवाडी, श्रीगोंदा) यांनी श्रीगोंदा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादीच्या म्हणण्यानुसार, ऑगस्ट २०२५ पासून मयूरीच्या विवाहासाठी प्रयत्न सुरू होते. विवाहासाठी जमलेले स्थळ मोडावे, या उद्देशाने वैभव दादासाहेब झंजे याने मयूरीबाबत संबंधितांना फोन करून चुकीची माहिती दिल्याचा आरोप आहे.दरम्यान, प्रतीक सुरेश भुजबळ याने मयूरीला 'तुझे लग्न होणार नाही', असे म्हणत वारंवार मानसिक त्रास दिल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. विवाहाच्या विषयावरून सुरू असलेला हा कथित मानसिक छळ आणि त्रास असह्य झाल्याने मयूरीने १८ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी साडेसात वाजण्याच्या सुमारास रामोशी गल्ली येथील राहत्या घरी आत्महत्या केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. या घटनेने एका तरुणीच्या आयुष्याचा दुर्दैवी अंत झाला असून, विवाहासारख्या वैयक्तिक विषयावरून होणारा मानसिक छळ किती गंभीर वळण घेऊ शकतो, हा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

कॉमनवेल्थ क्रीडा स्पर्धेत भारतीय संघ विजयी शिवम पटारेने पटकावले सुवर्ण पदक

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



टाकळीभान : कॉमनवेल्थ क्रीडा स्पर्धेमध्ये भारतीय संघाने विजयी पताका फडकविली असून या स्पर्धेमध्ये टाकळीभानचा सुपुत्र उत्कृष्ट प्रो कबड्डी स्टार खेळाडू शिवम अनिल पटारे याने भारतीय संघाच्या विजयासाठी मोलाची कामगिरी करत सुवर्णपदक पटकावले असून टाकळीभान गावाची मान पुन्हा एकदा कबड्डी खेळाच्या विश्वामध्ये अभिमानाने उंचावली असून हा गावासाठी अभिमानाचा व गौरवाचा क्षण असल्याने सर्वच स्तरातून शिवमचे अभिनंदन व कौतुक होत आहे. बुधवार दि. ३ नोव्हेंबर २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता गावचा लाडका सुपुत्र शिवम अनिल पटारे याचे टाकळीभान येथे आगमन होत असून कॉमनवेल्थ कबड्डी सर्धेत भारतासाठी त्याने सुवर्णपदक जिंकल्याबद्दल गावातील क्रीडाप्रेमी, समस्त ग्रामस्थ यांच्यावतीने त्याचे भव्य स्वागत करण्यात येणार असून सर्वांनी स्वागतासाठी टाकळीभान कमान येथे बुधवार दि ३ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता उपस्थित राहावे असे आवाहन क्रीडाप्रेमी व ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे. व लवकरच अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे यांच्या हस्ते शुभमचा सत्कार करण्यात येणार असल्याची माहिती मिळाली आहे.

शेवगावमध्ये १७ वर्षीय अल्पवयीन मुलीचे अपहरण करून अत्याचार ! पाच जणांविरुद्ध गुन्हा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

नेवासा : अहिल्यानगर जिल्ह्यातील शेवगाव तालुक्यात १७ वर्षीय अल्पवयीन मुलीचे भरस्त्यातून अपहरण करून तिच्यावर अत्याचार केल्याची गंभीर घटना समोर आली आहे. काळ्या रंगाच्या स्कॉर्पिओ वाहनातून आलेल्या काही जणांनी मुलीला जबरदस्तीने वाहनात बसवून शिगोरी येथील डोंगराळ भागात नेल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. या प्रकरणी पोलिसांनी भारतीय न्याय संहिता (बीएनएस) आणि बालकांचे लैंगिक अपराधांपासून संरक्षण कायद्यानुसार (पोक्सो) गंभीर कलमांखाली गुन्हा दाखल केला आहे. या घटनेमुळे शेवगाव तालुक्यात खळबळ उडाली आहे.

तक्रारीनुसार, ९ ऑक्टोबर २०२६ रोजी सायंकाळी पीडित मुलगी प्रकृती अस्वस्थ असल्याने वैद्यकीय उपचारासाठी पायी जात होती. यावेळी स्वामी समर्थ मंगल कार्यालयासमोर काळ्या रंगाच्या स्कॉर्पिओ वाहनातून आलेल्या व्यक्तींनी तिचा रस्ता अडविला. त्यानंतर तिला जबरदस्तीने वाहनात बसवून शिगोरी येथील डोंगराळ भागात नेण्यात आले. तेथे तिच्यावर अत्याचार केल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच या घटनेची माहिती कोणाला दिल्यास जीवे मारण्याची धमकी दिल्याचेही तक्रारीत नमूद आहे.

या प्रकरणात अक्षय (भैय्या) बोरुडे (रा. तिसगाव), हनुमंत गोल्हार, अंगद फुंदे यांच्यासह अन्य दोन अनोळखी व्यक्तींविरुद्ध तक्रार दाखल करण्यात आल्याची माहिती आहे.

तपासातील नाव वगळल्याचा आरोप

या प्रकरणाला आता वेगळे वळण मिळाले आहे. मूळ तक्रार आणि जबाबामध्ये अंगद फुंदे याचे नाव नमूद असतानाही वाढीव कलमे लावण्यासंदर्भातील अहवालातून त्याचे नाव वगळण्यात आल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे. त्यामुळे तपासाच्या पारदर्शकतेबाबत प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. संबंधित व्यक्तीची भूमिका आणि नाव वगळण्यामागील कारणांची सखोल चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

राजकीय दबावाची शंका; संरक्षणाची मागणी

आरोपींपैकी अक्षय (भैय्या) बोरुडे हा आमदार अक्षय कर्डिले यांचा निकटवर्तीय असल्याचा दावा फिर्यादीकडून करण्यात आला आहे. त्यामुळे या प्रकरणाच्या तपासावर कोणत्याही राजकीय दबावाचा प्रभाव पडू नये, अशी मागणी करण्यात आली आहे. मात्र, या आरोपांची स्वतंत्रपणे अधिकृत पुष्टी झालेली नाही.

पीडित मुलीच्या कुटुंबीयांना आणि फिर्यादीला गंभीर धमक्या दिल्या जात असल्याचा आरोपही करण्यात आला आहे. गुन्हा मागे घेण्यासाठी दबाव आणला जात असल्याची भीती व्यक्त करत पीडित कुटुंबाला तातडीने पोलीस संरक्षण देण्याची मागणी करण्यात आली आहे. कुटुंबाविरुद्ध दाखल होणाऱ्या संभाव्य तक्रारींचीही निष्पक्ष चौकशी करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

पोक्सो कायद्यानुसार गंभीर कलमे

या प्रकरणात सुरुवातीला भारतीय न्याय संहितेच्या कलम १३७ (२) अंतर्गत गुन्हा दाखल झाल्यानंतर कलम ९६, ६४ (२) (I), १२६ (२) तसेच पोक्सो कायद्याच्या कलम ३, ४ आणि ६ या वाढीव कलमांचा समावेश करण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे. या कलमांमुळे प्रकरणाचे गांभीर्य अधोरेखित झाले आहे.

संपूर्ण प्रकरणाचा निष्पक्ष व पारदर्शक तपास करून सर्व संबंधितांच्या भूमिकेची चौकशी करावी, पुराव्यांच्या आधारे दोषींवर कठोर कारवाई करावी आणि पीडित मुलीला व तिच्या कुटुंबीयांना सुरक्षा द्यावी, अशी मागणी फिर्यादीने केली आहे. मागण्यांवर योग्य कार्यवाही न झाल्यास न्यायालयीन मार्गाने तीव्र आंदोलन करण्याचा इशाराही देण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास शेवगाव पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक विनोद खांडबहाले करीत आहेत.

शिर्डीत उपवर्गीकरणाच्या मोर्चांनी वातावरण ढवळून निघाले

मने दुभंगली तणावपूर्ण शांताता कायम

अशोक दुशिंग । राष्ट्र सह्याद्री

शिर्डी : अनुसूचित जातीच्या उपवर्गीकरणाच्या मुद्द्यावरून शिर्डीमध्ये मातंग व बौद्ध समाजाचे मोर्चे नुकतेच संपन्न झाले . सर्वोच्च न्यायालयाने राज्यांना अनुसूचित जाती प्रवर्गात उपवर्गीकरण करण्याचा अधिकार दिल्यापासून राज्यभर या विषयावर वादंग सुरू झाले आहे. त्याची तीव्र किनार शिर्डीत पाहायला मिळत आहे. काही दिवसांपूर्वी मातंग समाजाने उपवर्गीकरणाच्या समर्थनार्थ हजारोंच्या संख्येने भव्य मोर्चा काढला होता.

या मोर्चात राज्यातील प्रमुख, अभ्यासू आणि आक्रमक वक्त्यांना विशेष आमंत्रित करण्यात आले होते. वर्षानुवर्षे आरक्षणाचा खरा लाभ वंचितांपर्यंत पोहोचला नसल्याने उपवर्गीकरण तात्काळ लागू करावे, अशी ठाम भूमिका मातंग समाजाने मांडली. या मोर्चाला तोडीस तोड उत्तर म्हणून बौद्ध समाजानेही उत्तर नगर जिल्ह्यातील तमाम भीमसैनिकांना एकत्र करत आणखी एक विराट मोर्चा काढला.



रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया, वंचित बहुजन आघाडी, भीमशक्ती, भारतीय बौद्ध महासभा आणि रिपब्लिकन सेना , बसपा सारख्या सर्व आंबेडकरी संघटनांनी एकत्र येत उपवर्गीकरण हे फूट पाडणारे आणि संविधानाच्या मूळ गाभ्याला धक्का देणारे असल्याचे सांगत याला कडाडून विरोध दर्शवला.

बौद्ध समाजाच्या मोर्चात स्थानिक वक्त्यांनी हा वाद दोन समाजांमधील नसून सरकारचा डाव असल्याचे सांगत आमचा लढा धोरणाविरोधात असल्याची भूमिका मांडली, दोन्ही समाजात शक्तिप्रदर्शन झाले असले तरी यातून निष्पन्न काहीच झाले हे आताच ठरवणे योग्य नाही . कारण या आरक्षणाचा अंतिम निर्णय न्यायालय आणि सरकारच्या पातळीवर होणार आहे. परंतु, या स्थानिक संघर्षाचे दुष्परिणाम आता गावागावांत आणि डिजिटल माध्यमांवर तीव्रपणे जाणवू लागले आहेत.

रस्त्यावरची गर्दी ओसरली असली तरी फेसबुक, व्हॉट्सप आणि इन्स्टाग्रामवर दोन्ही समाजाच्या तरुण कार्यकर्त्यांमध्ये अक्षरशः युद्ध सुरू झाले आहे. एकमेकांवर खालच्या पातळीवर टीका-टिप्पणी करणे सुरू आहेत . दिवसभर एकाच वस्तीत राहणारे आणि एकाच चळवळीत काम करणारे तरुण रात्री सोशल मीडियावर एकमेकांचे कट्टर शत्रू बनल्याचे चित्र आहे. पूर्वी एकाच कार्यक्रमात खांद्याला खांदा लावून काम करणारी मने कलुषित होत आहेत. जर या सोशल मीडियावरील द्वेषभावाला वेळीच आवर घातला नाही, तर ही ठिणगी प्रत्येक गावागावात पोहोचून मोठ्या सामाजिक संघर्षात रूपांतरित होईल, अशी तीव्र चिंता शिर्डी परिसरातील ज्येष्ठ नागरिक, बौद्ध व मातंग समाजातील सुजाण व अभ्यासू कार्यकर्त्यांकडून व्यक्त केली जात आहे.

थोरातांची मास्टर स्ट्रॅटर्जी यशस्वी

आरक्षण उपवर्गीकरणाच्या विरोधात शिर्डी येथे काढण्यात आलेल्या महामोर्चातून एक गोष्ट स्पष्ट झाली आहे. यानिमित्ताने रिपाइंचे अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष सुरेंद्र थोरात हे जिल्ह्यातील आंबेडकरी जनतेची एक मोट बांधण्यात यशस्वी ठरले आहेत.जिल्ह्यात अनेक गटा-तटात विखुरलेल्या बौद्ध समाजाला एका छताखाली आणत, एकजुटीची मोट बांधण्याचे काम थोरात यांनी बेखुबीने निभावले आहे. उपवर्गीकरणाचा निर्णय जो होईल तो होईल, मात्र या निमित्ताने विखुरलेला आंबेडकरी समाज एकसंध करण्याचे ऐतिहासिक काम या निमीताने अधोरेखीत झाले आहे . सुरवाती पासूनच बाहेरच्या नेत्यांना मोर्चात सामील करून घ्यायचे नाही हा त्यांचा फार्मुला समाज एकसंध ठेवण्यासाठी यशस्वी ठरला आहे.

तहसीलदारांचा आदेश असतानाही शेतरस्ता बंद !

अंत्यविधीसाठी रस्ता नाही, पिंप्री-वळणमध्ये माणुसकीला काळीमा !



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

राहुरी : तालुक्यातील पिंप्री-वळण येथे शेतरस्त्याच्या वादाने आता गंभीर वळण घेतले आहे. गेल्या पाच महिन्यांपासून कानडे कुटुंबीयांचा वडिलोपार्जित शेतरस्ता अडविण्यात आल्याचा आरोप करण्यात येत आहे.

विशेष म्हणजे, अशोक कारभारी कानडे, नानासाहेब कारभारी कानडे आणि भाऊसाहेब कारभारी कानडे यांच्या गट क्रमांक २४/३ कडे जाणारा शेतरस्ता खुला करण्याचे आदेश मामलेदार न्यायालयाने ३० सप्टेंबर रोजी दिले आहेत. मात्र, आदेश होऊनही प्रत्यक्षात रस्त्याची वहिवाट सुरू झाली नसल्याचा आरोप कानडे कुटुंबीयांनी केला आहे.

या प्रकरणातील सर्वात हृदयद्रावक बाब म्हणजे, कानडे बंधूंच्या आईचे दुखःत निधन झाल्यानंतर अंत्यविधीसाठीही काट्याकुट्यातून वाट काढण्याची वेळ कुटुंबीयांवर आली. अंत्यविधीनंतरही या वादावर तोडगा निघालेला नसल्याने कौटुंबिक संवेदना आणि माणुसकी नेमकी हरवली कुठे? असा प्रश्न उपस्थित होत आहे. एवढेच नाही, तर दुःखद प्रसंगी नातेवाईकांना येजा करतानाही अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे सांगण्यात येत आहे.

एकीकडे तहसीलदारांचा आदेश आणि दुसरीकडे बंद असलेली शेतरस्त्याची वहिवाट ! मग आदेशाची अंमलबजावणी होणार कधी? आदेश असूनही शेतरस्त्यासाठी संघर्ष करावा लागत असेल, तर सामान्य माणसाने न्याय मागायचा तरी कोणाकडे? असा संतप्त सवाल उपस्थित होत आहे....या संपूर्ण प्रकरणाची तहसीलदारांनी गांभीर्याने दखल घेऊन संवेदनशीलतेने हस्तक्षेप करावा आणि न्यायालयाच्या आदेशाची तातडीने अंमलबजावणी करून कानडे कुटुंबीयांना न्याय द्यावा, अशी मागणी होत आहे.